ग्रंथमाला

मासिकपुस्तकांत छापलेलें प्रकरण.

मातृपितृसंबंध

हा निबंध

रा० रा० जगन्नाथ रावजी तुळू बी. ए.

यांनीं लिहिला

तो

विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए.

संपादक ग्रंथमाला

यांनीं

कोल्हापूर 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापविला.

मार्च १९०६.

ग्रंथमाला

मासिकपुस्तकांत छापलेलें प्रकरण.

मातृपितृसंबंध

हा निबंध

रा० रा० जगन्नाथ रावजी तुळू बी. ए.,

यांनीं लिहिला

तो

विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए.

संपादक ग्रंथमाला

यांनीं

कोल्हापूर 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापविला.

मार्च : १९०६.

किंमत १ रुपया.

हा अल्प निबंध, माझे परमपूज्य पितृव्य
कैलासवासी रावबहादुर गोविंद वासुदेव
तुळू, एम्. ए. एलएल्, बी.,
सेशन्स जज्ज, ग्वाल्हेर, यांचे
चरणारविंदीं अर्पण
केला असे.

अनुक्रमणिका.

१ प्रस्तावना.

२ विवाह व प्रजोत्पादन.

३ आईबाप व मुलें.

४ आईबापांचें मुलांचे शरीराविषयीं कर्तव्य.

५ आईबापांचें मुलांचे शिक्षणाविषयीं कर्तव्य.

६ मुलांचें आईबापांविषयीं कर्तव्य.

७ आईबापांची थोरवी.

८ आतांचें आईबापांचें शिथिल बंधन.

९ तें दृढ करण्याचा उपाय.

१० उपसंहार

निबंधांतील आधारभूत प्रमुख ग्रंथ.

संस्कृत.

१ वेद.

२ मनुस्मृति.

३ रामायण.

४ महाभारत.

५ शुक्रनीति.

६ चाणक्यनीति.

७ रघुवंश.

८ कुमारसंभव.

९ किरातार्जुनीय.

१० भामिनीविलास.

११ भोजप्रबंध.

१२ उत्तररामचरित्र.

मराठी.

१३ भारतीय साम्राज्य.

१४ अबलोन्नतिलेखमाला.

१५ स्वामी विवेकानंद यांची व्याख्यानमाला (ग्रंथमाला).

१६ गृहिणीकंठभूषण.

१७ सौ० डॉ० आनंदीबाई जोशी यांचें चरित्र.

१८ मुलांस वाढविण्याची रीति.

१९ किंडर्गार्टन ऊर्फ बालोद्यान शिक्षणपद्धति (ग्रंथमाला).

२० आत्मनीतीचीं तत्वें आणि परोपकार.

इंग्रजी.

21 Cobbet's advice to Young Men.

22 Maria Edgeworth's Moral Tales.

23 Paul and Virginia.

24 Spectator (Addison).

25 Present State of Polite Learning (Goldsmith).

26 Encycopaedia Britannica (Ed. 9th. Vol. F.).

27 The mind of the Child (Prof. Preyer).

28 Essay on the Haman Understanding (John Locke).

29 Some thoughts concerning Education (John Locke).

30 Foster's Decision of character.

31 How to Excel in study (Mason).

32 Indian Idylls (Arnold).

मातृपितृसंबंध.

+ मातृदेवो भव । पितृदेवो भव ॥ तैतिरीयोपनिषद् (शिक्षाध्यायः)

* उपाध्यायान् दशाचार्य आचार्याणां शतं पिता ।
सहस्रं तु पितृन् माता गौरवेणातिरिच्यते ॥

मनुस्मृतिः, अ० २ श्लो० १४९

माता गुरुतरा भूमेः खात्पितोच्चतरः स्मृतः ।

महाभारतम् (वनपर्व)

वनस्पतिशास्त्राचा अत्यंत मनोवेधक भाग ह्मटला ह्मणजे वनस्पतीची रचना हा होय. झाडाचें मूळ, त्याचा बुंधा, त्याच्या शाखा, त्याचीं पानें, त्याचीं फुलें, त्याचीं फळें; हीं बारकाईनें पाहिलीं ह्मणजे सृष्टिकर्त्याचें अजब चातुर्य दृष्टीस पडतें. त्यामुळें, मनास मोठें आश्चर्य वाटतें. अक्षय्य वट, गरगरित आम्रवृक्ष, सुंदर चवरीचा उंच नारळी वृक्ष; सुगंधी गुलाब गुलनार, नाजुक जाईजुई, मस्तमोगरा इत्यादि वृक्षवल्ली यांची घटना कोणाहि शास्त्रज्ञास तल्लीन करून सोडल्याशिवाय रहात नाहीं. पण या वनस्पतिचरित्राहून मनुष्यचरित्र अधिक गूढ आहे. त्यांतहि आर्यचरित्र अत्यंत गूढ आहे. व आर्यलोकांच्या कुटुंबांत मातृपितृसंबंध, गुरुशिष्य-संबंध, निक्षेपसंबंध, व सेव्यसेवकसंबंध असे जे चार संबंध आहेत, त्यांत पहिला जो मातृपितृसंबंध, तो अत्यंत श्रेष्ठ आहे. आईबाप व मुलें यांचे परस्पर धर्म व त्यासंबंधी विचारांत आपल्यामध्यें प्राचीन काळा-

---

+ " आईबापांना देवांसारखे मान. "

* " उपाध्यायाहून दसपट उपनयनापूर्वी गायत्रीमंत्र पढविणारा आचार्य श्रेष्ठ, आचार्याहून शतपट पिता श्रेष्ठ, आणि पित्याहून सहस्रपट माता श्रेष्ठ " (नि. सा. प्रत) आईचें हृदय पृथ्वीहून मोठें आहे. बापाचें प्रेम आकाशाहून थोर आहे. "

पासून आजपर्यंत झालेलीं रूपान्तरें याचें विवेचन प्रस्तुत निबंधांत कर्तव्य आहे.

पण तें करण्यापूर्वीं, निबंधकाराच्या अधिकाराविषयीं वाचकांस जी जिज्ञासा साहजिक असते, ती तृप्त केल्यानें त्यास निबंधाचें मर्म समजण्यास आयास पडत नाहींत. ह्मणून प्रथम, त्याविषयीं दोन शब्द लिहूं. प्रस्तुत विषयासंबंधानें मनन करण्यास व तदनुसार यथाशक्ति प्रयोगसिद्ध सुधारणा करण्यास या लेकास आज जवळ जवळ दहा वर्षें सवड सांपडली आहे. त्यास बी. ए. पदवीकरितां जें मानस शास्त्राचें अध्ययन करावें लागलें होतें तें अगदीं तुटपुंजें व वरकांती वाटून, व विश्वविद्यालयाची पदवी ही केवळ ज्ञानमार्गदर्शिका आहे असें सहज त्याचे मनांत येऊन, त्यानें हौसेनें तद्विषयक अवान्तर ग्रंथ वाचून, आपली जिज्ञासा यथाशक्ति व यथावकाश तृप्त करून घेतांना त्या शास्त्रानुसार घरीं बसल्या बसल्या प्रयोग करून पाहिले आहेत. त्यावरून प्रस्तुत निबंध लिहिणारा किपत अधिकारी आहे हें सहज कळून येईल.

आतां आपण प्रस्तुत विषयांत कोणकोणते प्रश्नांचा उलगडा करावयाचा आहे तें पाहूं. आईबाप व मुलें यांचे परस्पर धर्म काय हा मुद्देगोष्टीवरील प्रश्न खरा. पण त्याचे अगोदरचा लागू गोष्टीवरील प्रश्न हा आहे कीं, विवाह व प्रजोत्पादन यांचा व्यक्तीशीं व समाजाशीं काय संबंध आहे. हा प्रश्न अगोदर काढण्याचें कारण उघड आहे. आईबाप हें नातें विवाहसंबंधांतून उद्भवतें व त्यांचें निकटवर्ति कारण प्रजोत्पादन हें आहे. तेव्हां वरील मुद्देगोष्टीवरील पहिला प्रश्न ह्मणून लिहिला आहे तो दुसरा झाला. आतां हा प्रश्न फार मोघम आहे. ह्मणजे याचे पोटांत तीन उघड उघड प्रश्न येतात. मुलांस वाढविण्याविषयीं, त्यांस विद्या देण्याविषयीं, व त्यांनींही आईबापांची थोरवी ओळखण्याविषयीं. तेव्हां तिसरा, चौथा, पांचवा असे तीन आणखी प्रश्न झाले. आतां आईबाप व मुलें यांच्या संबंधांत आजपर्यंत आपणांत झालेल्या रूपांतरा-

विषयीं मुद्दे--गोष्टीवरचा दुय्यम प्रश्न होय. त्यांत प्राचीन व अर्वाचीन स्थितिदर्शक असा ६ वा व ७ वा प्रश्न झाले व अर्वाचीन स्थिति सुधारणेविषयींचा लागू गोष्टीवरील प्रश्न ८ वा व अखेरचा ओघानें आला.

आतां या प्रश्नाचा क्रम नीट लक्ष्यांत येण्याकरतां, ते एकाखालीं एक असे आपण मांडून पाहूं. ते येणेंप्रमाणें:——

(१) विवाह व प्रजोत्पादन यांचा व्यक्तीशीं व समाजाशीं काय संबंध आहे?

(२) आईबाप व मुलें यांचे परस्परधर्म काय आहेत?

(३) आईबापांचें मुलांचे शरीराविषयीं कर्तव्य काय आहे?

(४) आईबापांचें मुलांचे शिक्षणाविषयीं कर्तव्य काय आहे?

(५) मुलांचें आईबापांविषयीं कर्तव्य काय आहे?

(६) प्राचीन काळापासून आजपर्यंत आईबापांची थोरवी केवढी होती?

(७) आतां हें बंधन कसें शिथिल होत आहे?

(८) तें पूर्ववत् दृढ करण्यास काय केलें पाहिजे?

या आठ प्रश्नांचा विचार करतांना, इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, आरोग्यशास्त्र, नीतिशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादि महत्त्वाच्या विषयांचा आधार यथावकाश दाखवावा लागणार आहे. तसेंच त्यांचे स्पष्टीकरणार्थ स्वताचा व दुसऱ्याचा अनुभव जागोजाग द्यावा लागणार आहे. सारांश प्रस्तुत विषय फार व्यापक आहे. त्याचें माहात्म्य जितकें सांगावें, तितकें थोडेंच होणार आहे. नैय्यायिकांचे भाषेंत बोलणें झाल्यास, प्रस्तुत विषयविवेचन ह्मणजे 'वृद्धकुमारीवाक्यन्याया' चें एक स्पष्टीकरणच होय. राष्ट्रभक्तांची भाषा वापरणें असल्यास, राष्ट्राची उन्नति ज्या एका कल्पनेच्या आधारावर होणारी आहे, ती प्रस्तुत विषयान्तर्गतच होय. तरी,

'मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः'

असा प्रकार घडून येण्यास या विषयावर मराठींत, संस्कृतांत किंवा इंग्रजींत मान्य असा साग्र ग्रंथ असल्याचें आढळून न आल्यामुळें, त्यावर निबंध लिहिणाराची चांगलीच अंधळी कोशिंबीर उडणार आहे. असो. असा महत्त्वाचा विषय श्रीमंत महाराज सर सयाजीराव गायकवाड जी. सी. एस्. आय्. यासारख्या सुशिक्षित संस्थानाधिपतींनीं सध्यांच्या चळवळीच्या काळांत लोकचर्चेकरतां विद्वज्जनांसमोर आणला आहे व अशा रीतीनें तरूण पिढीचें लक्ष्य आपल्या भावी प्रजेकडे लागणार आहे ही आनंदाची गोष्ट आहे. आतां आपण वर दिलेल्या प्रश्नांचा क्रमवार विचार करूं. (१) पहिला प्रश्न हा आहे कीं, विवाह व प्रजोत्पादन यांचा व्यक्तीशीं व समाजाशीं काय संबंध आहे. मनुष्याच्या आयुष्य-क्रमांत विवाह व प्रजोत्पादन या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आहेत. त्यांचा जसा व्यक्तीशीं तसा समाजाशींहि निकट संबंध आहे. जसें हातपायास सुखदुःख तें शरीरास सुखदुःख, हातपायांची वाढ, ती शरीराची वाढ; तसें, व्यक्तीस सुखदुःख तें समाजास सुखदुःख, व्यक्तीची वाढ ती समाजाची वाढ, फरक कायतो इतकाच कीं, हातपाय व व्यक्ति यांचें स्थित्यंतर तत्काळ कळतें; पण शरीर व समाज यांचें स्थित्यंतर कळण्यास कालावधि लागते. अतएव, स्पेन्सरसारखे इंग्रजी महत्तत्ववेत्ते विवाह व प्रजोत्पादन यांस आत्मसामाजिक नीतींत धरतात.

प्रत्येकास आपली वासना तृप्त करून घ्यावी व तेणेंकरून आपली वंशवृद्धि करावी असें वाटणें हा मनुष्यस्वभाव आहे. हें लक्षांत आणून धर्मशास्त्रकारांनीं लग्नाचें बंधन निर्माण केलें आहे. आपल्या + शास्त्राप्रमाणें ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, गांधर्व, राक्षस, व पैशाच असे आठ विवाह आहेत. त्यांपैकीं पहिले चार मान्य व दुसरे चार अमान्य आहेत. ह्मणजे पहिले चार प्रकार द्विजांत (ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांत) व दुसरे चार शूद्रांत व अनार्यांत प्रचलित होते. अथवा, उलट क्रमानें लग्नाची

+ याज्ञवल्क्यस्मृतींतील व्यवहाराध्याय पहा.

उत्क्रांति होऊन, सध्यांचा ब्राह्मविवाह कसा सर्वत्र प्रचलित झाला आहे हें आपणास त्या आठ प्रकारांवरून कळतें.

अशा लग्नांत वर चोवीसपासून बत्तिस वर्षांचा असे व वधू आठपासून चौदा पंधरा वर्षांची असे. ह्मणजे लग्नसमयीं वर स्वताचें व आपल्या संततीचें पोषण करण्यास समर्थ असे; वधूहि शिकलेली असल्यामुळें आपल्या पतीस गृहकृत्यांत मदत करून, त्याची 'अर्धांगी' बनून आपल्या माहेरच्या नातलगांचे आशीर्वादाहून अधिक कर्तबगारी करून दाखवित असे. याप्रमाणें प्रजोत्पादनांत आईबापांस जी मनस्वी शारीरिक व मानसिक झीज सोसावी लागते ती तें आनंदानें सोशीत असत. दुसरें असें कीं; संततीचें उत्पादन, तिचें लालनपालन, व तिचें शिक्षण या बाबी हातीं घेतल्यानें, आपल्या वाडवडिलांनीं आपणास जन्म दिला, आपणास लहानाचें मोठें केलें, आपणास पोटाचे मार्गास लाविलें; तर पुढच्या पिढीसाठीं आपणहि तसेंच केलें पाहिजे, ह्मणजे आपण 'पितृऋण' फेडल्यासारखें होईल. वडिलांची सेवा ह्यातारपणीं करूनच तें फिटत नसतें. मातृगया व पितृगया करूनच तें फिटत नसतें. त्यांच्या अवशिष्ट इच्छा तृप्त करणें यासच 'पितृतर्पण' ह्मणतात. नुसतें त्यांचे नावानें पाणी सोडणें ह्मणजेच 'पितृतर्पण' नव्हे. तिसरें असें कीं, आपणास जें वडिलोपार्जित धन वारसानें किंवा बक्षिसाचे रूपानें किंवा मृत्युपत्रार्पित देणगीनें मिळतें, त्याचा विशिष्ट हेतु वंश-वृद्धि हाच होय. ह्मणून मुलेंबाळें असणें ही पुण्याई समजत असत. उलट ज्यास त्यांची वाण असे, त्याचे घरीं अन्न घेऊं नये असें समजत असत. आतां या समजुती केवळ वेडगळ आहेत अशांतला भाग मुळींच नाहीं. त्यांत तथ्यांश आहे हें अगदीं उघड आहे. मानव-जाति कायम राखणें ही गोष्ट सर्वमान्य आहे. तेव्हां तिजसंबंधीं झीज सोसणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे. प्राचीन काळीं आर्यलोकांची वसति हिंदुस्थानांत जेव्हां नवीनच झाली होती; जेव्हां त्यांना अनार्यांशीं

× 'भारतीय साम्राज्य', भाग ६ पूर्वार्ध, पृ. ७१ पहा.

झगडण्याचे प्रसंग वरचेवर येत असत; तेव्हां, तर त्यास पुत्रांची अवश्यकता फार भासत असे. कारण पुत्र नित्यास ' पुत् ' नांवाच्या नरकापासून वांचवून स्वर्गप्राप्ति करून देत असे; पिण्डदानानें पितरांस, वेदाध्ययनानें ऋषींस व यज्ञयागानें देवांस संतुष्ट करीत असे. याचें तात्पर्य असें कीं, त्याकाळीं कुटुंबरक्षणार्थ पुत्रपौत्रादि वंश अवश्य असे. आपल्या बापाबरोबर किंवा त्याचे मागें अनार्य शत्रूंशीं लढण्यास व आपली नवी वसाहत कायम राखण्यास त्यांचें पाठबळ मोठें असे. पण आर्यलोकांचा समाज मोठा झाल्यावर व त्यांची वसति चोहोंकडे फांकल्यावर, प्रजोत्पादनानेंच पितृऋण फिटतें, ही संकुचित कल्पना नष्टप्राय होऊन, गृहस्थाश्रमाशिवाय एकदम संन्यास घेतला तरीहि जीवितसाफल्य होतें असें लोकमत झालें.

वरील विवेचनावरून विवाह व प्रजोत्पादन हीं आत्मसामाजिक नीतीस कितपत धरून आहेत याची आपणास अटकळ बांधतां येईल तरी

[१] बालविवाह व

[२] बहुप्रजत्व

या गोष्टी अनीतिमूलक आहेत असें आपल्या सहज ध्यनांत येईल. कारण लग्न ह्मणजे प्रजोत्पादन व प्रजापालन हीं दोन्हीं जबाबदारीचीं कामें, शारीरिक परिपक्वता प्राप्त न झाल्यामुळें व द्रव्यसंपादनाचें सामर्थ्य अंगीं न आल्यामुळें, आईबापांचे हातून पार पडत नसतील, तर तशा नादान मनुष्यांनीं स्वतः लग्न करणें ह्मणजे सव्वा मणाची बिडी पायांत अडकावून घेणें होय, किंवा नीतिदृष्टया मोठा गुन्हा करणें होय.

अलीकडे परचक्रांत असणाऱ्या हीन दीन महाराष्ट्रांत ' अष्टपुत्रा भव ' दशपुत्रा भवेन्माता ' या वचनांचा ज्या कुटुंबांत प्रत्यय येतो, त्यांची चेष्टा मात्र होते. याचें कारण अगदीं उघड आहे. ' ऊर्ध्वायै दिशे ब्रह्मणे नमः ' अशासारखी स्थिति दिवसेंदिवस येत चालल्यामुळें पुष्कळ मुलें

हा अवदसेचा पाया समजतात; व अलीकडे आपल्यांत अशी एक ह्मण होऊन बसली आहे कीं,

बहु बाळ, त्याला बहु जाळ

सबब तीं न होण्याविषयीं एखादें यंत्रतंत्र किंवा दवादारू निघाल्यास, आपण तें घेण्यास एका पायावर तयार आहोंत असें मित्रमंडळीसमोर विनोदानें बोलण्याचा प्रसंग बऱ्याच जणांना येत आहे ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे.

प्रजननाच्या सिद्धान्ता (Law of Population) प्रमाणें आपलें अन्न जसजसें निकस असेल, तसतशी आपली प्रजा वाढत जाते. ह्मणजे दारिद्य हें आपल्यांतील बहुप्रजत्वाचें ' समवायि कारण ' ठरतें. त्याचें ' असमवायि ' व ' निमित्त कारण ' किंवा निदान जो ' बालविवाह ' त्यावर ' मूले कुठारः ' या न्यायानें घाव घालण्यास समाज अद्यापि एकदिलानें तयार होऊन पुढें सरसावलेला नाहीं. पण त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट ही कीं, आमचे विद्वान् समाजाग्रणी आपल्या विवाह-पद्धतीची किंमत पूर्णपणें ओळखून आहेत. त्यांना हें ठाऊक आहे कीं, ती हिंदुस्थानासारख्या उष्णकटिबंधांतल्या स्थितीस अनुसरून आहे; ती आज शतकेंच्या शतकें अबाधित चालू असून, ती अनेक रीतीनें फायदेशीर आहे; तीमुळें कुटुंबांत स्वस्थता, शांतता व सौख्य हीं नांदत असून, स्त्रीजातीचे सद्गुणास व विनयास बाध येत नाहीं; एवढ्यावरून ती सुधारलेल्या लोकांसहि अनुकरणीय वाटत आहे; तींत गोम काय ती एवढीच कीं, लग्नकालीं वधूवरांचें वय जरा जास्त प्रमाणाचें असलें पाहिजे. डॉ. सखाराम अर्जुन एल्. एम्. यांनीं मुंबई हेमंतव्याख्यानमालेंतील ' विवाहविज्ञान ' या व्याख्यानांत आरोग्यरक्षणाचे सबबीवर असें बालविवाहा-विरुद्ध प्रतिपादन केलें आहे. ' हिंदी सामाजिक परिषद् ' तरी दरवर्षीं हेंच लोकांपुढें मांडीत आहे. रा. सा. नारायण भवानराव पावगी यांनीं आपल्या ' भारतीय साम्राज्या ' सारख्या प्रचंड ग्रंथांत असेंच विधान केलें आहे. रा. ब. चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल्एल्. बी.

यांनीं * ‘ अबलोन्नतिलेखमाले ’ सारख्या लोकमान्य लेखांत तर शास्त्राधार शोधून, त्याचा शहानिशा करून, व लोकसमजुतीस धरून, चर्चा चालविली आहे. त्यांच्या ह्मणण्याचा मथितार्थ प्रत्येक देशबंधूनें विचार करून, तदनुसार वर्तनानें तो खरा करून दाखविण्यासारखा आहे. ह्मणून त्याचा उल्लेख करणें येथें अवश्य आहे. विधवापुनर्विवाहसुधारणेपेक्षां बालवैधव्यनाशक, राष्ट्रीयोत्कर्षकारक, शास्त्रलोकमतानुकूल अशी बालविवाहसुधारणा तीन मार्गांनीं सहज करतां येण्यासारखी आहे.

(१) मुलींचीं लग्नें ऋतुप्राप्तीनंतर ३ वर्षांत करणें;

(२) मुलींचीं लग्नें सवडीप्रमाणें विवाहहोमापर्यंत करून, ऋतुप्राप्तीनंतर मुलीस माहेरी ठेवणें व नंतर सप्तपदीचा विधि उरकणें;

(३) मुलींचीं लग्नें १२ वर्षांनंतर करून ऋतुप्राप्तीपर्यंत त्यांस माहेरीं ठेवणें.

या तीन उपायांपैकीं शेवटचा तूर्त साध्य दिसतो, असें प्रस्तुत ग्रंथकारानें आपल्या कन्येच्याच विवाहानें सोदाहरण सिद्ध करून दाखविलें आहे. तसेंच, विद्वान् देशसेवक केसरीकार यांनीं आपल्या कन्येचा असाच प्रौढविवाह केलेला आहे. महाराष्ट्रांत अशी चळवळ हळूहळू सुरू झाली आहे.

तद्वत् ह्मैसूरचे माजी लोकप्रिय महाराज चामराजेंद्र उदयार व श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांसारख्या सुशिक्षित संस्थानिकांनीं सयुक्तिक कायद्याचे उपाय योजून इतरांस उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे. देशी संस्थानांतील अनुभव पाहून, राजकार्यधुरंधर इंग्रज सरकार लोकमतानुसार या बाबतींत कायदा करण्यास मागेंपुढें करणार नाहीं असें दिसतें.

असो. बालविवाहप्रतिबंधानें बहुप्रजत्वास बराच आळा बसतो. यासंबंधी एक उदाहरण येथें देण्यासारखें आहे. मुंबईतील एक जुने लोकप्रसिद्ध वैद्य ह्मणत कीं “ माझें लग्न पसतिसावें वर्षीं झालें होतें. मला ४० व्या वर्षीं पहिला मुलगा झाला. पण तो आज ४० वर्षांचा आहे.

* पुस्तक ६ (पूर्वार्ध) पृ. ८१, लेख ७ पृ. ६० पहा.

त्यास ९ मुलें झालीं आहेत! त्याची शरीरसंपत्ति व माझी शरीरसंपत्ति यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे हें तुह्मी पाहतांच! मी इतका वयातीत झालों आहें, तरी माझी शक्ति व उमेद त्याच्याहून किती तरी अधिक आहे! खरोखर विवाहाअगोदर दीर्घकाळ ब्रह्मचर्य पाळण्याचा हा हितकर परिणाम होय हें कोणाहि सुज्ञ वाचकांस निराळें सांगणें नलगे. तसेंच वैवाहिक स्थितींतहि तें पाळणें हें आईबाप होऊं पाहणाऱ्यांचें आद्यकर्तव्य आहे. तें त्यांच्या तसेंच त्यांच्या भावी प्रजेच्या आरोग्यास हितकर व बहुप्रजत्वास प्रतिबंधक आहे. मनुस्मृतींतील स्त्रीगमनास निंद्य दिवस कोणत्याहि तत्वावर ठरविलेले असले, तरी ते स्पेन्सरीय आत्मसामाजिक नीतिदृष्ट्या मान्य आहेत. मनूनें तर असें ह्मटलें आहे कीं अशा निंद्य दिवशीं स्त्रीगमन न करणाऱ्या मनुष्याचें ब्रह्मचर्यव्रत अखंडित रहातें, मग तो कोणत्याहि आश्रमांत असेना. यासंबंधी त्याचें वचन असें आहे

निंद्यास्वष्टासु चान्यासु स्त्रियो रात्रिषु वर्जयन् ।
ब्रह्मचार्येव भवति यत्र तत्राश्रमे वसन् ॥

मनुस्मृतिः, अ० ३ श्लो० ५०.

इंद्रियविज्ञानशास्त्रदृष्ट्या विचार केला, तरी वैवाहिक स्थितींत असा नेमस्तपणा राखणें इष्ट आहे. डॉ० ट्रॉल यांच्या मतें, स्त्रीगमन आठवड्यांतून एकदां बस आहे. व उपदंशासारख्या महाव्याधीनें पीडित व सुरापानासारख्या घोरछंदानें भडकलेल्या दंपत्यानें विषयसुखाचा अनुभव घेऊन आपल्या भावी प्रजेचें मातेरें करणें व त्यांचे शिव्याशाप घेणें हें अत्यंत लज्जास्पद आहे. ' बीजांकुरन्याय '* सदा मनांत वागवून, प्रत्येक दंपत्यानें आपलें आचरण पायाशुद्ध ठेविलें ह्मणजे त्यांस आपलें स्वतःचें आरोग्य,

---

* या न्यायाप्रमाणें, मराठींत या ह्मणी आहेत, ' खाण, तशी माती ' ' गोमट्या झाडाचीं गोमटीं फळें ' (तुकोबा); ग्रीकलोकांत अशी ह्मण आहे Bad crow bad eggs [वाईट कावळा असल्यास, त्याचीं अंडींहि वाईट]; इंग्रजलोकांत अशी ह्मण आहे 'The fruit does not fall far from the tree ' झाडासारखें फळ.

आपल्या मुलाबाळांचें आरोग्य साधतां येईल. व बहुप्रजत्वासारखा अनिष्ट प्रसंग टाळतां येईल. यासंबंधीं या लेखकानें यथाशक्ति ‘ ब्रह्मचर्य ’ ही निबंधरचना करून व तदंगभूत तत्त्वानुसार आचरण करून, त्याचा ताळमेळ कसा जमतो तो पाहिला आहे; व त्यावरून त्याची बालंबाल खात्री झाली आहे कीं बालविवाहसुधारणा ही जशी सध्यां अवश्य आहे तशीच किंबहुना त्याहूनहि अधिक अवश्य वैवाहिक स्थितींतील ‘ ब्रह्मचर्य ’ अवश्य आहे. याचें पुष्टीकरण ठाणेंकर रा. रा. प्रधान यांनीं नुकतें आपली प्रतिकृति * ‘ गृहस्थाश्रम व ब्रह्मचर्य ’ हींत केलें आहे.

बालविवाह व बहुप्रजत्व हे प्रकार जसे अनीतिमूलक आहेत, तसे दरिद्रावस्थेंत लग्न करून, आपल्या मुलाबाळांस डोईजड कर्ज फेडण्याकरतां अनेक विपत्ति भोगण्यास लावणें हेंहि अनीतिमूलक आहे. कारण, चाणक्यासारख्या महाविद्वान् नीतिकारानें असें ह्मटलें आहे.

ऋणकर्ता पिता शत्रुः

तसेंच त्यानें आणखी एके ठिकाणीं असें चकचकित ह्मटलें आहे,

‘ माता शत्रुः पिता वैरी येन बालो न पाठितः ।
न शोभते सभामध्ये हंसमध्यें बको यथा ॥

[ज्या आईबापांनीं मुलांस क्षिक्षण दिलें नाहीं ते त्याचे शत्रु होत. कारण, जसा हंसामध्यें बगळा शोभत नाहीं, तसा सभेमध्यें तो शोभत नाहीं.]

यावरून हें उघड आहे कीं, प्रजोत्पादनापासून होणारें सुख भोगणें व मुलाबाळांचें कल्याणाकडे दुर्लक्ष करणें व तत्संबंधीं जबाबदारी लोकांवर टाकणें, त्यांस मधुकरी वृत्तीनें वारावर, कोरान्नावर, खिचडीवर, वर्गणीवर किंवा अनाथगृहावर आपला उदरनिर्वाह करण्यास, शिक्षण संपादन करण्यास लावणें हें गैर आहे. अशी जबाबदारी विनाकारण समाजावर व सरकारावर ढकलणें हें प्रशस्त नाहीं. मनुष्येतर प्राणिमात्रांत, पशुपक्ष्यांत आपापल्या संततीच्या संवर्धनाचा तो नियम असतां, मनुष्यकोटींत मात्र

* ग्रंथमाला अंक ११२ पहा.

मोडला जावा हें विलक्षण आहे. समर्थांनीं कष्ट करून दुर्बलांस कां पोसावें? ‘ उत्तमांचा टिकाव ’ हा जो सृष्टिनियम आहे त्याप्रमाणें दुर्बलांस कां मरूं देऊं नये? त्यांस जिवंत राहूं दिलें, तर कांहीं पिढ्यांनीं सर्व राष्ट्रच्याराष्ट्र दुबळें होणार नाहीं काय? गरीबांबाबत कायदा व खेड्यापाड्यांतील धर्मादाय हे फुकट ‘ अव्यापारेषु ’ व्यापार नाहींत काय?

प्रथमदर्शनीं ही चाणक्य स्पेन्सरीय विचारसरणी बरी दिसेल. पण जरा विचार केला तर ती दूरवर विचार करून केलेली आहे असें दिसत नाहीं; ती एकतर्फी आहे असें सहज दिसून येईल. सदरहू कोटिक्रमांत ज्या असंमत ब्रह्मचर्याकडे रोंख आहे, तें सुशिक्षितांस साध्य आहे. गहन विषय आकलन करण्यास जसा तो वर्ग समर्थ आहे, तसा ब्रह्मचर्याचा अभ्यास करण्यासहि तोच वर्ग समर्थ आहे. कारण त्यांना चित्तनिग्रह करतां येतो व चित्तनिग्रहानें शक्तिरक्षण होतें. शुक्रनीतींत असें ह्मटलें आहे.—

चित्तायत्तं नृणां शुक्रम् ।

गीतेंतहि श्रीकृष्णानें अर्जुनासारख्या अधिकारी शिष्यास असा उपदेश केला आहे.—

अभ्यासेनैव कौंतेय वैराग्येण च गृह्यते ।

व वेदांत, प्रजापतीनें आपले तीन पुत्र, देव, मनुष्य व असुर यांस विद्यासंपन्न करून, त्यांस एकाक्षरी उपदेश ‘ दा ’ असा केला आहे. त्यावर टीका करतांना, श्रीशंकराचार्य लिहितात कीं, देव ह्मणजे ज्यांनीं आपल्या इच्छा आवरल्या नाहींत, तीं माणसें; मनुष्यें ह्मणजे त्यांना लोभ फार आहे, तीं माणसें; असुर ह्मणजे ज्यांना रक्तपात करण्यांत आनंद वाटतो, तीं माणसें. या दृष्टीनें प्रजापतीचे तीन पुत्र ह्मणजे सर्व मनुष्यजाति होय. आतां यापैकीं पहिल्या वर्गास ‘ दा ’ हा जो उपदेश केलेला आहे, त्याचा अर्थ ‘ तुह्मी आत्मसंयमन करा ’: दुसऱ्यास तसाच उपदेश केलेला आहे, त्याचा अर्थ ‘ तुह्मी धर्म करा ’. व तिसऱ्यास तसाच उपदेश केलेला आहे, त्याचा अर्थ ‘ तुह्मी दया करा ’. यावरून

कोणास जें काय साध्य आहे, तेंच त्यानें करीत असावें हें ओघानें येतें. व ज्या अज्ञ जनांस ब्रह्मचर्य असंमत नव्हे, असाध्य असतें, त्यांवर तें बळेंच लादून

'दया धरम नहि जावेगा',

हें अखिल भूतलावर अनाद्यनंत काळापासून मान्य असलेलें तत्त्व दडवणें हें तत्त्वज्ञानाचे बेपर्वारूपी तटबंदींत स्वतास कारागृहवास करून घेणारांसच शोभतें! इतरांस त्यांचें काय होय? कार्डिनल मॅनिंग यांचें मत अतएव असें आहे कीं आलस्य व दुर्गुण यांस उत्तेजन न देतां, दरिद्री लोकांस आपण मदत करावी हें आपलें कर्तव्यकर्म आहे; व दरिद्री लोकांचा तसा हक्कहि आपणांवर आहे. 'दररोज नवी प्रजा हजारों वाढत आहे' (A Thousand more Months Every Day)+ हा मान्य लेख लिहून, ड्यूक ऑफ आर्गाइल या विद्वान् इंग्रजी सरदार-बहाद्दरानेंहि वरील मतास अनुमोदन दिलें आहे. या गृहस्थानें आणखी असें लिहिलें आहे कीं अशा प्रजेच्या वृद्धीस प्रतिबंध करणें तर राहिलेंच, पण तिला सन्मार्गास लावणें हें समाजाचें व राष्ट्राचें आद्य कर्तव्य आहे. त्याकरतां त्यांनीं रात्रंदिवस झटलें पाहिजे. नाहीं तर, 'आयत्यावर कोयता' बसावयास वेळ लागणार नाहीं! ह्मणून समाजानें व सरकारनें अशा अनाथ प्रजेस पोटाच्या मार्गास लाविलें पाहिजे. व ह्मणूनच आपल्याकडे मधुकरीवृत्ति, वार, कोरान्न, अन्नछत्र शिष्यवृत्ति व विद्यादान इत्यादि धर्मादायाचे प्रकार अद्यापि चालू आहेत; व ते संपुष्टांत आणूं पाहणें हें विघ्नसंतोषीपणाचें लक्षण होय. आतां ते नष्टप्राय झाले असते तर कुंटे, आपटे, इत्यादि मंडळी वर डोकीं काढती काय? या गोष्टींचा विचार करूनच, इतर उच्च जातींतहि त्यांचें अनुकरण सुरू होऊन, त्यास आपापल्या समाजांत सत्पात्रीं दान करतां येऊन, त्यांचें रक्षण करतां येत आहे. मागसलेल्या जातीस प्राथमिक,

---

+ 'एकोणिसावें शतक' (The Nineteenth Century) या जगन्मान्य इंग्रजी मासिकपुस्तकाचा १४३ वा अंक पहा.

औद्योगिक, नैतिक व धार्मिक शिक्षण दिलें पाहिजे व त्या दिशेनें जे अकटो-विकट यत्न करीत असतील त्यांस आपण हस्तेंपरहस्तें मदत केली पाहिजे; हिंदु एज्युकेशनफंड, धर्मादायार्थ शाळा, अनाथबालिकाश्रम, मुंबईसारख्या शहरांतून अनाथगृहें, रात्रींच्या शाळा, इत्यादि प्रयत्न ज्यांनीं चालविले आहेत त्या महात्म्यास असंख्य आईबापांचे धन्यवाद ऐकून कृतार्थता वाटत असेलच. अशांस उत्तेजन देणें हें आपलें काम आहे. एवढेंच नव्हे, तर अमेरिका, स्वीडन, नॉर्वे, जर्मनी इत्यादि देशांतरीं ज्या गरीब आईबापांना आपल्या मुलांस शिक्षण देववत नाहीं, त्यांच्याजवळून सरकार तीं मुलें आपल्या ताब्यांत घेऊन त्यांस सक्तीनें पण फुकट सार्वजनिक शाळांतून (Detention Homes) अवश्य तें शिक्षण देतें व मग त्यांस पोटाचा उद्योग करूं देतें. श्रीमंत गायवाड सरकारांनीं या दिशेनें अल्पप्रयोग करून पाहिलेला आहे. तो सिद्धीस गेलेला पाहून इतर संस्थानांनीं आपले हातपाय हालविणें इष्ट आहे. कारण हें जरी खरें आहे कीं दारिद्र्य हा शतमुखी राक्षस आहे, त्याचीं जितकीं डोकीं उडवावींत तितकीं तेथें फिरून नवीं येतात; तरी जोंपर्यंत समाजांत सत्पात्रीं दान करण्याची बुद्धि जागृत आहे तोंपर्यंत त्याची मोठीशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं! अतएव मनुष्यमात्रानें उदारवृत्ति धारण करावी असा आपले शास्त्रकार नित्य कंठशोष करीत असतात. ते ह्मणतात—

परिवर्तिनि संसारे मृतःकोऽवा न जायते।
स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम् × ॥

व याच उत्कृष्ट मताचा सुंदर अनुवाद पंडित जगन्नाथराय या कविसिंहानें असा केला आहे—

अन्याजगद्धितमयी मनसः प्रवृत्तिर
अन्यैव कापि रचना वचनावलीनाम्।

× " जगाच्या रहाटींत मेलेला कोण मनुष्य जन्मास येत नाहीं? जो जन्मून आपल्या वंशाचा उद्धार करतो, तोच जन्मलेला होय!"

लोकोत्तरा च कृतिराकृतिरार्यहृद्या
विद्यावतां सकलमेव गिरां दवीयः + ॥

(२) दुसरा प्रश्न असा कीं, आईबाप व मुलें यांचे परस्पर धर्म काय आहेत. हे कौटुंबिक धर्म प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें लग्न या संस्थेपासून निघतात. ती संस्था अस्तिवांत आसल्यामुळें स्त्रीची निकृष्टावस्था जाऊन, ती उच्चपदास पोचली आहे; अपरंपार जो लोकसमुदाय त्याचीं वेगवेगळीं कुटुंबें बनलीं आहेत; गृहव्यवस्था ह्मणजे एक राज्यकारभारच होऊन बसला आहे; भावी प्रजेकरितां प्रेमामुळें मनुष्यानें आपले विचार नमूद करून ठेविले आहेत; समाजाविषयीं मनुष्याची सहानुभूति वृद्धिंगत झाली आहे असें बेंथ्यामसारख्या महान् इंग्रजी कायदेपंडिताचें मत आहे. अशा विवाहपद्धतीविषयीं आपले आचारविचार काय असत याचें विवेचन मागें प्रसंगानुसार आलें आहे. विवाहामुळें पहिलें नातें नवराबायकोचें उत्पन्न होतें; व दुसरें ह्मटलें ह्मणजे आईबापाचें हें होय. पहिल्या नात्यानें, नवराबायकोचा परस्पर हक्क जसा हा आहे कीं एकानें दुसऱ्यास सोडूं नये; तसा दुसऱ्या नात्यानें, आईबापांचा मुलांवर असा हक्क आहे कीं, तीं सज्ञान होईपर्यंत त्यांनीं आपल्या देखरेखीखालीं रहावें व आपली कमाई आईबापास द्यावी. ही ईश्वरी योजना आहे असेंही सहज वाटतें. कारण आपल्या अज्ञानावस्थेंत आपलें अपायांपासून रक्षण करण्याकरितां, स्वतः कष्ट करून आपलें पोषण करण्याकरितां, व स्वतःचे किंवा शिक्षकाचे सदुदाहरणानें शहाणें करण्याकरतां, आईबापांस ईश्वरानें नेमिलेलें आहे असें प्रत्येक सुधारलेल्या समाजांत समजतात. या आईबापांच्या हक्काचें उलंघन मुलें चोरून नेणें व मुलांस फितविणें किंवा पळविणें यांनीं होतें हें हिंदी दंडनीतीचे

+ " विद्वान् लोकांचें सर्व कांहीं अवर्णनीय असतें; त्यांच्या मनाचा विलक्षण कल जगाचे कल्याणाकडे असतो; त्यांची भाषणशैली कांहीं विलक्षण असते; त्यांची कर्तबगारी विलक्षण असते; त्यांचे शरीराची ठेवण मोठे लोकांचे मनांत भरण्यासारखी असते. "

वाचकांस अवगत आहेच. आईबापांचें परस्पराशीं पटेनासें झाल्यास ह्मणजे त्यांच्यांत घटस्फोटाचा प्रसंग आल्यास मुलें कोणाजवळ रहावीं व त्यांची कमाई कोणत्या प्रमाणानें वाटून द्यावी हें ठरविण्याची अवश्यकता उत्पन्न होते. पण समाधानाची गोष्ट ही कीं घटस्फोटाचें बंड उच्चवर्णांत प्राचीनकाळापासून मुळींच नाहीं. कुटुंबांतील गृहसुख तें त्यांसच ठाऊक. आतां अलीकडील पाश्चात्त्य सुधारणेचें वारें लागल्यामुळें रखमाईच्या मुकदम्यासारखा क्वचित् एखाद दुसरा मुकदमा कोर्टासमोर येत असेल. पण तिकडे बहुजनसमाजाची प्रवृत्ति न व्हावी ह्मणून ' तरुणीशिक्षणा ' सारखे झोंबणारे झणझणित रामबाण उपायहि निघतात.

हा आईबापांचा मुलावरील हक्क त्यांच्या जन्मापासून व मुलगा मुलगी दत्तक असल्यास त्यांच्या दत्तविधानापासून सुरू होतो. हा हक्क दुसऱ्याचे हातीं देतां येतो. मूल शाळेंत घातलें किंवा गुरुगृहीं ठेविलें किंवा दुकानावर उमेदवार ठेविलें कीं त्या शाळामास्तरास, गुरूस, किंवा दुकानदारास तो हक्क आपले चेल्यावर चालवितां येतो. आईबाप किंवा मूल गत झाल्यास, मूल दत्तक दिल्यास, तें × सज्ञान झाल्यास तो नष्ट होतो.

आईबापांनीं, मूल अज्ञान असतां, त्यावर आपला हक्क गाजवावयाचा ह्मणजे त्यास कह्यांत ठेवण्याकरतां बेताबाताचें शासन * करणें व त्यास आडमार्गास न जाऊं देणें हें होय: उलट अशा अज्ञान मुलाचा आपल्या आईबापावर असा हक्क आहे कीं, त्याच्या अज्ञान दशेंत त्यांनीं त्याचें पालनपोषण केलें पाहिजे. तसें त्यांनीं न केल्यास, तो हिंदी दंडनीतीचे दृष्टीनें गुन्हा होतो हें सुजाण वाचकांस अवगत आहे.

× बापाचा जोडा मुलाचे पायास येऊं लागला कीं बापानें त्याला बरोबरीचे नात्यानें वागवावें. अशी नीतिशास्त्रकारांची आज्ञा आहे:—

प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ॥ चाणक्यः ॥

*— ह्मणतात लालने बहवो दोषास्ताडने बहवो गुणाः ॥

या उलट आईबापाकडून मुलास कोणत्याहि तऱ्हेची धनदौलत न मिळाली तरी त्यानें सज्ञान झाल्यावर व पोटाच्या मार्गास लागल्यावर नुसतें आज्ञाधारक रहावें; एवढेंच नव्हे तर, त्यानें त्यांचा चरितार्थहि चालविला पाहिजे; असें मद्रास हायकोर्टानें सुब्रह्मण्यम् वि. सुबाका या मुकदम्यांत प्रतिपादन केलें आहे. हाच मुलांचा धर्म आपल्या एका जुन्या ह्मणींत व्यक्त केला आहे. ती ही—

‘ असतील बाळ तर फेडतील काळ ’

एवढेंच करून, मुलांनीं स्वस्थ राहूं नये. त्यांनीं वेणीसंहार नाटकांतील प्रसिद्ध योद्ध्याप्रमाणें असेंहि ह्मणण्याची तयारी ठेविली पाहिजे–

दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरुषम् ।

अशा रीतीनें मुलें आईबापाविषयीं कृतज्ञता न दर्शवितील, तर त्यांचें काळें तोंड कोणी ढुंकूनसुद्धां पहाणार नाहीं. त्यांस जो तो निंदाव्यंजक शब्दांनीं असें ताडन करील कीं,

‘ कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ !

ख्रिस्ती धर्मानुसार उद्धट सैतानास जसा अधःपात झालेला आहे, तसा अशा उद्धट मुलास फार प्राचीन काळापासून अधःपाताचें शासन लिहून ठेवलेलें आहे. महाभारतांत असें ह्मटलें आहे कीं तो जिवंत असून मृतवत् आहे व मेल्यावर त्यास अक्षय्य अधःपाताची शिक्षा भोगावी लागते. ×

(३) तिसरा प्रश्न हा कीं, आईबापांचें मुलांच्या शरीराविषयीं काय कर्तव्य आहे? पहिल्या प्रश्नाचा उलगडा करतांना, विवाह व प्रजोत्पादन जगावर चालणारे हक्क (rights *in rem*) कसे गाजवितां येतात याचा विचार यथाशक्ति केला आहे. दुसरा प्रश्न सोडवितांना,

---

× “ देवतातिथिभृत्यानां पितृणामात्मनश्च यः ।
न गीर्वपति पंचानामुच्छ्वसन्न स जीवति ॥
वेदे तु धर्मशास्त्रेषु मिथ्या यो वै द्विजातिषु ।
देवेषु पितृधर्मेषु सोऽक्षयं नरकं व्रजेत् ॥

आईबाप व मुलें यांचे परस्पर हक्क (rights *in personam*) काय आहेत याचें विवेचन झालें आहे. आतां या पुढील ३ प्रश्नांचा विचार करतांना, या अलीकडील हक्कांचाच विस्तारानें ऊहापोह करावयाचा आहे.

लहान मुलें ह्मणजे एखाद्या राक्षसाच्या भात्यांतील तीरच होत. असा ज्याच्या भाता भरलेला असेल तो गृहस्थ धन्य होय. कच्चेबच्चेवाला अडीअडचणींत सांपडला तर त्याच्या हातापायाशीं कोणी नाहीं असें होत नाहीं. आणि कुटुंबछत्र जो पिता, त्यास असा विश्वासही असतो. कारण पितापुत्र यांत फरक नाहीं. श्रुतींत असें वचन आढळतें कीं,

' आत्मा वै पुत्रनामासि । '

असा वास्तविक प्रकार असल्यामुळें आपण आपलें हितगुज त्याजवळ सांगतों. तारुण्यांत तीं आपणास जीव कीं प्राण असतात. आपणास त्यांचा अभिमान असतो. वृद्धापकाळांत आपणास त्यांचा अंधयष्टिवत् आश्रय असतो. मुलें हीं प्रेमवल्लीचीं फळें आहेत. भवभूति हा महान् संस्कृत नाटककार तर त्यांस मातापित्यांच्या प्रेमरज्जूची गांठ असें ह्मणतो. + तसेंच ज्या प्रीतीपासून तीं उत्पन्न होतात व त्यांपासून पुढें आपणास जो आनंद होतो तीं दोन्ही अवर्णनीय होत. कालिदासासारख्या कविशिरोमणीसही वर्णन करण्याची तशी अडचण वाटूनच कीं काय तो आपल्या कुमारसंभव काव्यांत ह्मणतोः—

मुदे न हृद्या किमु बालकेलिः

व ह्मणून सेनेका या प्रसिद्ध रोमन तत्त्ववेत्त्याची मातुःश्री ह्मणे कीं, " माझीं मुलें हीं माझीं रत्नें आहेत! " व आपल्या एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे ' गृहरत्नानि बालकाः ' व दुसऱ्या एकानें जो त्याचा प्रतिध्वनि केला आहे ' पुत्रहीनं गृहं शून्यम् ', तो अक्षरशः खरा आहे.

\+ " अंतः करणतत्त्वस्य दंपत्योः प्रेमसंश्रयात् ।
आनंदग्रंथिरेकोऽयमपत्यमिति बध्यते ॥

—उत्तररामचरितम् (तृतीयोंऽकः)

आतां तीं गृहरत्नें बनविण्याकरतां आईबापांनीं आपलें वर्तन शुद्ध ठेवलें पाहिजे. आपल्या मुलांच्या मनांत आपणाविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला पाहिजे. आपले आईविषयीं विशेषतः त्याचे मनांत आदर उत्पन्न झाला पाहिजे; व तें जर आईच्या अंगावर पीत असेल, तरच तो उत्पन्न होण्याचा संभव असतो. मुलास 'आई गोड कीं खाई गोड' असा प्रश्न करण्याचा पुढें प्रसंग आल्यास, तें चटकन् आई गोड असा जबाब देतें. व यास कारण आपले शास्त्री लोक असें सांगतात कीं

'मातरमत्ति बालकः'।

व यामुळेंच मुलाचा जीव आईवर जितका असतो तितका दुसऱ्या कोणावर नसतो. त्यास

न मातुः परदैवतम्।

असें बाळपणीं तरी वाटत असतें. प्रेमोत्पादनाचें हें तत्त्व आपल्या मान्य पूर्वजांना पूर्णपणें अवगत होतें. तसें फ्रान्सदेशांतील 'पॉल व व्हर्जिनिया' या सुंदर व जगद्विख्यात कादंबरीचे पित्यासहि तें मान्य होतें. त्या कथेंत मार्गारेट व मॅडम डी लाटूर या दोन आयांनीं आपापलीं मुलें, पॉल व व्हर्जिनिया यांनीं स्तनपान करतेवेळीं अदलाबदल करण्याचा परिपाठ ठेवला होता. त्या दोघीजणी जिवलग मैत्रिणी होत्या. त्यास निरंतर असें वाटे कीं आपला स्नेहसंबंध असाच पुढील पिढीनेंहि चालू ठेवावा व हा हेतु सिद्धीस नेण्यास त्यांनीं वरील उपाय योजिला व तो उत्तम फळासहि आला. ॲडिसन या नामांकित निबंधकारानें अशीच गोष्ट आपल्या प्रसिद्ध 'प्रेक्षक' स्पेक्टेटर नांवाच्या पत्रांत सांगितली आहे. दोघा विषम स्थितींतील मित्रांनीं आपल्या मुलामुलींची अदलाबदल बाळपणापासून करून पुढें त्यांचीं लग्नेंहि लावून दिलीं आहेत. एकाच जातीच्या दोन फुलझाडांवरील दोन कळ्यांच्या फांद्या, शेजारील झाडावर कलम केल्या असतां त्या अधिक फलदायक होतात; तद्वत् त्या आयांचीं मुलें स्तनान्तरानें अत्यंत प्रेमळ निपजतात. या उलट, लांडगीचीं अचुळें चोखणारीं रोम्युलस व रीमस हे लांडगेतोंड करणारे शूर शिपाईगडी निघतात. तीं जगाची राजधानी ह्मणून गाजणाऱ्या 'रोम' नगरीची

प्राणप्रतिष्ठा करतात. या अपवादात्मक गोष्टी सोडून देऊन साधारण नियम पाहूं गेलें तर हा आहे कीं, जिचें तिनें आपलें बालक पाजावें. तें काम दाईवर टाकूं नये. याचें कारण एक तर असें कीं, आईच्या दुधासारखें मुलास दुसरें हितकर अन्न नाहीं. ' गृहिणीकंठभूषण ' या पुस्तकांत डॉ॰ सखाराम अर्जुन एल्. एम्. यांनीं ' बालकाचें अन्न ' या सदराखालीं असें लिहिलें आहे कीं " बालपणच्या तोंडांतील भागाच्या रचनेवरून आणि जठरांत्रादि अंतर इंद्रियांच्या स्थितीवरून आईच्या स्तनांतील दुधासारखा द्रवरूप पदार्थच बालकाचें योग्य अन्न होय. या पदार्थाचे अंगीं असे धर्म असतात कीं, कोणत्याही प्राण्याच्या शरीराचें संरक्षण होऊन, त्याची वृद्धि होण्याला जे पदार्थ आवश्यक आहेत ते त्यांत असतात. " त्यांत शरीररचनेंत ओलावा रहाण्यासाठीं, अनेक रस उत्पन्न होण्यासाठीं पाणी असतें; मज्जा, मांस, इत्यादि उत्पन्न होण्यासाठीं प्राणिज द्रव्य असतें; आणि प्राणिदेहजन्य उष्णता उत्पन्न होण्यासाठीं, ज्वलनास योग्य असे वसामय व शर्करामय पदार्थ असतात. (पृष्ठ ८९) आतां मूल आईचे अंगावर पीत असतां आईस जरी त्रास होत असेल तरी आपल्या प्रिय-बालकाकरितां एवढें सोसणें हें तिचें कर्तव्यकर्म आहे. आई मुलास स्तन-पान देतांना व मधून मधून त्याचें चुंबन घेतांना तिचें चित्र काढणें व तिची त्यावेळची वृत्ति त्यांत खडी करणें हें एखाद्या चित्रकारशिरोमणि राजारविवर्मा यास आनंददायक वाटेल! तें पहाणें तिऱ्हाइतास मोहक वाटेल! पण त्या बालकाचे पित्यास त्याचें केवढें कौतुक वाटेल हें या लेखणींतून उतरणें कठीण आहे.

पण मूल दाईचे अंगावर पिऊं लागलें ह्मणजे त्याची आईवरची माया तेवढी कमी होते. दाईची संवय त्यास झालेली असल्यामुळें तें प्रत्यक्ष आपल्या आईजवळ जाण्यास खुषी नुसतें. अशा रीतीनें त्याची माया तोडणें हें रास्त नाहीं असें कोणाही चाणाक्ष वाचकास वाटेल. दुसरें असें कीं दाईच्या मुलाचे पोटावर पाय आणणें हेंहि ठीक नाहीं. त्या बिचाऱ्याचें दूध कमी करून, त्याची उपासमार करून, आपण आपल्या

पोटच्या गोळ्याचा जीव वांचविणें हा नवीन आपमतलबीपणा व क्रूरपणा कोणता? शिवाय अशीं दाईच्या अंगावर वाढलेलीं मुलें मोठीं झाल्यावर त्यांचें दूध तोडून त्यांस आपल्या आईवर माया करण्यास शिकवितांना कोण अट्टहास करावा लागतो व असा जुलमाचा रामराम कितपत श्रेयस्कर असतो हें सांगणें नलगे.

दुसरी गोष्ट मोठी चमत्कारिक आहे. ती ही कीं अडलेल्या बाळंतिणीची सुटका डॉक्टर लोकांकडून न करवितां सुईणी किंवा पास झालेल्या सुशिक्षित सूतिकाशास्त्रज्ञ स्त्रीकडून परीक्षा करण्याचा परिपाठ पडला पाहिजे. कारण स्त्रियांच्या स्वाभाविक शालीनतेस परपुरुषदर्शनानें कमीपणा येतो. अशा अनेक स्त्रियांच्या अडचणी लक्षांत आणून सौ० डॉ० आनंदीबाई जोशी एम्. डी. (फिलाडेल्फिया) यांनीं व्हावी तशी तजवीज हिंदुस्थानांतच स्त्रियांकरतां मेडिकल कॉलेज काढण्याचें मनांत आणिलें होतें. पण, ईश्वरी सूत्र कांहीं वेगळेंच होतें. त्या तरुण स्त्रीरत्नाचा स्तुत्य हेतु जागच्याजागीं राहून, त्यास मृत्यूनें अकालीं गाठिलें! तरी लेडी डफरिन मेमोरियल फंडासारख्या संस्थांचा उपयोग स्वदेशी स्त्रियांना या दिशेनें शिक्षण देण्याकडे जितका होईल, तितका हवा आहे. ह्मणजे होतकरू आयांचा कार्यभाग सहज पार पडणार आहे.

तरी एवढ्यावरून, सध्यांच्या सुईणी अगदीं ढ आहेत, असें कोणी समजूं नये. त्यांचें अनुभवजन्य ज्ञान खरोखर अलौकिक असतें. पण, त्यास जर पुस्तकी व सुधारलेल्या शास्त्रान्वित ज्ञानाची जोड मिळेल, तर ती वावगी नाहीं. कारण, ‘ अधिकस्याधिकं फलम् ’ ।

असो. सूतिकाप्रकरण व बालकाचें अन्न यांची वासलात लावल्यावर आपण आतां बालकाकडे वळूं. आईस कोणीं नांवें ठेविलेलीं खपतात. पण तिच्या अच्छड्या बच्छड्यास जरा कोणी कांहीं ब्र बोललेलें तिला मुळींच खपत नाहीं. तें तिचा जीव कीं प्राण असतें. त्यापासून तिला जें सुख होतें तें स्वर्गसुखाहून गोड असतें. एक शिकलेली आई आपल्या मुलाविषयीं असें ह्मणते—

" चिमुकलें छकुलें मम मंदिरीं
न वसतें सुख काय असे तरी ?
सुगुणि बालक दे सुख भूवरी
मज गमे न मिळे सुरमंदिरीं !

—स्त्रीशिक्षणचंद्रिका, वर्ष १ लें.

खडूचा तुकडा उबविणारी कोंबडी, कावळ्याकडून आपलीं पिलें पोसविणारी कोकिळा, ज्या अणीदार दांतांनीं उंदीर मारतां येतात त्याच दांतांनीं मानगुटी धरून पोरांस सात कोन नाचविणारी व बोक्यापासून त्यांचें रक्षण उत्तम प्रकारें करणारी मांजर; यांची माया जर आपल्या बच्चांवर अलोट असते, तर मनुष्यजातींत ती वर लिहिल्याप्रमाणें कांकणभर अधिक असल्यास त्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं.

असो. बालकापासून मातेस अप्रतिम सुख होतें. तर त्याच्या आरोग्याकरतां तिनें निरंतर झटणें हें तिचें आद्य कर्तव्य आहे. मूल कितीहि गयावया करील, तरी त्यास सकाळीं वेळच्यावेळीं न्हाऊं घालणें तें तिनें घातलेंच पाहिजे. त्यामुळें त्याचे शरीरास उत्तम व्यायाम मिळून बालक एक गुलाबकळीच बनतें! त्याच्या तोंडास फुललेल्या कमळाची शोभा येते! तें केवळ साधुत्वाचें चित्रच दिसतें! काय त्याचा तो भोळाभाव! काय त्याची ती सदा आनंदी वृत्ति! काय त्याची ती अलिप्तता! काय त्याचें तें प्रेम असें कीं ज्याचें नांव तेंच! असें गृहरत्न पाहून कोणाचें मन मोहून जात नाहीं? कोणास त्याला कडकडून आलिंगन द्यावेंसें वाटत नाहीं? अशा अनाथ व निरुपद्रवी मुलांबाळांकरतां, कोणी भिक्षांदेहि करण्यास आल्यास कोणास त्याची कींव येत नाहीं? आपले शास्त्रकार ह्मणतात :—

" साहित्यसंगीतकलाविहीनः
साक्षात्पशुःपुच्छविषाणहीनः $॥

$ ज्याला विद्या, संगीत, कला येत नाहीं, तो शेंपुट व शिंगें नाहींत असा साक्षात् पशु होय !

" The man in whose soul is no *music*, or love of music, is fit for murder, treasons, strategems, spoils! "

—*Shakespeare.*—

व इंग्रजी महान् नाटककार शेक्सपीयर पण त्यास रुकार देतो. तो ह्मणतो कीं, "ज्याचें मन गायनानें वेधून जात नाहीं, किंवा ज्यास गाण्याचा षोक नाहीं, तो खुनी, राजद्रोही, दगलबाज व लुटारू यांपैकींच होय." पण येथें ते ठार घसरले आहेत. मनुष्यभक्षक (कॅनीबाल) संगीताचे भोक्ते असतात. ते मनुष्याचें मांस होळीत भाजीत असतां, मोठ्या आनंदानें गातात व नाचतात! रोमची होळी पेटली असतां, नीरोबादशहा तंतुवाद्य वाजवीत होता! पण एवढें लांब कशास जावयास हवें? लंकाधिपति, असुरश्रेष्ठ, रावण, यानें तर आपल्या गायनानें प्रत्यक्ष शंकरास प्रसन्न केलेलें होतें.

मनुष्याचें मन कोमल किंवा कठोर आहे कीं काय हें पहाण्याची कसोटी त्याच्या अंगची गायनलोलुपता ही नव्हे. कारण संगीताचे नादावरून मनाची दुर्बलता व्यक्त होते. त्यावरून त्याचा कठोरपणा व्यक्त होत नाहीं. त्यावरून त्याचे दुर्गुण किंवा अज्ञान याचा बोध होत नाहीं. उलट ज्यास संगीताचा षोक नाहीं, तो शांत व विचारी आहे असें दिसून येतें. यास कांहीं अपवाद असले तरी तेवढ्यानें साधारण नियमास बाध येत नाहीं. तर मग, मनुष्याचें मन कोमल किंवा कठोर ठरविण्याची कसोटी असल्यास, ती हीच कीं, त्यास आपलें गुलगुलित हंसरें, टकमक पहाणारें, अस्पष्ट बोल बोलणारें, वरचेवर डावल्या हलवणारें मूल पाहून मोह उत्पन्न होतो कीं नाहीं हें पहावें ह्मणजे झालें. ग्रीस देशांतील यूलिसिस राजानें, लढाईस जाण्याचें टाळण्याकरतां एकदा वेड्याचें सोंग घेतलें होतें व तो हातांत नांगर घेऊन शेती करूं लागला होता. तेव्हां त्याचें वेड खरें कीं खोटें हें पाहण्याकरतां तेथील नागरिकांनीं वरील कसोटीस तो उतरतो कीं नाहीं हें पाहिलें. त्यांनीं त्याचें तान्हें मूल त्याच्या फाळाच्या वाटेंत आणून टाकिलें. तसा यूलिसिसचा हात आंखडला व सर्व भ्रमाचा भोपळा फुटला. असो. दुष्यंतासारखे भारती राजे, शिवाजी, बाजारावासारखे अलीकडील राज्यकर्ते पुरुष यांसदेखील पुत्रमोह सुटलेला

नाहीं! पण ईरेस चढतांच, तो अशांसहि जिंकतां आला. धृतराष्ट्र, हरिश्चंद्र, श्रियाळ, दशरथ, यांनीं आपला पुत्रमोह धुडकावून देऊन सत्पथ व एकवचनीपणा कायम राखिला! आतां कोणास हा विरोध नडेल, तर या विरुद्ध गोष्टींची तोंडमिळवणी शास्त्रकार कशी करतात, ती पहा. ते ह्मणतात:—

" वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति ॥ ×

असो. बालकाकरतां मातेस जे कष्ट सोसावे लागतात, जें सोंवळ्याचें ओंवळें करावें लागतें, जो वाद माजवावा लागतो, जो व्रतभंग करावा लागतो, जो ' तळहाताचा पाळणा व नेत्राचा दिवा ' करावा लागतो त्यांत पित्यानें हातभार लावणें हें गैर नाहीं. तेवढ्यावरून त्यास स्त्रैण, स्त्रीलंपट, स्त्रीदास ह्मणणें शोभत नाहीं. उलट तेवढ्यावरून त्यास—आंतबाहेर, घरींदारीं, आपल्या माणसांशीं व लोकांशीं दिलदार—असें ह्मणण्यास कोणतीच हरकत नाहीं. पण आपल्या पोटच्या गोळ्याकरतां ज्याचें आंतडें तुटत नाहीं, ज्याच्या हृदयास पाझर फुटत नाहीं व जो त्याचे बऱ्याकरतां झटत नाहीं, त्याला दुखतखुपत असतां ज्याचें मन व्याकुळ होत नाहीं, त्याचा आनंद ज्याला त्रिभुवनांत मावत नाहीं, अशा मनुष्याचें वर्तन जगाशीं पाषाणहृदयीपणाचें असल्यास त्यांत मुळींच नवल नाहीं! हिरा व कोळसा हे शास्त्रकारांना दोन नाहींत! पण कोळशाचा हिरा होण्यास कोळशास अत्यंत घस सोसावी लागते!

सर्व दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्यास, निढळत्या घामानें ओली कोरडी भाकरी मिळाली तरी घरीं आल्यावर त्यानें अशी खडतर बाल-शुश्रूषा केली पाहिजे. मग, * ' लक्ष्मणा ' सारखा स्वतः उपाशीं

× असाधारण लोकांचीं मनें वज्राहूनहि कठोर व फुलांहूनहि नाजूक असल्यामुळें, खरोखर तीं कोणास पूर्णपणें ताडतां येतात? "

* ही उत्तम पितृभक्तिदर्शक गोष्ट ' बालमित्रां ' त व ' मराठी चौथ्या ' पुस्तकांत आहे हें सांगणें नकोच.

अथवा अर्धपोटी राहणारा मुलगा त्याचे पांग फेडण्यास तयार असेल तर त्याच्या आनंदास पारावार नसतो. जर त्यास वैवाहिक स्थितींतील सुख भोगण्याची इच्छा असेल, जर त्यास गृहस्थ ह्मणवून घेण्याची उमेद असेल, जर त्यास कुटुंबांतील राजपदासारखें श्रेष्ठ स्थान शोभिवंत करण्याची हौस असेल, तर त्यानें बालशुश्रूषेंत अंग चोरणें हें मोठें पातक आहे. असें पातक गरीबांपेक्षां श्रीमंतांचे हातून घडण्याचा अधिक संभव असतो. कारण श्रीमंतांचें येथें सेवकगण मोठा असतो. तेव्हां बालशुश्रूषेसारखें नाजूक काम त्यांकडे सोंपविण्याचे त्यास अनेक प्रसंग सहज येतात. पण सुदामजींच्या घरीं तसा प्रकार कोठून असणार? ते कितीहि थकून भाकून आलेले असले, तरी घरीं आल्यावर त्यांचीं त्यांनाच आपलीं मुलेंबाळें खेळवावीं लागतात. खांद्यावर नांगर टाकून संध्याकाळीं घराचा पल्ला जेमतेम गांठणाऱ्या शेतकऱ्यांचीं मुलें त्यांस सामोरीं येतात; त्यानें आपला मुका घ्यावा ह्मणून तीं त्याच्या अंगावर चढत असतात; आपल्या हंसतमुखानें व लडिवाळपणानें तीं त्याचे श्रम परिहार करतात. असा प्रेमळ देखावा पाहून, श्रीमंतीपेक्षां गरिबी कोणास बरी वाटत नाहीं? पंचपक्वान्न, पुष्पशयन, रत्नहार, शेलेदुशाले, हत्तीघोडे, हीं वरील गृहसुखाचे पासंगास येतील असें कोणास स्वप्नांत तरी वाटेल काय?

आपल्या मुलांस सणावारीं सजवून, त्यांना देवळींरावळीं मिरवून, गरिबांस किती धन्यता वाटते! तेथें गाण्याबजावण्यांत, नाचण्याबागडण्यांत असेल ती मीठभाकर गोड करून घेण्यांत, कोंड्याचा मांडा करण्यांत, फाटकें नेसून स्वतंत्र असण्यांत, ऋण न काढतां सण करण्यांत त्यांचा तो दिवस कोठेंच जातो हें त्यांस कळत देखील नाहीं! खरे दिलदार ते हेच लोक! खरे नीतिमान् ते हेच लोक; खरे शुद्ध ते हेच लोक! ज्यांस मद, मत्सर, दंभ, शिवले नाहींत, ते हेच लोक! साधी राहणी व गहन विचारसरणी ज्यांची आहे, ते हेच लोक! ह्यांचाच सहवास करणें ह्मणजे स्वर्गसुखाचा अनुभव घेणें होय. महासाधु तुकाराम बोवा या गरीब लोकांना पूर्ण ओळखून होते. ते ह्मणत—

" नीचपण बरवें देवा! नचले कोणाचाही हेवा!
महापुरें झाडें वाहती! तेथें लव्हाळें वांचती!
येति सिंधूच्या लहरी! नम्र होतां, जाती दुरी! "

असो; तर ज्यांना ऐपत असेल, त्यांनींदेखील आपलीं मुलें चाकरमाणसां-वर एक घटकाभरही विसंबूं नयेत. वाटेल तर त्यांना त्यांच्या भांवडां-बरोबर असूं द्यावें. त्यांनीं त्यांस सांभाळल्यास, त्यांचे हातून तितका हलगर्जीपणा घडणार नाहीं. कारण म्हातारीं माणसें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं कीं

" पोराचें पोर सोयरें "

मुलांची मौज मुलांसच माहीत असणार? अथवा त्यांचा आनंदी आनंद त्यांनाच अनुभवतां येतो; म्हणून त्यांचें आपसांत सूत चांगलें असतें. संस्कृत कवीचा न्याय 'समानशीलव्यसनेषु सख्यम्' हा येथेंही यथातथ्य लागू पडतो. तरी मुलांस आपापले बरे वाईट मनोविकार आवरतां येत नाहींत. $ ही घरोघरी दिसून येणारी गोष्ट आहे. शिव-लीलामृतांत या संबंधी गजानन षडाननाचें उत्कृष्ट उदहारण आहे. या दोघांच्या अंतरी जरी अखंड प्रीति असे, तरी हे लहानपणीं सुटे असले म्हणजे एकमेकांच्या कुरापती काढून पार्वतीपरमेश्वराकडे आपली फिर्याद नेत असत. एकदा गणपतीनें अशी फिर्याद पार्व-तीकडे नेली कीं, आई षडाननानें माझे लांब कान उपटले, व तो मला टोंचून बोलला कीं, तुझे डोळे रे कां असे लहान? हें ऐकून पार्वती हंसून षडाननास म्हणाली, कायरे स्कंदा, तूं असें केलेंस? त्यावर तो उत्तर देतो, " त्यानें अगोदर माझे बारा डोळे कां मोजिले? " तेव्हां पार्वती गणपतीकडे वळून किंचित् रागानें त्यास म्हणते, गणपती हें ठीक नाहीं. असे वडिल भावाचे खेळ करावे काय? त्यावर गणपती बोलला कीं " त्यानें अगोदर माझी सोंड चवंगा घालून कां मोजावी? " इत्यादि टक्याच्या खेळांतील प्रश्नोत्तरावली घरोघर होत असते.

$ अध्याय १४ वा पहा.

'रामविजयांत'हि श्रीधरस्वामींनीं अशीच बालस्वभावाची लकेर वठविली आहे. कैकेयीनें बालपणीं एक मर्कटचेष्टा करून आपल्या भावी महादुष्ट कृत्याची अगाई दिलेली आहे. तिनें एकदां खेळतां खेळतां एका समाधिस्थ ऋषींचे तोंडाला मस फासून, पुढें अनंत-कालपर्यंत आपल्या तोंडास कायमची काळिमा लागेल असा यथार्थ शाप मिळविला आहे. अशा मोठमोठाल्या खोड्या मुलांची विचारशक्ति फारशी परिपक्क झालेली नसल्यामुळें त्यांचे हातून होतात. ह्मणून आईबापानीं त्यांवर चांगली देखरेख ठेविली पाहिजे. एवढ्याकरतां त्यांचा अमोल वेळ मोडला, त्यांस जीवापाड मेहनत करावी लागली, त्यांचें पैशापरी नुकसान झालें, त्यांस मोठी गैरसोय झाली तरी त्याची मोठीशी त्यांस किंमत नाहीं. कारण त्यामुळें जें कांहीं उणें पडेल, तें भरून काढतां येईल. पण मुलांमुलांतले तंटेबखेडे, मारामाऱ्या व शिवीगाळ जर आईबापांचे पश्चात् चालू राहील, तर तसले अनिष्ट परिणाम मात्र मागाहून दुरुस्त करण्यास फार प्रयास पडतील. पण हेंच त्यांच्या आईपाबांचा किंवा वडील माणसांची त्यांवर देखरेख असली ह्मणजे त्यांचें वर्तन सुरळित असतें व तीं आपल्या वडिलांचें अनुकरण करून त्यांस संतोष देत असतात, त्यामुळें त्या वडिलांस तशा देखरेखीचे श्रम कांहीं वाटत नाहींत. त्यांचे बाळपण ह्मणजे निरभ्र दिवसाची रमणीय प्रभातच होय.

यावरून हें उघड आहे कीं, बालशुश्रूषेसारखें पवित्र काम ज्याचें त्यानेंच केलें तरच तें सोन्याहून पिवळें होतें, तरच तें सोळा आणे उतरतें. प्रत्येक महत्त्वाचे कामांत जो नियम पाळावा लागतो, तो यांतहि पाळला पाहिजे. यांत उंटावरून शेळ्या हांकून फारसें चालत नाहीं. यदाकदाचित् इतकेंहि माहीत असून कोणा श्रीमंत गृहस्थानें इकडे कानाडोळा केला, व आपलीं मुलेंबाळें दासदासींच्या हातीं दिलीं तर त्यांच्या हयगयीमुळें कधीं तीं तिरवीं होतात; कधीं त्यांच्या पाटीस कुबड येतें; कधीं तीं बुजट होतात; एवढेंच

नाहीं, कधीं तीं वेडीं होतात व कधीं तीं प्राणासहि मुकतात. कुळंबिणी त्यावर नीट नजर ठेवीत नाहींत, ह्मणून त्यांच्या छोट्या धन्यास जन्माचें अंगवैकल्य प्राप्त होतें. मुलांना बागुलबोवाचीं गाणीं गाऊन किंवा भेडावणी दाखवून किंवा अंधेरी खोलींत कोंडून त्या चूप बसवूं पहातात; हें अशिक्षित आयांकडूनहि घडतें. पण त्याचा भलताच परिणाम होतो. इंग्रजींत एक ह्मण आहे कीं, ' बळजबरीचा परिणाम विपरीत होत असतो ' (coercion defeats its own end). लहान मुलानें एकदा भीति धरली कीं तिचा त्याच्या कोंवळ्या मनावर जो संस्कार होतो, तो आमरण तेथून नाहींसा होत नाहीं. त्यापासून गोष्ट इतक्या थरावर येऊन पोहचते कीं तसल्या मुलांस उन्माद होतो व अखेर त्यांचा त्यांत अंतहि होतो, असें कॉबेट यानें ' तरुणजनांस उपदेश ' या अमोल ग्रंथांत उदाहरणें देऊन उघड करून दाखविलें आहे. मिसेस् मेरिया एजवर्थ या मान्य आंग्ल ग्रंथकर्त्रीनें 'चांगली अध्यापिका' या नैतिक कथेंत हें खुलवून सांगितलें आहे. जॉन लॉक या महान् इंग्रजी तत्त्ववेत्यानें ' मानवी बुद्धि ' वरील जगद्विख्यात निबंधांत हेंच तत्त्व सोपपत्तिक सिद्ध करून दिलें आहे. याचा उपयोग सुज्ञ, श्रीमंत व ऐपतदार आईबापांनीं अवश्य करून पहावा.

लहानपणीं मुलांस दुखणींबाणीं येतात. तेव्हां त्यांस योग्य औषधोपचार करणें हें आईबापांचें एक मोठेंच काम आहे. मुलांस जीं दुखणीं येतात, त्यांत ' देवी ' किंवा ' मसूरिका ' सारखें दुसरें कोणतेंच भयंकर दुखणें नाहीं. त्यानें मुलें विद्रुप लंगडींलुलीं, आंधळींपांगळीं होतात व दगावतातहि. या रोगावर+आपल्या वैद्यकाप्रमाणें मनुष्याचीच लस टोंचणें हा उपाय आहे. पण विलायतेंतील डॉ. जेन्नर साहेब यांनीं जो गोस्तनदेवीचा तोडगा काढिलेला आहे, तो अनुभवांतीं अत्युत्तम ठरलेला आहे. तो करून आपल्या मुलांबाळांचे जीव वांचविणें हें प्रत्येक आईबापानें कर्तव्य आहे. पण तें करण्यास लोक कचरतात हें पाहून दयाळु इंग्रजसरकारनें एवढें

+ ' गृहिणीकंठभूषण ' पृष्ठ १३६ पहा.

काम फुकट व सक्तीनें करविण्याचाहि प्रघात पाडिला आहे. याबद्दल आपणास त्यांचे धन्यवाद गाइले पाहिजेत.

मुलास रांगूं लागल्यापासून पुढें बराच व्यायाम सहजासहजीं घडत असतो. तेव्हां त्याचा निभाव नुसत्या दुधावर लागणें शक्य नाहीं. दांत येण्यापूर्वींहि त्यांस चघळून चुंफून खाण्यासारखे पदार्थ दिले पाहिजेत. अंगूर, अंजीर, आंबे, खारका, सुकीं केळीं, साकरपाल्याची वडी, पेपरमिंठ इत्यादि खाऊखाजें त्यांच्या हातांत दिलेलें बरें. कारण असले पौष्टिक पदार्थ चघळीत राहिल्यानें, त्यांचा रस त्यांचे अंगीं लागून तीं सहज अंग धरतात. बालघुटी, बालसंजीवन, बालामृत, मेलिन्स फूड अशीं जीं कांहीं बालोपचारी पौष्टिक औषधें आहेत तींहि त्यांस सेवनीय होत. पण वरील पौष्टिक पदार्थसेवनानें मुलांची एक खोड टाळण्यासारखी आहे. नुसती लांकडी चुंफणी न दिल्यास मुलें मातीवर ताव मारूं लागतात; व पुढें त्यांस ' डब्यासारखा ' भयंकर रोग होतो; व सोन्यासारखीं मुलें स्मशानांतील भूतपिशाचाप्रमाणें विद्रूप अस्थिपंजर होतात व मृत्युपंथासहि लागतात. असला अनर्थ वरील साध्या पण पौष्टिक पदार्थांनीं निःसंशय टाळण्यासारखा असतो.

आतां असे गोडधोड पदार्थ मुलांचे हातीं देऊन, त्यास जंत होतील व एळयाबोळ किंवा सिंटोनाइन देण्याचा प्रसंग येईल असें कोणास वाटेल. पण त्याचें इतकें भय बाळगावयास नको. कारण गोड पदार्थांनीं बाळपणीं मुलांच्या शरीराची वाढ चांगली होते असें शास्त्रीय शोधांतीं स्पेन्सरसारख्या विचारी पुरुषांनीं ' शिक्षणमीमांसें ' त लिहिलें आहे.

मुलांस शुद्ध, साधें, पौष्टिक अन्न जसें मुबलक हवें असतें, तशी त्यांस स्वच्छ हवा व उजेड हीं आवडतात. त्यास ओंधट व अंधारी जागा आवडत नाहीं. तेथें त्यांस ठेवतांच तीं पटापट ओटीवर, अंगणांत, सज्जांत जाऊं पाहतात. नारळीचा वृक्ष पण असाच खुल्या हवेचा व सोनेरी सूर्यप्रकाशाचा षोकिन् असतो. त्याच्या सीध्या वाटेंत एखादें आंब्याचें किंवा फणसाचें झाड आलें, तर तो आपला त्यास

चुकवून शेवटीं त्यांचेहून आपली सरशी करून त्यांचे शिखरावर आपलीच सुंदर चवरी ढाळूं लागतो! आईबापांचें कामकाज घरांत चाललें असतां, मुलें तडक बाहेर जाऊन मोकळ्या हवेचें अनुपम सुख घेत असतात. ज्यांच्या घरांना अशी सोय नसेल, त्यांनीं ती साध्य करण्यास कितीहि प्रयास पडला, कितीहि खर्च आला, तरी तो सोसणें गैर नाहीं. आपणा स्वतास किंवा आपल्या मुलाबाळांस दागदागिन्यांनीं मढविण्यापेक्षां त्यास खुल्या हवेंत खेळतां बागडतां येईल अशी तजवीज करणें हें आईबापांचें मोठेंच काम आहे. यास्तवच पूर्वी खेडेगांवांतील घरांना पुढेंमागें अंगणें व चारी दिशेला चार दरवाजे असत व शहरांतील घरांना गच्चा व सज्जे असत. पण सध्याच्या व्यापारी दृष्टीमुळें ही उत्तम सोय दिवसेंदिवस नाहींशी होत चालली आहे. व आईबापांस आपलीं मुलें मोकळ्या हवेंत हवा खाण्यास न्यावींशीं वाटल्यास त्यांस मुंबईसारख्या दाट वसतीचे शहरीं बाबुलनाथ, वालुकेश्वर, यासारख्या रम्य ठिकाणीं किंवा एखाद्या राणीच्या बागेसारख्या सार्वजनिक बागेंत चार घटका जेमतेम घालविण्याचा मार्ग कायतो उरला आहे. व तोदेखील रोजगाराचे चेपानें दमूनभागून आलेल्या सध्यांच्या अध्यांदमाचे पिढीस साधत नाहीं. कधींकाळीं अवसेदिवाळी तसा कपिलाषष्ठीचा योग यावयाचा या कामांत आपण सुधारलेल्या पारशीबंधूंचा कित्ता घेण्यासाखा आहे; व मुंबईसारख्या चळवळीच्या शहरांतून त्यांनें अनुकरण हळूहळू आपले कडून होत आहे. तसें न बनेल तर कॉवेट म्हणतो त्याप्रमाणें, लहानांचे मोठे होण्याकरतां आईबापांनीं खुशाल खेड्यापाड्यांतून त्यांस ठेवण्याची सोय करावी.

(४) चौथा प्रश्न हा आहे कीं, आईबापांचें मुलांच्या शिक्षणाविषयीं कर्तव्य काय आहे? मुलांचें शरीर निकोप होण्याकरतां जसें आईबापांनीं जपलें पाहिजे, तसें तीं शिष्ट, विद्याविनयसंपन्न, पापभीरु, धर्मरत, सारांश सुशिक्षित निपजण्याविषयीं जपलें पाहिजे. त्यानीं मुलांशीं सलगी ठेविली, तरी जसें मुलें होण्यापूर्वी त्यांस शुद्धाचरण

ठेवावें लागतें असें मागें आलें आहे; तसें पुढें मुलें झाल्यावर त्यांचे समोर आईबापांनीं तसेंच आचरण कायम ठेविलें पाहिजे. कारण मुलें अगदीं लहान असलीं व त्यांस बोलतांचालतां येत नसलें तरी त्यांची अवलोकनशक्ति व अनुकरणशीलता जबरदस्त असते. सिमियन बेंजामिन या यहुदी सद्गृहस्थानें यासंबंधी लिहिलेलें छोटेखानी मराठी + पुस्तक होतकरू आईबापांनीं अवश्य वाचण्यासारखें आहे. त्यांना सरळ्या मारूं देणें, रांगू देणें, पांगुळगाडीनें चालूं देणें, अशी लागेल तीं दांडगाई करूं देणें त्यांस हितकर आहे. कारण लहान मुलें कोणत्या वस्तूचा काय धर्म आहे हें पहात असतात. तीं वस्तूंमात्रांचा परिचय करून घेत असतात. हें काम सृष्टीच त्यांना शिकवीत असते. ह्मणून त्यास ' सृष्टीचें शिक्षण ' ह्मणतात. आपल्याकडील आईबापांनीं, जपानांतील आईबापांप्रमाणें, मुलांबरोबर मुलांसारखें होणें हें फारच चांगलें. त्यावर या बाबतींत कोणताहि दाब असूं नये. एव्हांपासून त्यांस दाबांत ठेवल्यास, तीं आनंदी, खिल्लाडू, निरोगी न बनतां खुरटीं व खुनशी होतात. पण हें ज्ञानावांचून साध्य नाहीं. सुशिक्षित आईबापांनीं व शिक्षकांनीं प्रोफेसर प्रेयर, बाल्डविन्, सली, इत्यादि नामांकित ग्रंथकारांपैकीं कोणत्याहि एखाद्या ग्रंथाचें अध्ययन केलें पाहिजे. माझ्या मतें प्रोफेसर प्रेयर यांचा ग्रंथ ' बालकाचें मन ' हा सर्वोत्कृष्ट आहे. त्यांत बालकाच्या जन्मदिवसापासून तों तें तीन वर्षांचें होईपर्यंत, त्याच्या मनाची व इंद्रियांची शक्ति कशी विकास पावत जाते हें शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध करून दाखविलें आहे; व असें करतांना मनुष्येतर प्राण्यांच्या वाढीची मनुष्याच्या वाढीशीं तुलना केली आहे. गुराख्यास आपल्या गुराढोरांची ओळख असावी लागते; धनगरास आपल्या कळपाची माहिती असावी लागते; तुरुंगाधिपतीस कैद्यांची आवडनावड ठाऊक असण्याची गरज असावी असते; दानाध्यक्षास सत्पात्र भिक्षुक कोण

+ ' मुलांस वागविण्याची रीति ' (The method of pringing up children,) आवृत्ति दुसरी पहा.

आहे हें पहावें लागतें; धर्मोपदेशकांस श्रोतृवृंदाचा स्वभाव अवगत असावा लागतो. ह्या जर गोष्टी अक्षरशः खऱ्या आहेत, तर सुशिक्षित मातापितरांस आपल्या बालकांची प्रवृत्ति कोणीकडे आहे हें जाणणें किती महत्त्वाचें आहे हें एकदा उमगलें ह्मणजे पुढें त्यास कसकसें शिक्षण द्यावें हें सहज कळेल. मात्र एवढ्याकरतां प्रेयर-साहेबांनीं चालू ठेविलेल्या निरीक्षणाचे रोजनिशीप्रमाणें एखादें टांचण ठेवीत गेल्यानें आपण आपल्या बालकाचें फलज्योतिषासारखें वर्षफळ काढण्यास समर्थ होऊं.

प्रोफेसर प्रेयर यांच्या अप्रतिम ग्रंथांचा अभ्यास चालू होण्यापूर्वींपासून हा लेखक शिक्षणाचा धंदा घरींदारीं करीत असे. तेव्हां त्यास सहज असे वाटत असें कीं आपणास बालस्वभावाचें बरेंच ज्ञान आहे. पण तो त्याचा पुष्कळसा भ्रम होता असें त्यास आतां कळून चुकलें आहे. याचीं कारणें अनेक आहेत. पहिलें असें कीं, शिक्षकाचें काम खरें पाहूं गेलें तर, मुलांच्या मनाचा विकास करण्याचें काम ह्मणण्यापेक्षां शाळाखात्यानें ठरविलेला अभ्यासक्रमावरहि ताण करून देण्याचें काम समजतात. निदान त्यानें तो अभ्यासक्रम पुरा केलाच पाहिजे, त्याशिवाय त्यास गत्यंतर नाहीं अशी सर्वत्र समजूत झालेली दिसते. याचें एक ठळक उदाहरण पहा. जें अर्थशास्त्र, ज्योतिषशास्त्र, यंत्रशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र इंग्रजी प्रवेश परीक्षेस जाणाऱ्या विद्यार्थ्यास मूलतत्त्वरूप अवगत असावें, तेंच इंग्रजी पहिल्या इयत्तेंतील विद्यार्थ्यास मराठी भाषेंत सहावे पुस्तकाचे द्वारें यावें लागतें. काय ही पद्धति झाली काय? ‘ शिंदाळ टेंकडी ’ व ‘ सह्याद्रि सारखाच काय? ’ दुसरें असें कीं, आपल्या बाळपणच्या अनुभवावरून शिक्षकास बालस्वभावज्ञानाची घमेंड असते, पण ती फुकट होय. कारण मनुष्य जसजसा अकलेनें व नीतीनें वाढत जातो, तसतशी त्याच्या मनाची घडामोड झपाट्यानें होत जाते, तसतशा बालपणांतील प्रत्येक गोष्टीचा त्यास विसर पडत जातो. त्याचे आठवणींत ज्या गोष्टी राहतातच त्या अगदीं तुरळक व तुटपुंज्या असतात. तशांपासून शिक्षकाचे कामास विशेष मदत होत नाहीं.

तिसरें असें कीं, मानसिक शास्त्रांतील एखादा ग्रंथ वाचून, शिक्षकाचा कार्यभाग होण्यासारखा आहे असें आपणास वाटतें, पण असलीं पुस्तकें बहुधा साधारण तत्त्वांचें विवेचन करणारीं किंवा एखाद्या मुद्यावर वादांत शिरणारीं, किंवा ठराविक विषयांची चर्चा करणारीं असल्यामुळें, ज्यांना बालकाचा स्वभाव ओळखण्याची हौस व अक्कल असते, त्यांस तीं बरींच प्रतिबंधक मात्र होतात.

मूल सदा आनंदी, खेळाडू व शिकण्यांत गुंतलेलें असें असतें. त्याच्या मनावर आनुवंशिक संस्कार कितीतरी प्राचीन काळापासून घडत आलेले असतात. अशा मनाचा बरोबर विकास होऊं देणें हें कितीतरी ज्याचें त्यास, त्याचे मातापितरांस, त्याचे कुटुंबास, त्याचे गांवांस, त्याचे देशास नव्हे सर्व जगास हितकर व भूषणावह आहे. पण एवढा कार्यभाग ह्मणजे केवळ मानसिक शास्त्राचा ' श्रीग ' च होय. बालकाचे मनांत सर्व मुख्य मुख्य चळवळी बीजरूपानें दृष्टीस पडतात. तेव्हां तेथें एकटें मानसिक शास्त्र घेऊन काय करणार? तेथें सर्व शास्त्रांचें मूळरूप उघड सरळ, मनोरंजक असें व्यक्त होतें. आजपर्यंत पेस्टलोझो, रोशाप्रो, जॉर्ज कोंब, फ्रोबेल यांसारखे जे जे मान्य शिक्षणशास्त्री होऊन गेले आहेत, त्यांनीं, अतएव, बालकाशीं संघट्टन करून, त्यांचा स्वभाव आजमावून पाहण्याचा यत्न केलेला दृष्टीस पडतो. आपल्याकडील रा. सा. गणेश जनार्दन आगाशे बी. ए. या मान्य वृद्ध शिक्षकानें " प्राचीन व मध्यकालीन आर्यावर्तांतील शिक्षण " (" Education in Ancient and medæval India ") या निबंधांत असें ह्मटलें आहे कीं, आर्य लोकांनीं जरी शिक्षणशास्त्र बसविलेलें नाहीं, तरी त्यांच्या ग्रंथांतील विशेषतः पतंजली व शंकराचार्य यांच्या पुस्तकांतील अंतः प्रमाणावरून त्यांस शिक्षणशास्त्रांतील ठळकठळक सूत्रें अवगत होतीं असें दिसतें. स्वामी विवेकानंद यांनीं खेत्री येथील व्याख्यानांत तर असें ह्मटलें आहे कीं, + ' बालक हा परब्रह्मतत्त्वाचा अगणित

\+ " The child is the reservoir of iufinite Divie Power. "

संचय होय.' ही आपली समजूत प्रोफेसर प्रेयर या जर्मन गृहस्थाचे समजुतीस किती जुळत आहे हें चाणाक्ष वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच. तरी ती साधारण जनांचे मनांत नीट उतरण्याकरितां, साहेब मजकुरांचा ग्रंथ अवश्य वाचण्यासारखा आहे, हें सांगणें कोणास जरा धाडसाचें वाटेल, पण वास्तविक प्रकार तसा मुळींच नाहीं. प्रोफेसर प्रेयर यांनीं खुद्द आपल्या पुत्रावर त्याचे जन्मदिवसापासून रोज तास अर्धा तास खर्चून प्रयोग करून पाहिले आहेत. त्यांचेंच फळ ह्मणजे वरील मान्य ग्रंथ होय. आतां हे प्रयोग कसे करून पहावेत यासंबंधी त्या पुस्तकाचे भाषांतरकार अमेरिकन आपले भाषांतराचे प्रस्तावनेंत थोडक्यांत असें सांगतात कीं, आमच्या शिक्षणशाळेंतील पद्धति अशी आहे. प्रथम रस्त्यांत, घरीं, खेड्यांचे कुटुंबांत लहान मुलांचे तोंडून आपोआप जे काय विचार निघतात, त्यांच्या सहज होणारीं हलचाली, त्यांचे खेळ, त्यांचें कामधाम कसें चालतें इकडे दुसऱ्या वर्षाच्या शिक्षक विद्यार्थ्यानें बारकाईनें लक्ष्य देऊन, सवड सांपडतांक्षणींच, छापील शिरोलेखाच्या निरनिराळ्या रंगाच्या कोऱ्या वहींत त्या त्या वर्गाच्या रंगांत आपले भिन्न विषयांचें टांचण करून ठेवावें. उदाहरणार्थ स्मरणशक्तिदर्शक गोष्टी टिपून ठेवण्याकरितां हिरव्या रंगाचा कागद असला, तर कल्पनाशक्तिदर्शक गोष्टींकरितां निळा घ्यावयाचा, अज्ञानदर्शक गोष्टीकरतां काळा घ्यावयाचा, नीतिदर्शक गोष्टीकरतां पिंवळा घ्यावयाचा. याप्रमाणें शोधाचें काम चालू ठेवल्यानें काय फायदा होईल हें जरी आज नक्की सांगतां येण्यासारखें नाहीं, तरी आईबापांची व शिक्षकांची शोधकबुद्धि वृद्धिंगत होईल हें तर खरेंच. त्यांस मुलें पाहून कांहीं नवीनच मजा वाटेल; त्यांस कसें एका बोटावर नाचवावें ही विद्या त्यांना हस्तगत होईल; बालकाचे आयुष्यक्रमांतील कांहीं गूढ गोष्टी उकलण्यांत त्यास आपली अक्कल अधिक चालवितां येईल; व पदवीधर आईबापांस व शिक्षकांस तर या कामीं विशेष यश प्राप्त होऊन, नाठाळ व खोडकर मुलांना पाहून त्यांना विशेष उत्साह वाटेल व त्यांबद्दल त्यांना सहानुभूति वाटून, ते त्यास ताळ्यावर

आणण्यांत कसूर करणार नाहींत. ही वूर्सेस्टर पाठशाळेंतील पद्धति अनुकरणीय आहे असें या लेखकासहि आपल्या अल्प अनुभवावरून सांगतां येतें. त्यानें इतर ग्रंथांबरोबर प्रो॰ प्रेयर यांचा ग्रंथ अमेरिकेहून मागवून, तदनुसार आपल्या नूतन बालकावर प्रयोग करून पाहिले आहेत. वाचन, मनन व अनुभव या त्रिपदीवर इमारत उठविण्याचा त्याचा यथाशक्ति व यथावकाश अल्प यत्न चालू आहे. असा प्रयत्न करून पाहण्यापूर्वीं त्यास बालोद्यानशिक्षणपद्धतीचें वेड लागलेलें असल्या-कारणानें, त्यानें अगोदर आठ नऊ वर्षें तीन वर्षांहून मोठ्या मुलांचें निरीक्षण कसें चालू ठेविलें होतें याचा उल्लेख पुढें यथोचित स्थलीं येईलच. त्या पूर्वानुभवावरून त्यास हें नवीन पण गहन कार्य करण्यास उत्साह व धैर्य येत आहे. आतां त्याचा उपयोग जगास जरी विशेष नाहीं, तरी ज्याचा त्यास व त्याचे संसर्गानें त्याच्या कुटुंबास, त्याच्या समाजास, त्याच्या देशास, कालमानाप्रमाणें होणार आहे.

वर केलेल्या आत्मकृतीसंबंधीं उल्लेखावरून आत्मस्तुतीचा जास्त दोष आपले शिरीं न यावा ह्मणून येथेंच त्या प्रकरणास निरोप देऊन आतां या दिशेनें प्रसंगोपात् कोणकोणा प्रयत्न केलेसे दृष्टीस पडतात तें पाहण्याक-रितां आपण आपल्या प्राचीन ग्रंथांकडे वळूं. रामायणांत 'हनुमान'जन्माची कथा सांगतांना वाल्मीकि या आद्यकवीनीं असें ह्मटलें आहे कीं, हनुमान जन्मतः भुकेनें व्याकूळ होऊन उगवणाऱ्या सूर्यास खाण्याकरतां उड्डाण करीत होते. कोणतेंहि लहान मूल दिव्यावर झडप घालूं पाहतें, त्यास दिव्याची भूक मात्र लागलेली नसते एवढेंच खरें; पण 'निरंकुशाःकवयः' या न्यायानें पाहिलें तर वरील बालस्वभावाची रेखाटणी बरीच सत्यास धरून आहे. महाभारतांत उपमन्यु या गरीब ब्राह्मणबालकास इतर मुलें गाईह्मशीचें दूध पितात तसें दूध आपणास मिळावें असें वाटलें. पण त्याच्या आईबापांस तेवढें सामर्थ्य नव्हतें. ह्मणून त्यांनीं त्यास पीठ पाण्यांत कालवून दिलें. पण या रीतीनें उपमन्यु फसला गेला नाहीं, व त्यानें आपला हट्टहि सोडला नाहीं! परवांच्या श्रावणींत शेजारीं बसलेल्या

मध्यम वयाच्या गृहस्थानें आपल्या तीन चार वर्षांच्या मुलास दूध सांगून पंचगव्य पाजण्याचा यत्न केला. पण ती नसती उठाठेव फुकट गेली एवढेंच नव्हे, तर मुलाचा सनई सूर सुरू होऊन बापाचे कर्ण संतुष्ट झाले व त्यामुळें त्यास कदाचित् डुलकी येईल म्हणून त्या वामनमूर्ति चिरंजीवांनीं लत्ताप्रहारांनीं त्यास पाटावरून पाताळ दाखविला! वरील व्यासकल्पनासृष्टि व हा या लेखकाचा ताजा प्रत्यक्ष अनुभव यांचा कसा सोळा आणे हिशेब जमला! व भागवतांत, पूतना या राक्षसीनें सुंदरस्त्रीवेष धारण करून बालकृष्णास कपटानें कां होईना स्तनपान करण्यास लाविलें आहे, व श्रीकृष्णानें बालस्वभावानुरूप तसें केलें आहे. या लेखकाचें ८।१० महिन्यांचे मुलीस तिच्या आजीनें पाजण्यास थट्टेनें घेण्याची खोटी, कीं ती लगेच स्तनशोषण करूं लागते. यावरून भागवतकारांच्या वर्णनाची प्रतीति सहज येते. अशीं बालस्वभावानिरीक्षणाचीं प्रसंगोपात्त उदाहरणें अनेक देतां येतील; पण स्थलसंकोचास्तव इतकें मान्य कविवरांचें दिग्दर्शन पुरें आहे. तरी पण ज्या कवनांचा अद्यापि आपल्या बायकामुलींत प्रसार आहे, त्यांचा याविषयासंबंधीं विस्तारपूर्वक उल्लेख करणें येथें इष्ट आहे. कारण या बालस्वभावचिकित्सेस शास्त्रीय कसोटी लावून, ती किती नंबरी लगड आहे हें ठरवून, मग तीवर आपला नवीन घाटाचा डाग करावयाचा आहे. पुष्कळ वाचकांनीं सदरहू कवनें वाचलीं किंवा ऐकिलीं असतील; पण त्यांचा निबंधलेखनांत उपयोग करून आपल्या विषयास गौणत्व आणल्यासारखें कोणास वाटल्यास, त्यास एवढेंच उत्तर आहे कीं, आपण न्यायाधीश व हा लेखक एक आपल्यापुढें असणारा पक्षकार आहे असें घटकाभर धरा. म्हणजे पुराव्याच्या कायद्याचे सर्वमान्य नियमाकडे आपणांस कानाडोळा करतां येणार नाहीं; व सर्व तऱ्हेच्या पुराव्याची किंमत आपल्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं.

सौ० रमाबाई धर्माधिकारी, या प्रिय सुशिक्षित भगिनीनें या लेखकास सदरहू कवनें लिहून दिलीं आहेत. तीं बालगीतेंच होत.

आपल्या बायकामुली त्यांस ‘ पाळण्यावरच्या ओंव्या ’ ह्मणतात. त्यांपैकीं अत्त्युत्तम ओवींत असें नम्रपणानें ह्मटलें आहे कीं, आई-बापांस बालकाचा स्वभाव अवगत नाहीं; बालकाविषयीं त्यांचे हातून प्रमाद घडतात; त्यांच्या अनिष्ट परिणामांपासून त्याचें रक्षण करणारा परमेश्वर आहे. हा सिद्धान्त प्रतिपादन करतांना, तर्कशास्त्रा-नुसार त्यास दृष्टान्त दिला आहे. गाय ही अप्रबुद्ध प्राणिवर्गांतील असल्यामुळें रानावनांत हिंस्रपशूपासून तिला अपाय न होऊं देण्यांत जसा गुराखी असतो, तसा अज्ञान बालकाचे रक्षणार्थ ईश्वर तत्पर असतो. इतका सुंदर व गंभीर अर्थ असून, ती ओंवी किती साधी आहे पहा.

गाईचा गोवारी,
ह्मैशीचा खिल्लारी,
बाळा तुझा कैवारी
नारायण !

या ओंवीच्या खालोंखाल अशी ही दुसरी एक $ ओंवी आहे.

गाई गोवर्धन
चरती बारारानं !
घरीं बाळ तान्ह
वाट पाहे !

$ अशीच एक बालस्वभावनिदर्शक आणखी ओंवी आहे. तीहि सुंदर आहे. ती अशी :—

छंदखोर हें लेंकरूं । छंद घेतला रात्रीं ॥
चंद्रमा मागे हातीं । खेळावया !!!

यासारखें किंवहुना यावरून निघालेलें गाणें
‘ चंद्र खेळावया दे मज आई ! ’
असेंच सुंदर व लोकप्रिय झालेलें आहे.

या ओवींतील रूपक किती सहजमनोहर आहे हें सांगण्याची गरज नाहीं. यांतील गर्भितार्थ फारच वाखाणण्यासारखा आहे. आईबाप संसारांतील अनेक कामें करण्याकरतां नेहमीं दूर जात येत असतात. तरी बाळकाचें सर्व प्रेम त्यांचेवर असतें. हें बालस्वभाववर्णन अगदीं यथार्थ आहे. कारण, बालकास आपल्या मातापितरांशिवाय घरांतील दुसऱ्या माणसांचा इतका दाट परिचय नसतो. आणखी एक गोष्ट येथें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, मोठालीं माणसें 'अतिपरिचयादवज्ञा' हें सूर्यप्रकाशवत् सत्य जाणून, व्यवहारांत संकोचवृत्ति धारण करीत असतात. पण बालकास हें कसें कळतें कीं मातापितरांशीं आपला अतिपरिचय झाला, तरी आपली त्यांचे हातून अवज्ञा होणार नाहीं? त्यास ही उपजतबुद्धि तर नसेल ना? त्याच्या त्या प्रेमांत व उल्हासांत, आईबापांचें दर्शन लक्ष वेळां घडलें तरी काडी-इतकें अंतर पडत नाहीं.

असो. आतां प्रोफेसर प्रेयर साहेबांचे नवीन पद्धतीप्रमाणें आईबापांनीं व शिक्षकांनीं मूल तीन वर्षांचें होईपर्यंत त्याचें निरीक्षण केलें असतां, त्यांस पुढील शिक्षणक्रम सुलभ कसा जातो हें पहावयाचें आहे. आई-बापांची इतकी तयारी असल्यावर 'बालोद्यानशिक्षणपद्धति' ही पुढली पायरी त्यास जड जात नाहीं. कारण तिचा पाया असाच बालस्वभाव-निरीक्षणावर आहे. पण तिचा प्रसार आतां आतां कोठें आपल्याकडे होण्यास सुरुवात होत आहे. मद्रास व बंगाल या इलाख्यांत व इतरत्र तिचा शिरकाव हळूहळू झालेला आहे व आपल्या इलाख्यांत इंग्रजसर-काराचें तिकडे लक्ष जात आहे. परंतु सूर्योदयाअगोदरचें धुकें जसें सूर्यो-दयानंतर वितळून जातें, तसें सामान्य लोकांचे दृष्टीवरून भ्रमपटल कालांतरानें खास निघून जाईल असा अजमास आहे. बालोद्यानशिक्षण-पद्धति ह्मणजे काल, द्रव्य व श्रम यांचा निव्वळ अपव्यय आहे हें केवळ सुधारलेलें खूळ आहे. असा कित्येक तद्विषयानभिज्ञ लोकांचा दुराग्रह

आहे. + खानदेश जिल्ह्यांतील तीस रुपये पगाराहून अधिक पगारांच्या मराठी हेड मास्तरास बालोद्यानशिक्षणपद्धतीची माहिती एक महिन्यांत देण्याचें घाटत आहे, त्यावरून अशीच गैरसमजूत तिकडे झालेली आहे. पण ती धूम्रपटलाप्रमाणें दूर होण्यासारखी आहे असा या लेखकास अनुभव आलेला आहे. त्याच्या एका पदवीधर स्नेह्याचा असाच चुकीचा समज प्रथम झालेला होता. पण 'चक्षुर्वै सत्यं' या प्रमाणशास्त्राचे वचनानुसार त्याची ती समज दूर होऊन दोन वर्षांपूर्वी ते या लेखकास कळवितात कीं, आपण प्राथमिक शिक्षणाविषयीं जो कळकळीचा अमोल सल्ला मला देत असा, त्याचीच आठवण मला आतां मद्रासेंतला सैदापेठेंतील शिक्षकपाठशाला पाहून होते हें कळावियास मला संतोष वाटतो. $

असो. अशी जी चळवळ उडविणारी बालोद्यानशिक्षणपद्धति ती कोणी कोणत्या तत्त्वांवर, कोणत्या प्रसंगीं बसविलेली आहे, तिची फलश्रुति काय आहे हें ज्ञान प्राप्त झाल्यानेंच सुशिक्षित आईबापांचाहि भ्रम नाहींसा होंत असतो. ह्मणून तिची पूर्वपीठिका येथें संक्षिप्त रीतीनें दिल्यास विषयांतर होणार नाहीं असें वाटतें.

आठराव्या शतकाचे शेवटीं, जर्मनी देशांतील एका खेड्यांत फ्रोबेल् हा महापंडित जन्मला. त्याची आई त्याचे लहानपणींच मरण पावली. त्याच्या बापास त्या खेड्यांतील भिक्षुकीची वृत्ति होती. त्यानें आपली पहिली बायको मरतांच, दुसरी केली व तेव्हांपासून लहान फ्रोबेलची हिडीसफिडीस होण्यास सुरवात झाली. ही त्याची अनास्था पाहून,

---

+ आर्यावर्त (धुळें १५-८-०३) पहा.

$ * * * I am glad to inform you it is just an incident that reminds me particularly of your very kind and valuable advoice on the subjct of Primary Education. It is the sight for the first time of the different gifts of the kindergarten series at the L. T. Collage (Saidapet), Madras. * * * (Black Town, Madras 15th May 1901)

त्याचे मामानें त्यास आपल्या घरीं नेऊन विद्यादान देण्याचें मनावर घेतलें. तरी पण आईची सर दाईला कोठून येणार? फ्रोबेलचें मन तीळ तीळ तुटे. त्यास सहज वाटे कीं आपणास शिकविण्यास चांगले आईबाप असते, तर काय मौज झाली असती? सध्यां किती आपली कष्टद स्थिति आहे!'

हें बालपणाचें घोर चित्र फ्रोबेलचे शोधक मनावर इतकें उत्तम ठसलें होतें कीं, विसावे वर्षींच जेव्हां तो शाळा घालून आपला चरितार्थ चालवूं लागला, तेव्हां त्यानें आपला फुरसतीचा वेळ गप्पागोष्टी, सोंगट्या, बुद्धिबळें, बिझिकपत्ते नाटकतमाशे, नाचबैठकी यांत न घालवितां 'अनेक संशयोच्छेदि परोक्षार्थस्य दर्शकं' असें जें शास्त्र त्याचे अध्ययनांत घालविला; व तीन वर्षांपासून सात वर्षांच्या बालकास अनायासानें कसें शिकवावें याविषयीं विचार चालविला.

त्या श्रमांची फलप्राप्ति फ्रोबेल यास चौदा वर्षांनीं झाली. त्यानें बालोद्यान ह्मणून बालशिक्षणाची पद्धति शोधून काढिली. तिला असें ह्मणण्याचें कारण, त्याच्या शाळेच्या खिडक्यांखालीं एक सुंदर बाग होती ह्मणून नव्हे, तर लहान मनुष्यरूपी होण्याची जेथें बरदास्त ठेवतां येईल, त्या स्थानास फ्रोबेल 'किंडरगार्टन' किंवा बालोद्यान ह्मणत असे. तेथें मुलांचे उद्योग ह्मणजे खेळ हेच चालावेत; व ज्यामुळें मुलांस मौज वाटेल, तेच त्यांचे खेळ असावेत. या प्रमुख सिद्धांतास समोर ठेवून फ्रोबेलनें मुलांचे असे खेळ बसविले कीं, त्यांना ते खेळच्या खेळ होऊन धडेच्याधडेहि व्हावेत. त्यामुळें मुलांस खेळावयाचें खेळावयास सांपडून नवीन नवीन शब्दांची माहिती पण त्यांस व्हावी; त्यामुळें त्यांची शरीरवृद्धि व मनोविकास हीं बरोबर व्हावींत; व त्यामुळें त्यांस नीति व परमेश्वरभक्ति हीं सहज कळावींत.

सारांश, मुलांच्या अंगचें जें तत्त्व विकास करावयाचें असतें तें सर्वसामान्य 'आत्मतत्व' होय. तें बाह्यसृष्टि, स्वभाव, व्यक्तित्व व विशेषत्व

यामुळें उत्पन्न झालेला भिन्नपणा, इत्यादि उपाधींनीं वेष्टित आहे; सबब त्या सोपाधिक आत्मतत्त्वाचा विकास कसा करावा ह्मणजे बालकाचे शारीरिक, बुद्धिविषयक, नैतिक, धार्मिक असें बहुविध शिक्षण अनायासें त्यास कसें द्यावें हें आईबाप व शिक्षक यांस अवश्य अवगत असलें पाहिजे. तेव्हां त्यांस बालस्वभावाचा अदमास करतां यावा ह्मणून पुढील ठळक नियम त्यांनीं मनांत निरंतर वागविण्यासारखे आहेत.

(१) प्रत्येक मुलाचे अंगीं चांगुलपणा बीजरूपानें असतो.

(२) मुलाचे इच्छाशक्ती चा विकास सहज होऊं दिला पाहिजे.

(३) मातृप्रेमास ज्ञानाचा दुजोरा मिळाल्यास बालकांशीं त्यांचें तादात्म्य सहज होईल.

(४) लहान मुलांस गाणें अत्यंत आवडतें.

(५) त्यांस चित्रकलाहि फार आनंददायक असते.

(६) त्यांचे ठिकाणीं पूर्ण कल्पनाशक्ति ह्मणजे बीजरूपानें कर्तृत्वशक्ति वास करीत असते.

अशी बालोद्यानशिक्षणमीमांसा आहे. या शिक्षणाचा मुख्य उद्देश प्रत्यक्ष पदार्थ दाखवून, त्यापासून लहान मुलांस सर्व प्रकारचें ज्ञान प्राप्त करून देणें हा होय. या पद्धतीचा मुख्य कटाक्ष सध्यां धुमधडाक्यानें चालू असलेल्या शुष्क व निरर्थक अशा घोकंपट्टीस अजीबात शह देतां आल्यास देऊन पहाणें यापेक्षां दुसरा कशाकडे नाहीं. रामरक्षा, महिम्न, पुरुषसूक्त इत्यादि तोंडपाठ करविणें, अमरासारख्या कोशांची किंवा रूपावळी, समासचक्र, उजळणी यांची पोपटपंची मांडून तिचें कौतुक करीत बसणें, खुर्ची, गुडी, सूर्याचीं पिलें, मुंजीची पुरणाची पोळी, + तात्या पंतोजीच्या शाळेंतील चवदावें रत्न

+ असले मेंढपाळ सुधारलेल्या राष्ट्रांतून असत; अशी गोल्डस्मिथ या लोकप्रिय आंग्ल कवीनें असल्या जगद्विख्यात ‡ सोडलेलें खेडें (The Deserted village) या लघुकाव्यांत साक्ष दिली आहे:—

असल्या कडव्या शिक्षा बालकास देऊन § आईबापांनीं किंवा शिक्षकानें आपण स्वतः बागुलबोवा बनणें; हे प्रकार बालोद्यानशिक्षणपद्धतीस बिलकुल संमत नाहींत. हंफ्रे साहेबांनीं 'हंसा व शिका' (लॉफ अँड लर्न) एडवर्ड बुइब साहेबांनीं 'मुलांचें इंद्रभुवन' (पॅरेडाईज ऑफ चिल्ड्रन) या मान्य पुस्तकांतून सदरहू पद्धतीचा गौरव करून तींतील शिक्षणाच्या निरनिराळ्या पायऱ्या (लिफ्ट्स्) दिल्या आहेत.

[मागील पृष्ठावरून]

" Beside you struggling fence that skirts the way
With blossomed furs unprofitably gay
There in his noisy mansion *skilled to rule*
The village master taught his little school:
A man severe he was and stern to view
I knew him well and every truant knew;
Well had the boding tremblers learned to trace
The day's disasters in his morning face "

यांत त्या खेड्यांतील शाळामास्तर मोठा कडक होता; एवढें आलें आहे. पुढें तो थट्टेखोर, जाडाविद्वान् व वजनदार होता असें विनोदात्मक वर्णन आहे. पण तें विषयांतर ह्मणून गाळलें आहे.

§ आईबापांच्या कडकपणाविषयींहि कांहीं मासले देण्यासारखे आहेत. डॉ. आनंदीबाई जोशी आपल्या आईविषयीं असें लिहितात—" माझ्या आईनेंदेखील ममतेच्या शब्दांचा उपयोग केला नाहीं. मला शिक्षा करावयाची ती लहानशा दोरीनें किंवा वादीनें नव्हे; तिनें नेहमीं दगड, लांकडें व विस्तव यांच्याशीं गांठ ठेविली होती. माझ्या सुदैवानें माझ्या अंगावर त्यांच्या खाणाखुणी राहिल्या नाहींत, अथवा तिच्या त्या माराच्या सपाट्यांत मी लंगडीलुली किंवा कुबडी झालें नाहीं. ईश्वरकृपेनें माझे अवयव धडधाकट राहिले! पण हाय! हाय! त्या गोष्टीची आठवण झाली ह्मणजे मनाला किती दुःख होतें! तो लहानपणाचा काळ निघून गेल्यावर माणसाचे प्रेमांत कांहीं अंतर पडतें अशांतली गोष्ट नाहीं! तथापि आईचीं कर्तव्यें काय आहेत तीं तिला त्यावेळेस कळत नाहींत. त्याचप्रमाणें मातेविषयीं बालकास स्वभावतः वाटणाऱ्या प्रेमाचा अनुभव मला आला नाहीं. ज्या बालकाचे मनांत आईबापाविषयीं भीति व दहशत

पंडिता रमाबाई, रा. महादेव कृष्ण पाध्ये, रा. सा. गणेश जनार्दन आगाशे बी. ए, रा. जगन्नाथ मोरेश्वर सामंत बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं या दिशेनें मराठींत निबंधरूपानें प्रयत्न केलेले आहेत. अखेरच्या गृहस्थांनीं बालोद्यानशिक्षणपद्धतीचीं तत्त्वें अनुभवानें सिद्ध करून पाहण्याकरतां, सोलापूर येथील सरस्वतीमंदिरांत तिचा प्रवेशहि केलेला आहे. मागें प्रेयर साहेबांचे ग्रंथाविषयीं लिहित असतांना, या लेखकासहि बालोद्यानशिक्षणपद्धतीचा अनुभव घेण्यास सांपडल्याचें आलें आहे. पदवीचे परीक्षेकरतां ज्या मानसिकशास्त्राचा अभ्यास याजला करावा लागला, त्याचा शिक्षणशास्त्राकडे कसा उपयोग करतां येईल हें पाहण्याची त्याची खटपट सतत चालू असतां, त्यास मिसेस् मेरिया एजवर्थ या ग्रंथकर्त्रीची ‘ चांगली अध्यापिका ’ (गुड गवर्नेस) ही नैतिक व बालोद्यानशिक्षणपर कथा वाचून, आपल्या लहान बहीणभांवडास त्या पद्धतीचा अलभ्यलाभ करवून द्यावा असें त्याच्या मनांत येऊन एक वर्ष दीड वर्ष हें शिक्षणसत्र सुरळित चालवून

[मागील पृष्ठावरून]

असते, त्या बालकाचे मनांत आपल्या मातापितरांविषयीं प्रेमभाव असणें अशक्य आहे. व ज्या बालकाचे मनांत आईबापाविषयीं प्रेमभाव असतो, त्याच्या मनांत त्यांविषयीं भय राहत नाहीं. बालपणाच्या सुखास जें बालक मुकलें तें खरोखर अत्यंत अभागी असें म्हटलें पाहिजे. माझी अशी पक्की खातरी आहे कीं, आपल्याजवळ जर गुरुकिल्ली आहे, तर आपण या गोष्टींत खचित बदल करूं. मला जर मूल झालें, तर बालकांस शिक्षण कसें द्यावें हें मी आपल्या उदाहरणानें शिकवीन. ”-डॉ. आनंदीबाई जोशी यांचें चरित्र (पृ. ७।८). तात्यापंतोजी—वळण पुष्कळ जुन्या काळच्या गृहस्थांत आढळतें असा प्रत्येकास अनुभव आहे. ‘ दामोदर ’ या शब्दाची व्युत्पत्ति ऐकून, जसा यशोदा मातेचा कठोरपणा व तापटपणा समजून येतो, तसा दुर्वास किंवा जमदग्नि यांच्या मूर्ति अद्यापि आढळून येत असल्यामुळें जुन्या वळणाच्या गृहस्थाचा तामसी स्वभाव व्यक्त होतो. त्यांची डुरकावणी, डोळे वटारणें, अंगांवर धावून येणें, इत्यादि राक्षसी प्रकारानें कोमल मनाचे बालकाची पांचावर धारण बसते !

त्यास आपला इष्ट हेतु बराच तडीस नेतां आला. त्याचें प्रत्यंतर थोडक्यांत येथें देणें अनुचित नाहीं. बालस्वभाव ओळखण्याकरतां शिक्षकानें 'वास्तविक खेळणीं' (रॅशनलटाईज) यांच्या भेटी मुलांस वयपरत्वें दिल्या पाहिजेत. या लेखकाचीं बहीणभावंडें जरा जाणतीं असल्यामुळें, त्यानें त्याकरतां जी संस्था चालविली होती तींत एक काम चालवून मुद्रणयंत्रालय, एक छोटेखानी साप्ताहिक पत्र, एक चिमुकलें पुस्तकालय, मुलांच्या सभा, मुलांचीं वनभोजनें, मुलांचे उत्सव, मुलांचे खेळ अगदीं वेळचेवेळीं मोठ्या हौशीनें होत असत. सारांश जीं जीं कामें मुलांस सांगावीं तीं तीं रंगांत येऊन मुलें करूं लागलीं ह्मणजे बालोद्यानशिक्षणपद्धतीप्रमाणें शिक्षकाचा हेतु बराच सिद्धीस गेला असें ह्मणण्यास पुष्कळ आधार आहे. सदरहू संस्थेचा उत्कर्ष पाहून, नाठळ मुलांना ताळ्यावर आणलेले पाहून 'वळतील तर सुतें नाहीं तर भुतें' असा ज्यांचा प्रकार त्यांना मुठींत ठेवलेले पाहून प्रत्यक्ष आईबापांना जीं वळणार नाहींत, तीं त्यांच्या बालोद्यानशिक्षणज्ञ वडील बंधूच्या तिळीं असलेलीं पाहून, या लेखकाच्या पूज्य पितृव्यांस मोठें कौतुक वाटत असे. ते स्वतः शिक्षक, न्यायाधीश व एम्. ए. एल्एल्. बी. पदवीधर होते; पण त्यानांहि हा नवीन प्रयोग सिद्धीस गेलेला पाहून मनापासून संतोष वाटत असे, हें त्यांच्या चालचर्येवरून स्पष्ट दिसे. एवढेंच नव्हे, तर ते स्वतः ही बालक्रीडारूपी शिक्षणपद्धति पाहण्यास घटकाघटका येऊन बसत व आपले सहधर्मचारिणीसहि ती पहाण्यास सांगत. अशा परोक्षरीतीनें ते या लेखकास वरचेवर उत्तेजन देत असत. त्याची येथें आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. वरील संस्थेंतील एका भगिनीचे पदवीधर पति या लेखकाचे त्याच मान्य पितृव्यांस असें ¶ लिहितात; 'प्रयत्नांतीं परमेश्वर, चिमुकलें संस्थान प्रयत्नशील आहे व देव त्यास साह्यकारी आहे.' पुढें एक वर्ष दीड वर्षांनीं सदरहू पितृव्यांच्या अकाल मृत्यूनंतर तेच गृहस्थ या लेखकास

¶ "God helps those who help themselves, the Chimukale Samsthana has helped itself and good does help it!"

आभारदर्शक असें लिहितात कीं माझ्या पत्नीस आपण आपल्या नेहमींच्या रीतीप्रमाणें कविता, नाटक, मनोरंजनपर कथा यांनीं जें प्रेमपुरःसर शिक्षण देत आहां, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

याच बालोद्यानपद्धतीचा प्रसार इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, अमेरिका येथें सपाट्यानें चालू आहे. चिकागो येथील डॉ० डिवे † यांनीं

† University Elementary School (Chicago, U. S.) Indian Educational Journal (Madras, 1898)

तें पाहून, याचे वयोवृद्ध गुरु यास अशी शाबासकी देतात " Certified that Mr. —is a born teacher of children for whom he has shown much sympathy. His paper ' Vidya ' is a very good evidence of it " मी असा दाखला देतों कीं, रा.—हे मुलांचे शिक्षक स्वभावतः आहेत. त्याबद्दल त्यांनीं पुष्कळ कळकळ दाखविली आहे. याचें उत्तम प्रमाण त्यांचें विद्या हें मासिक पुस्तक होय. " परंतु त्यास लोकाश्रय पुरेसा न मिळाल्यामुळें, तें बंद पडलें. तरी निराश न होतां, त्यानें बालोद्यानशिक्षणपद्धतीवर एक मराठी व एक इंग्रजी असे दोन निबंध लिहिले. व मुलींच्या शाळेकरतां एक गाण्याचें पुस्तक रचिलें. मराठी निबंधाचा परिणाम म्हणजे एवढाच झाला कीं, वर आलेल्या रा. सामंताचे निबंधास त्यामुळें कदाचित् यत्किंचित् स्फूर्ति मिळाली असेल. मराठी मुलींचे गाण्याचे पुस्तकास कोरडे आभार मिळाले; व इंग्रजी निबंधासहि असेंच वायफळ बक्षीस मिळालें. तो आभार व तें बक्षीस येणेंप्रमाणें-

" I acknowledge with thanks the receipt of a Ms. copy of action-songs composed by you. All of us here like the songs. Shastri has kindly undertaken to render or adapt them into Hindi: As soon as I have get them copied out, I shall return the book to you. Though it has been a labour of love to you, I am not the less obliged to you. "

" I wish I can help you in some way as you have taken grat pains to write an Essay on the " Kindergarteon System of Educatin. " Madan Lal Lullubhai Munsiff, Secretary! Bombay Branch National Indian Association.

याच पद्धतीवर आपला शिक्षणक्रम बसविला आहे. त्यांत त्यांचा मूळ हेतु मुलांचा चौकस स्वभाव राखावा असा आहे. उदाहरणार्थ, मुलें जेवत असतांना तीं सहज विचारतात, आपण जेवतों तें अन्न कोठें, कसें, केव्हां तयार होतें; आपण पांघरतों ते कपडे कोठें, कसे, केव्हां तयार होतात. सारांश, जें जें त्यांच्या पहाण्यांत येतें, तें तें चौकसबुद्धीनें निरखीत असतां, आईबापांनीं व शिक्षकांनीं त्यांच्या हातांत कोणतेंहि पुस्तक न देतां, त्यास लागेल ती माहिती तोंडीं पुरविली पाहिजे. + त्यास, इतिहास, भूगोल, अंकगणित, वर्णोच्चार किंवा कोणताहि विषय अभ्यास ह्मणून नेमून न देतां सुतारकीच्या वर्गांत, सूपशास्त्राचे वर्गांत, यंत्रशास्त्राचे वर्गांत लागेल तसतशी माहिती क्रमाक्रमानें दिली पाहिजे. अशा धड्यांचा मतलब ज्यांना लिहितां येऊं लागला असेल, त्यांनीं लिहून आणला पाहिजे. अशा रीतीनें प्रत्येक विद्यार्थ्यास अक्षर, वर्णोच्चार, विरामचिन्हें, वाक्यरचना, इत्यादिकांची माहिती होते. प्रयोगांत वापरलेली प्रत्येक वस्तू ही कोठें होते हें सांगत गेल्यानें मुलांस भूगोलाचें ज्ञान होतें. इतिहासांतील मनोरंजक गोष्टी सांगतांना नकाशा वारंवार दाखविला जातो. सूपशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र यांचे वर्गांत रसायनशास्त्र समजावून दिलें जातें. अशा रीतीनें सर्व शास्त्रांचें अध्ययन एकाच काळीं चालू असल्यामुळें, एकाची मदत दुसऱ्यास सहज होते. मुलांना बैठी कैद नसते. तीं गुरुभोंवतीं जमतात. तीं एकमेकांस आपले विचार मोकळ्या मनानें प्रकट करतात. मुलांचीं आवडतीं पुस्तकें शाळेंतील पुस्तकालयांतून घेऊन वर्गांत मोठ्यानें वाचण्याची त्यांस पूर्ण मुभा असते. त्यांस गुणावगुणदर्शक ‘ मार्क ’ देऊन त्यांच्यांत ईर्ष्या मत्सर इत्यादि दुष्ट मनोविकारांस उत्तेजन मिळत नाहीं. त्यांस बागुलबोवाप्रमाणें विनाकारण छळणाऱ्या परीक्षांचा त्रास नाहीं.

+ या दिशेनें आईबापांस व शिक्षकांस मदत व्हावी ह्मणून एका आंग्ल अध्यापकानें एक पुस्तक ‘ बालज्ञानमार्गदर्शिका ’ (धि चिल्ड्रन्स् गाईड टु नॉलेज) या नांवाचें लिहिलें आहे. या ४६६ पृष्ठांच्या पॉकेटसाईझ पुस्तकाच्या ५२ आवृत्त्या निघाल्या आहेत.

तरी प्रत्येक मुलास काय येत असतें याचें टिप्पण वर्गावरील शिक्षक करून ठेवीत असतो. या शाळेंत ९ पासून १३ वर्षांचीं ६० मुलें आहेत. त्यांस शिकविण्यास ९ स्त्री-पदवीधर शिक्षक आहेत; या शिवाय ४।९ विश्वविद्यालयांतले अध्यापक येथें रोज १।२ तास येऊन शिकवीत असतात.

बालोद्यानशिक्षणपद्धतींत सुधारणा करण्याचें असेंच श्रेय फिलॉडेल्फिया येथील वेड्यांच्या शाळेवरील मुख्य डॉक्टर टॉमस कर्कब्राईड यांनीं मिळविलें आहे. त्यांची कल्पना अशी आहे:—सध्यांच्या शिक्षणपद्धतींत बुद्धिविषयक शिक्षणाचें फार स्तोम माजलें आहे. त्यांत हस्तकौशल्याचा बराच भाग असावा ह्मणजे पूर्वींच्या एकदेशी शिक्षणानें मेंदूच्या ज्ञानतंतूवर जो भार पडून वेड लागल्याचेंहि भय असे, तें चुकेल व

गुणैश्च गात्राणि समं पुपोष ।

असा सर्वत्रांचा प्रकार घडेल. ही आपली कल्पना त्यांनीं तेथील मि० टॅड या कारागिरास कळविली. त्यावरून त्या कल्पक कारागिरानें एक पुस्तक + लिहिलें. त्यांत चित्रें काढणें, नमुने तयार करणें, मातीचीं चित्रें बनविणें व लांकडावर कोंरीव काम करणें इत्यादि विषय आळीपाळीनें मुलास कसे शिकवावे याचें विवेचन केलेलें आहे. व याप्रमाणें त्यांना त्या डॉक्टरांच्या मुलांस व त्या वेड्यांच्या शाळेंतील कांहीं वेड्यांस शिकविण्यासहि सुरवात केली. त्याचा अनुभव त्यास असा आला आहे कीं, अशा मनोरंजकविषयांत शरीर व मन गुंतलेलें असलें, ह्मणजे त्यास दुर्गुणाकडे वळण्यास वाव सांपडत नाहीं.

आतां येथून आपण बालशिक्षणावर येऊन थडकलों. कॉबेट साहेब सात वर्षांपासून पुढें मूल १४।१९ वर्षांचें होईपर्यंत त्यास संसारांत लागणाऱ्या विषयांचें जें शिक्षण द्यावयाचें, त्यास ते ' धोपटमार्गी शिक्षण ' (कॉमनसेन्स एजुकेशन) ह्मणतात. लहान

+ ' शिक्षणशास्त्रांतालि नवीन प्रकार ' (New methods in Education) —The Arena (Boston, Ul. s. Vol XX11, No. 3.)

मुलांच्या हातून खुषीनें चित्रें दाखवून, बागबगिच्या सारखीं कामें हातीं करवून, लेखनव्यवसाय आपल्या उदाहरणानें त्यास दाखवून त्यांस अवश्य त्या गोष्टींची माहिती करून द्यावी. त्यास कादंबऱ्यासारख्या भाकड कथा, कवितेसारखी असोत्पादक वाङ्मय शाखा, व वर्तमानपत्रां-सारखे वेळ मारून नेणारे लेख यांची गोडी लावणें व्यर्थ आहे. आपण होतों कोण, आहोंत कोण व होणार कोण, आपण राहतों कोठें; आपण बोलतों व लिहितों कसें; आपला जमाखर्च चालतो कसा; आपला स्वयं-पाक होतो कसा; आपला बचाव कसा करतां येतो व आपलें पोट कशावर चालतें; एवढ्यापुरता इतिहास, भूगोल, व्याकरण, अंकगणित, शस्त्रास्त्रविद्या व कृषिकर्मविद्या व व्यापार हीं त्यांस अवगत झालीं ह्मणजे काम झालें. इतकें सामान्य शिक्षण झालें ह्मणजे ज्यास जो आवडेल व झेंपेल तो धंदा त्यानें उचलावा. ' पाल व व्हर्जिनिया ' यांना असें धोपटमार्गी शिक्षण हसत खेळत घरींच त्यांच्या दुर्दैवी आयांनीं दिलेलें आपण वाचतों.

पॉल व व्हर्जिनिया हीं बोलूं लागलीं, तेव्हांपासून तीं एकमेकांस ताई व भाऊ असें हांका मारावयास शिकलीं. एकमेकांस मदत करावी, व खुष करावें हें त्यांचें शिक्षणसार होतें. व्हर्जिनिया घरधंदा पाहण्यांत गर्क असे, पॉल आपला गुलाम डोमिंगो याबरोबर आपल्या झोंपड्या-भोंवतालील बागेंत खपत असे. त्या दोघा बहिणभावंडांना काळ्यावर पांढरें करतां येत नव्हतें. त्यांना इतिहास, शास्त्र, नीतितत्वें किंवा ब्रह्मज्ञान यांचा गंध नव्हता. त्यांना धर्माविषयीं जीं दोन अक्षरें शिक-विलीं होतीं तीं ' प्रेम ' हीं होत. तीं देवळांत जाऊन घंटानाद करून भक्तीचा आविर्भाव करण्यास शिकलेलीं नव्हतीं. त्यांच्या सद्गुणी पण दुर्दैवी आयांनीं त्यांस घरींदारीं, रानींवनीं, कोठेंहि असलें तरी परमेश्वरास हात जोडून प्रेमळ मनानें प्रार्थना करण्यास शिकविलें होतें! कण्वमुनीनें शकुंतलेस व प्रॉस्पेरोनें मिरँडेस असेंच सरळ, सुलभ व उप-युक्त शिक्षण दिलेलें होतें!

बडोदें येथील राजपुत्रविद्यालयाचे विद्वान् गुरु रा. सा. गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए. यांनीं पण कॉबेटच्या धोपट मार्गी शिक्षण क्रमासारखाच एक शिक्षणक्रम अलीकडे लोकचर्चेकरितां ग्रंथमालेंतून प्रसिद्ध केलेला सुज्ञ वाचकांस अवगत असेलच. त्यांत, कॉबेट्च्या शिक्षणक्रमाप्रमाणें, कवितेस व कादंबरीस अजीबात फांटा दिलेला नाहीं. उलट, त्यास गायन व चित्रकला याची जोड दिलेली आहे. तसेंच त्यांत धर्मशिक्षणाचाहि समावेश केलेला आहे. युनिव्हर्सिटीकमिशननें उच्चशिक्षण दुर्मिळ होणार व प्राथमिक शिक्षण सध्यां आहे असें अर्धे कच्चें राहून पुढें निभाव लागणार नाहीं हें पाहून वरील सद्गृहस्थानें आईबापांस मोठ्या अडचणींतून सोडविण्याचा मार्ग काढिला आहे. तो खासगी रीतीनें आतां अंमलांत येण्याचा अवकाश आहे. तोंपर्यंत त्याच्याविषयीं शहानिशा होणें आपणाकडे राहिलें आहे. सदरहू रा. सा. सरदेसाई यांनीं इंग्रजीसारखी परकीभाषा इंग्रजीद्वारें (मराठीद्वारें नव्हे) कशी थोड्या श्रमांत शिकवून आपल्या संततीची शक्ति व उमेद रक्षण करावी हेंही उत्तमप्रकारें दाखविलें आहे. + त्याचा उपयोग करून पाहणें हें आतां प्रत्येक सुशिक्षित आईबापांकडे आहे. तीन वर्षांपूर्वीं या लेखकास त्या नवीन पद्धतीचा थोडासा अनुभव घेण्यास सांपडला होता. एका स्नेहानें आपल्या मुलास इंग्रजी लवकर शिकविण्याचे इराद्यानें त्याकडे धाडिला होता. तेव्हां महिना दीड महिना त्या पद्धतीवर तोंडी धडे बसवून व ते पुढें त्याकडून लिहवून जरूर जरूर अशा वस्तूविषयीं ज्ञान त्यास प्रत्यक्ष इंग्रजीभाषेंतून किती सुलभ रीतीनें व भाषांतरपाठमालेसारखा मोठा जंगी द्राविडी प्राणायाम चुकवून देतां आलें याचें त्यास अझून राहून राहून आश्चर्य वाटत आहे. पुढें त्या मुलास कांहीं अडचणीमुळें

+ हैद्राबाद हद्दींतील गोदावरी तीरस्थ तैलंग हे इंदूर, ग्वाल्हेर सारख्या परप्रांतीं हिंदी व मराठी यासारख्या परभाषा बोलण्याचालण्यानें संपादून आपल्या सूपशास्त्रांतील कौशल्यास त्यांची जोड देतात! तसेंच मरुदेशस्थ लक्ष्मीपुत्र महाराष्ट्रांत येऊन तेथील भाषा व साहूकारी बहुधा बरोबर मिळवितात! यांतलें रहस्यतरी हेंच आहे.

त्याचे आईबापांनीं आपल्या गांवीं नेलें. नाहीं तर या लेखकाचा मनोदय त्यास त्या पद्धतीनें अखेरपर्यंत तयार करण्याचा होता. अझून देखील तशी संधि सांपडल्यास ती फुकट न जाऊं देण्याकरतां तो बकध्यान धरून बसला आहे.

परभाषा सुलभ करण्याकरतां जसा रा. सरदेसाई यांनीं आईबापांस व शिक्षकाकरतां उपाय सुचविला आहे, तसा निबंधचंद्रिकाकार[1], केसरीकार[2], भारतीय साम्राज्यकार[3], बॉबू सुरेंद्रनाथ बॉनर्जी[4], श्रीमंत सयाजीराव

---

१ ' मराठीभाषेची दैना ' (अंक ४२) हा निबंध पहा.

२ ' जपानी शिक्षणावरील निबंध ' वर्ष २०, अंक पहिला पहा.

३ ' भारतीय साम्राज्य ', पुस्तक ११, पृ. ४२६ पहा.

४ आपल्या ' बंगाली ' या इंग्रजी पत्रांत ते ह्मणतातः—

,, India is the only country in the world in which Education is imparted through the medium of a foreign tongue. Time was when such a course was absolutaly necessary in the interests of Education. But in the course of years the education and labour of ingenious scholars have developed our Vernaculars and brought them to a condition when they may safely be used as vhicles for Education and instead of the partial, half-hearted recognition at present accorded to them by our Universities, we believe, the people of India will never be a great nation or a great congeries of nations till the Vernaculars are solely employed for the purpose of imparting Education in History, Mathematics, and in Science. English we can not do without. For, knowledge of English means bread and butter to us "

—Vernaculars as Mediums of Education (The Bengali, 18th May 1900).

गायकवाडे यासारख्या थोर थोर विद्वान् मंडळींनीं इंग्रजी खेरीज बाकीचे सर्व विषय, जपानांतील किंवा सुधारलेल्या इतर कोणत्याहि राष्ट्रांतील शिक्षणपद्धतीप्रमाणें, देशी भाषांतून शिकविण्याची सोय होणें इष्ट आहे असें सरकारास सुचविलें आहे. परभाषा शिकण्याचा त्रास अगोदर कांहीं

---

५ गायकवाड सरकार तर देशीभाषेंतून शिक्षण देणारें हायस्कूल काढणार आहेत. मद्रास इलाख्यांत देशीभाषा हायस्कुलांतूनच नव्हे, तर कॉलेजांतूनहि चालू आहे. पण हा भाषाविषय जुन्या पद्धतीप्रमाणें चालू असल्यामुळें, त्यास इंग्रजीभाषेशीं मेळ घालतां येत नाहीं. पण तो नव्या पद्धतीप्रमाणें शिकविल्यास भाषांतरांत विद्यार्थ्यांची (पदवीधरांचीहि) जशी हारांबळतारांबळ उडते तशी उडणार नाहीं. तिकडील एक युरोपियन अध्यापक असें ह्मणतातः—

"There is a great gulf between the Verancular (i. g. Tamil) and English, in so far as grammar is concerned, as it is taught representative of western scientific methods. The study of the Vernacular has absolutely no connection with or bearing on the study of English. The two subjects are kept, as it were, iu separate watertight compartments, and a rough surgical operation is necessary to effect any fusion. so much is this the case that the average graduate who has taken English and a Vernacular is unable to translate an ordinary newspaper piece into his own mother tongue. Further, the Vernaculars are in a state of flux, and it is no uncommon thing to find two recognized authorities hopelessly at variance on the subject of their own Vernacular. The result of this is that the school-boy acquires a supply of words with very little regard for their meaning. I would, therefore, (a) as a preliminary measure, make vigorous effort to standardize the Vernaculars and to have written in them Grammars on Western principles. Next, I would (b) abolish the oldfashioned Pundit and would, as opportunity presented itself, replace him by a man trained in the Western ideas and methods so that the teaching in the Vernacular should not be separated from the methods employed or which should be employed in the teaching of English. It would then be possible to continue teaching in the Vernacular to a higher standard than is done at present. *The ordinary subject of a school-course should be tuught through the medium of the Vernacular*...........The New Scheme for Vernacular Education in Bengal is decidedly

कमी नसतो. इतर विषयहि तींतून शिकण्याचा यत्न ह्मणजे मग तर केवढा द्राविडी प्राणायाम! उदाहरणार्थ, संस्कृतसारखा स्वदेशी विषय देखील इंग्रजीसारख्या विजातीय भाषेंतून शिकविल्यानें तो लवकर येईल कीं मराठीसारख्या सजातीय भाषेंतून शिकविल्यानें लवकर येईल हें कोणाहि सुज्ञ वाचकास तेव्हांच समजणार आहे.

मागील पृष्ठावरून.

a step in the right dirction and should be watched with great attention, not in an ungenerous spirit of adverse criticism, but for the sake of deriving benifit even from its fautls. "

——English and the Indian Educatian, No- 7-

मराठींत नवीन पद्धतीवर अनेक व्याकरणें झालेलीं आहेत. तेव्हां, केवळ मद्रासे सारखीच मुंबईकडे ओरड नाहीं; पण इकडे इंग्रजीखेरीज बाकीचे विषय देशी-भाषेंतून शिकविण्याची गरज वाटत आहे. वायव्यप्रांतांतील शाळाखात्याचे डायरेक्टरसाहेब ह्मणतात कीं, निदान इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत अशा रीतीनें शिक्षण दिल्यास, पुढें इंग्रजी भाषेचें ज्ञान मजबूत पायावर होतें. 'राष्ट्रीय शिक्षण-विषयक पत्रकां' (National Educational Record) त आलेला १८०९ चा वार्षिक रिपोर्ट पहा. अलीकडे पंजाबांतील विश्वविद्यालयाप्रमाणें, अलाहाबाद येथील विश्वविद्यालयानें वरच्या परीक्षांत 'देशीभाषेंतून इंग्रजींत भाषांतर' हा एक विषय घालून देशीभाषांस उत्तेजन दिलें आहे. वर आलेल्या डचेस्ने या मद्रासकारांस बंगाल्यांतील देशी भाषांतून शिक्षण देण्याची नवीन पद्धत रुचत आहे. ब्रह्मदेशांत तर सरकारानें अशाच पद्धतीनें शिक्षण देण्याचा हुकूम कांहीं वर्षांपूर्वी सोडिला होता; पण परस्थ शिक्षकांस देशी भाषा नीट येत नसल्यामुळें व परीक्षा सर्व विषयांत इंग्रजीद्वारें होत असल्यामुळें 'सारें मुसळ केरांत गेलें;' याविषयीं तेथील शाळांचे इन्स्पेक्टर मिस्टर एस् कॉक्स एम्. ए. हे आपला खेद प्रदर्शित करून, देशीभाषांचा पुढाकार पुन्हा एकवार घेत आहेत. ते ह्मणतात :—

" The use of the Vernacular as the Medium of intructin in all subjects except English from Standard I to VII:— per government order issued some few years ago--cannot be impugned on grounds either of right theory or the convenience of the people. It will almost certainly be found that the disuse of the Vernacular is a concession to the weakness of the teacher attended with the most regretable consequences to this class. "

—Vernacular Teaching in Burma (By S. Cocks M. A. Inspector. of Scheols, Burua—Indian Education, Vol. II. No. 2)

सरकारी मराठी सहाव्या व पांचव्या पुस्तकांतील शास्त्रीय धड्यांची मांगें एका ठिकाणीं योजना कशी चुकीची झालेली आहे हें प्रसंगोपात्त दाखविण्यांत आलें आहे. आतां फिरून तिकडे वळण्याचें कारण असें कीं, इंग्रजी सातवे इयत्तेंत विद्यार्थ्यांस वरील विषयासंबंधीं प्रयोग दाखवून माहिती करून दिली जाते. पण तेंच इंग्रजी पहिल्या तीन इयत्तांत तर तसें प्रयोगसिद्ध ज्ञान देण्याची व्यवस्था होत नाहीं. ह्मणजे अल्पबुद्धि असल्यामुळें ज्यांस वस्तुदर्शनपाठां (Object lessons) ची आवश्यकता एकीकडे मानिली जाते, त्यांसच दुसरीकडे प्रयोगरहित रुक्ष गहन ज्ञान अर्पण करण्यांत येतें. व अशा विसंगत शिक्षणपद्धतीप्रमाणें वार्षिक परीक्षेंत विद्यार्थ्यांची संख्या निम्याहून अधिक उत्तीर्ण झाली पाहिजे. तेथें बिचाऱ्या त्या मास्तरजीनें घोकंपट्टीची दंडेल करून नये तर काय करावें? व घोकंपट्टी तर दोषार्ह ह्मणून त्याज्य असा अधिकारिवर्गाचा उपदेश आहे. तेव्हां इकडे आड तिकडे विहीर, अशी वर्गाधिपतीस मृदंगाप्रमाणें दुहेरी थाप बसते. यास इलाज करून पहाणारे महात्मे देशी शिक्षणाचीं पद्धतशीर विद्यालयें काढतील ती लांबची गोष्ट आहे. ती वाघाची जांभई आहे! तूर्त ज्या शिक्षणेच्छु मातापितरांस या दिशेनें आपल्या मुलांस सुलभ शिक्षण द्यावें अशी इच्छा असेल, त्यांनीं त्यांस

‘ नदीमुखेनेव समुद्रमाविशत् ।

या कालिदासवचनाप्रमाणें घरींच शिकवावें याशिवाय गत्यंतर नाहीं.

याप्रमाणें प्रपंचांत, शिशुशिक्षण हा महत्त्वाचा विषय असतांहि ‘ प्रपंचरहस्यां ’ त बालकास नुसतें सामान्य शिक्षण दिलें पाहिजे एवढ्यासंबंधीं विवेचन आहे; पण तें होतकरू आईबापास विशेष उपयोगी पडत नाहीं. नुसतें देव आहे असें सांगून धर्मोपदेशकाचा कार्यभाग होत नाहीं. तो देव अळविण्याचा कोणता मार्ग आहे हेंहि त्यानें सांगितलें पाहिजे. ‘ शिक्षणसार ’ घ्या कीं ‘ शिक्षणमीमांसा ’ घ्या, त्यांची हीच कथा. ही उणीव दूर करण्याकरतां या लेखकानें दोन वर्षांपूर्वी एक लहानसा निबंध लिहिला होता. त्यांतील शिक्षणक्रम आईबापांस मार्गदर्शक

ह्मणून कांहींस उपयोगी पडण्यासारखा आहे. तो ज्या तत्त्वांवर ठरविला आहे तीं अगदीं ठळक व सर्वमान्य आहेत. तीं येणेंप्रमाणें—

(१) ७ वे वर्षी मुलांच्या अंतर्निरीक्षणाच्या व बाह्य निरीक्षणाच्या मानसिक शक्ति समतोल असतात.

(२) १४ वें वर्ष सरतां सरतां, त्यांच्या अंतर्निरीक्षणाच्या शक्तींचा पगडा बाह्यनिरीक्षणाचे शक्तींवर असतो.

(३) अभ्यासाचे बहुतेक शाखांस स्मरणशक्तीची आवश्यकता थोडीबहुत तरी असते. सबब मुलांची जिज्ञासा वाढवितच जाऊन फायदा नाहीं. जो विषय त्यांचे मनांत उतरवून देणें तो दृष्टान्त, मनोरंजक कथा, वस्तुदर्शन यांनीं मोहक करून त्यांची धारणाशक्ति वाढविली पाहिजे, व त्याची त्यास वरचेवर आठवण देऊन, त्यांची स्मरणशक्तिहि वाढविली पाहिजे.

या तत्त्वानुसार लिहिलेला शिक्षणक्रम या लेखकाचे मतें मुलांच्या अधिकारानुसार असा असावा:—

(अ) भाषाविषय —

- राजा रविवर्मा यांचीं रंगीत सचित्र धुळाक्षरें.
- पंडिता रमाबाई यांची शारदीय वाचनपाठमाला.
- मुलांचीं सोपीं गाणीं—चार कळ्या-पद्यसमुच्चय, कुसुमाञ्जलि.
- बालोद्यान गीतें.
- विद्या.
- गोफिणीचा खेळ—* भातुकलीचा खेळ—छोटा व्यापारी, कवाइतीचें पुस्तक, मल्लविद्या.
- आजोबानें नातवांस सांगितलेल्या गोष्टी, गोविंदरावांचीं आपल्या मुलांस पत्रें, सगुणाबाईचीं आपल्या मुलीस पत्रें.
- बालमित्र. $

---

* हीं पुस्तकें केवळ मुलींकरतांच समजावींत.

$ अशींच—इसापनीति, पंचतंत्र, बिरबलाच्या गोष्टी, हीं होत.

(आ) इतिहासभूगोल —
- बाळरामायण.
- बाळमहाभारत.
- मराठ्यांचा पत्रबद्ध इतिहास.
- हंटरकृत हिंदुस्थानचा, सरदेसाईकृत हिंदुस्थानचा इतिहास.
- मुंबई इलाख्याचा सचित्र भूगोल.

(इ) व्याकरण [मराठीभाषेचें सोपें व्याकरण, शिशुबोध व्याकरण.

(ई) गणित [बालगणित.

(उ) चित्रकला. { पाहिलेल्या घरांतील किरकोळ वस्तूंचीं चित्रें रेखाटून त्यांत एक रंग भरतां येण्यापुरती.

या शिक्षणक्रमांत सरकारी पुस्तकमालेचा अजीबात निषेध केला आहे. तो विनाकारण नाहीं. एक तर त्यांत भाषेंत अलीकडे झालेली निरनिराळी सुधारणा व्यक्त करणारे निरनिराळे नामांकित ग्रंथकारांचे उतारे नाहींत. भाषेची गोडी लावण्यास अशा उताऱ्यांची फार आवश्यकता आहे. व ही उणीव दूर करण्यासारखी आहे. रा. हरि कृष्ण दामले यांनीं भाषांतराकरितां अशाच धर्तीवर उतारे निवडून काढिले आहेत. तसे वाचनपुस्तकांत शोभण्यासारखे धडे हवे इतकेंच. दुसरें असें कीं भाषाविषयापेक्षां गहन * शास्त्रीयविषयाकडे सरकारचें अधिक लक्ष आहे. तिसरें असें कीं त्यांत वाक्यमीमांसा, पत्रव्यहार, निबंधलेखन इत्यादि उपयुक्त विषयांसंबंधीं हवी

---

* शास्त्रीय विषय सध्यांच्या यांत्रिक युगांत महत्त्वाचा तर खराच; पण भाषाविषयहि कांहीं कमी महत्त्वाचा नाहीं. प्रसिद्ध जर्मन शिक्षणशास्त्री हर्बर्ट ह्मणतो कीं, कोणतीहि भाषा शिकण्याचा हेतु विशेषत: ती भाषा बोलणाराचें हृद्गत उत्तम जाणतां येणें हा होय. पण, जर शास्त्रीय विषयांच्या भरगची खालीं वाङ्मयात्मक लेखांचा चेंदामेंदा करून टाकल्यानें हें साधावें कसें? खरोखर, मुळींच साधत नाहीं यास प्रत्यंतर दूरचें नलगे. अगदीं सुधारलेली नवी ‘ राजा आल्फ्रेडची पुस्तकमाला ’ (King Alfred Readers) घेतली, तरी तींत आठदहा धड्यांत एखादा शास्त्रीय धडा निघतो जी ही विषयव्यवस्था इंग्रजी भाषेस लागू आहे, ती मराठीस कां लागू असूं नये गूढच आहे.

तशी मुबलक माहिती नाहीं. ती मोडी पुस्तकांतून आली आहे. तरी ती मुलांस झेंपेल व मनोवेधक होईल अशी हवी आहे. वायव्य प्रांतांतील सरकारी उर्दू पुस्तकांतून अशी सोय केलेली आहे. सरकारी पुस्तकें सुलभ होत आहेत, सचित्र होत आहेत, तरी वरील सूचनेप्रमाणें त्यांत सुधारणा होईपर्यंत तीं लोकप्रिय होणार नाहींत.

असो. प्राथमिक शिक्षण आईबापांनीं मुलांस देण्याची तजवीज केलीच पाहिजे. त्यास तेवढीही ऐपत व उमेद नसल्यास जर आईबाप त्याचा फायदा न घेतील व मुलास वेळचेवेळीं शाळेंत न घालतील तर त्यास शिक्षाकरण्याकरितां सरकारनें कायदा केला पाहिजे. अशानें काम करकरून दमले भागलेल्या माजिस्त्रेटांना बालापराध्यां (Guvenile offenders) ना आतांच्यासारखां शिक्षा करण्याचे वरचेवर प्रसंग येणार नाहींत; व बालसुधारकसंस्था (Refromabovice) आतांच्यासारख्या खचून भरणार नाहींत. एवढी प्राथमिक शिक्षणसंबंधीं नड दूर करण्याचा समय जवळ येऊन ठेपला आहे. मुंबईसारख्या मुख्य शहरीं नव्हे, तेथील मुख्य मुख्य भागांत अशी सुधारणा कालावधीवर न टाकतां अनुकूल लोकमत पाहून तात्काळ अमलांत आणण्याविषयीं आपले स्थानिक कायदे-कौन्सिलांतील लोकपक्षाकडील सभासद सरकारास सुचवीत आहेत. ही आनंदाची व हिताची गोष्ट मनांत वागवून मुलांच्या शिक्षणा-कडे आईबापांनीं दुर्लक्ष कारतां कामा नये. तें व्यक्तिमात्रास, समाजास, व सरकारास हितकर आहे हें आतां अगदीं उघड झालें आहे. सारांश, प्रपंचांत प्राथमिक शिक्षण अवश्य आहे, उच्च शिक्षण मिळाल्यास तेंहि हवें आहे; पण प्रपंचरहस्यांत, कॉबेट्-प्रमाणें ओकांनीं उद्योगधंद्यांचें शिक्षण आईबापांनीं सक्तीनें मुलांवर न लादतां त्यांचे खुषीवर ठेवावें असें दर्शविलें आहे. तथापि हें मत या लेखकास पसंत नाहीं. मुलांकरतां उद्योगधंदा निवडून काढणें, त्यांत त्यांना तरबेज करणें, तो चालविण्यास आरंभीं त्यांस आपला पैसा, सल्ला व वशीला यांची मदत देणें, त्यांत घस लागल्यास त्यांस धीर देऊन तसाच

तो पत्करण्यास नेण्यास लावणें हें आईबापांचें खरें कर्तव्य आहे. कारण शेंकडा नव्याण्णव मुलें एकासारखीं एक सांगितलेला धंदा उठविण्यासारखीं असतात; व शंभरावा मुलगाच स्वकपोलकल्पित उद्योग चालविणारा निघतो. प्रेमांध मातापितरांस आपली प्रजा ह्मणजे तशीं अलौकिक रत्नें वाटत असतील असें वाटतें. पण असें समजणें व त्यांना कैसाच्या ऐवजीं पिसें आहेत असें मानणें हें जवळ जवळ सारखेंच आहे. असें केवळ या लेखकासारख्या अल्पवयी व्यवहारानभिज्ञ व्यक्तीचेंच मत नाहीं, तर ज्यांनीं विद्येंत पारंगत अशी पदवी मिळविलेली होती व ज्यांना या घनघोर संसाराचा पूर्ण अनुभव आलेला होता अशा परमपूज्य पितृव्यांचेंहि मत असेंच होतें. × ' अभ्यासांत सरशी कशी मिळवावी ! ' (How to Excel study) या मान्य पुस्तकाच्या कर्त्यांचेंहि मत असेंच आहे. त्यानें प्रत्येक धंद्याच्या गुणावगुणाचें विवेचन क्रमवार करून, आईबापांस ह्या भानगडीचा विषय सुलभ करून देण्याचा यत्न केला आहे. त्याचा मतलब मराठींत दिल्यास आपल्या अनेक कुटुंबांस बावरल्यासारखें न होतां, आपलें कर्तव्यकर्म स्पष्ट कळून येईल.

(अ) धर्मोपदेशकाचा धंदा या धंद्यांत घृतकल्या मधुकल्या यांची वाण नसते. पण दामाजीची प्राप्ति बेताचीच असते. विद्वत्तेच्या–दशग्रंथी शब्दज्ञानाच्या–मानानें लोकांत बेताची मानमान्यताहि असते. पण स्वामी विवेकानंदांनीं उर्जित दशेस आणिलेल्या प्राच्यपाश्चात्त्य विद्याविभूषित निरपेक्ष संन्यासिवर्गाची दुर्मिळता असल्यामुळें सध्यांच्या धर्मजागृतीचे दिवसांत त्यांची अवश्यकता आहे, एवढेंच नव्हे, तर लोकशिक्षणद्वारा देशोद्धाराचीं अनेक कार्यें करण्यास ते पात्र असल्यामुळें, तर त्यांची अधिकच अवश्यकता आहे. आतां श्रीशंकराचार्यांचे शिष्य झोंप घेत आहेत काय असें कोणास सहज वाटेल. तर त्यावर असें उत्तर आहे कीं,

× या पुस्तकाचें पहिलेंच पान पहा.

त्यांचा तो जुना मार्ग अगदीं एककली आहे. त्यांस पाश्चात्य-ज्ञानाचा गंध नाहीं. सध्यां पाश्चात्त्य ज्ञानानें लोकसमाजास कोणतें वळण लागत आहे, त्यांत ग्राह्याग्राह्यांचा अंश देशकालवर्तमानानुसार किती आहे, देशोन्नतीस धर्मजागृति आजपर्यंत कशी कारणीभूत झाली आहे; तीसंबंधीं समाजाचें व व्यक्तीचें काय कर्तव्य आहे, या मुद्यावर विवेचन करणारे ह्मणजे देहलीदीपन्यायानें एक पंथ दो काज साधणारे धर्मोप-देशक हवेत. कळकळीनें, द्रव्यलोभ न धरितां भिक्षुकी केल्यास मूठभर 'खिचडी' करितां कोणी हात आखडीत नाहीं व हात आखडणाराही नाहीं. यावर असाही आक्षेप येण्यासारखा आहे कीं, हा धंदा चतुर्वर्णांत जे श्रेष्ठ ब्राह्मण, त्यांचा आहे. कारण ब्राह्मणांचीं जीं षट्कर्में वेदोक्त आहेत, त्यांत त्यांचा अंतर्भाव आहे. मनुस्मृतींत असें ह्मटलें आहे—

अध्यापनमध्ययनं यजनं याजनंतथा
दानं प्रतिग्रहश्चैव षट्कर्माण्यग्रजन्मनाम् ॥

अध्यायः १, श्लोकः ८८.

" अधीयीरंस्त्रयो वर्णाः स्वकर्मस्था द्विजातयः ।
प्रब्रूयाद् ब्राह्मणस्त्वेषां नेतराविति निश्चयः ॥
सर्वेषां ब्राह्मणो विद्याद्वृत्त्युपायान् यथाविधि
प्रब्रूयादितरेभ्यश्च स्वयंचैव तथा भवेत् ॥

मनुः (अ. १०)

पण हें स्मृतिवचन सध्यांच्या खडाजंगी जीवनार्थ कलहांत कोठल्या कोनाकोपऱ्यांत पडणार तें उघड दिसत आहे. प्राच्यपाश्चात्त्यज्ञानानें

'ब्रह्म जानातीति ब्राह्मणः'

'ब्रह्मविद् ब्राह्मणः स्मृतः' (शंकराचार्यकृत वज्रसूचि)

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः (गी. अ. ४ श्लो. १३)

इत्यादि वचनांची तुलना, वर्थ नॉट बर्थ शॉल रूल मॅनूकाइंड (मनुष्य जातीवर अंगच्या योग्यतेचा परिणाम होतो, जातीचा नाहीं) आंग्ल-कविवचनाशीं केली जाते.

पण या तत्त्वाला अनुसरूनच प्राचीन महर्षी ज्यांच्या अंगीं जो गुण-विशेष असेल, त्याप्रमाणें त्याला कोणत्या तरी वर्णाचें कर्म शिकवीत. (१) ज्यांच्यामध्यें शुद्ध सत्त्वगुण ह्मणजे शांति, इंद्रियनिग्रह, नेमस्तपणा, शुद्धता, सहनशीलता, सरलता, आत्मज्ञानसंपन्नता, पर-ब्रह्मज्ञानसंपन्नता आहेत त्यांनाच वेद शिकविण्याचा अधिकार देत; (२) ज्यांच्यामध्यें सत्त्वरजांचें मिश्रण असल्यामुळें, जे शूर, तेजस्वी, धैर्यवान्, दक्ष, दृढनिश्चयी, दानशौंड, सत्ताधारी असे स्वभावतः असतील, त्यांना धनुर्विद्या, प्रजापालनापुरतें वेदशास्त्र शिकवून त्यांत निपुण करीत; (३) ज्यांमध्यें रजस्तमांचें मिश्रण असल्यामुळें जे कलाकौशल्य, द्रव्यार्जन, व्यापार, उद्योगधंदे यांत चूर असत, त्यांस चौसष्ट कला शिकवून तयार करीत; (४) ज्यामध्यें तम (अज्ञानरूपी अंधकार पूर्ण भरलेला असल्यामुळें ज्यांची बुद्धि मंद, त्यांस उपजीविकेकरतां सेवाधर्म सांगत. +

यांचीं उदाहरणें प्रकृत स्थलीं दिल्यानें, हा विषय ग्रहण करण्यास सुलभ पडेल; ह्मणून आपण आतां तसें करूं. पाराशर चांडाली-पासून झाला होता; तरी तो ब्राह्मणपद पावला. भारद्वाजमुनि शूद्री-पासून जन्मले होते; तरी ते ब्राह्मण झाले. वशिष्ठऋषींची उत्पत्ति उर्वशीच्या गर्भापासून आहे; विश्वमित्राचा जन्म क्षत्रियकुळांतला आहे; तरी आपल्या गुणांनीं व कर्मांनीं ते ब्राह्मण बनले.

विक्रम भोजादि संस्कृतनिष्णात नृपवरांच्या अमदानींतहि असेंच गुणकर्मप्राधान्य गाजत होतें. भोजप्रबंधांत, भोजराजाचे तोंडून असा श्लोक निघालेला आहे.

§ कुंभकारोऽपि यो विद्वान् स तिष्ठतु पुरो मम ।
द्विजोऽपि यो भवेन्मूर्खः स पुराद्बहिरस्तु मे ॥

\+ भगवद्गीता. अ० १८ वा पहा.

§ " कुंभार देखील जर विद्वान् असेल, तर तो माझ्यापुढें उभा राहू द्या. ब्राह्मण देखील जर ढ असेल तो माझ्या शहराबाहेर जाऊं द्या. "

अगदीं अलीकडे सुप्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांनीं श्रीमंत माधवराव पेशवे यांस स्नानसंध्यानिमग्न पाहून त्यांचे क्षत्रियत्वास हें शोभत नाहीं अशा अर्थाचे उद्गार काढल्याचें इतिहासज्ञांस अवगत आहेच. तसेंच महाराष्ट्रांतील संतमालिकेंत ब्राह्मणेतर वर्णांतले साधु व धर्मोपदेशक यांची गणना आहे हें पाहिलें ह्मणजे तसा जातिभेदाचा वृथा किंतु मनांत येणार नाहीं. तुकोबा वाणी, नामदेव शिंपी, जनाबाई त्याची दासी, गोऱ्हा कुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी, चोखा महार, शेखमहंमद, शेख सुलतान अशी नामावली ऐकून कोणाचे मनांत अद्यापि पूज्यभाव उत्पन्न होत नाहीं? 'ग्यानबा तुकाराम' हा पंढरीच्या वारकऱ्यांचा जयघोष कथाकीर्तनांतून प्रेमळ व उदार मनानें होणारा सदरहू साधुसंतांचा उल्लेख अझूनही आपल्या सर्व लहानथोर, गरीब श्रीमंत मंडळीस हलवून सोडीत नाहीं काय; सध्यांदेखील प्रत्येक जातीचे गुरु व हरिदास त्या त्या जातीस पूज्य असून ब्राह्मणही वर्णगुरु आहेत. अशी निराळी जातिविशिष्ट गुरूंची संस्था काढण्याचा उद्देश असा कळतो कीं, त्या त्या जातीच्या समाजाप्रमाणें व अधिकाराप्रमाणें त्यांस धर्मज्ञान करून द्यावें; गहन वेदांतांत त्याचा प्रवेश होण्यासारखा नसल्यामुळें त्यांस तो रुचत नाहीं व तो चालू असतां साधारण श्रोतृसमाजास डुलक्या येतात व डोळे उघडे असल्यासहि अधिकार नसल्यामुळें 'नळी फुंकली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें' असा प्रकार होतो. पण त्यांत वागलेल्या त्याच्या जातिबंधूनें पुढाकार घेतल्यास वरील साधुसंताप्रमाणें प्रपंच परमार्थ बहुजनसमाजास सुलभ करून देतां येतो, असा वृद्ध मनुष्यांचा अभिप्राय आहे. तेव्हां धर्मोपदेशकांचा धंदा उत्तम आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

(आ) 'शिष्टाई' किंवा वकिली. हा धंदा दिसायला फार पैदाशीचा आहे. पण तो साधारण व्यक्तीस फलद्रूप होणारा नाहीं. कारण, त्यांत लटपट, चटपट, खटपट व धडपड हीं पदोंपदीं लागतात. वकिलाचे जिव्हाग्रीं सरस्वती बसली पाहिजे ती वेगळीच. ही कथा

कांहीं आजची नाहीं, ती फार प्राचीन काळापासून लोकांस माहीत आहे. एकनाथस्वामींनीं ' अंगदशिष्टाई ' त शिष्टाचें लक्षण असें सविस्तर दिलें आहे:—

" शिष्ट नसावा महा भ्याड । शिष्टें न धरावी भीड । शिष्ट बोलला सुंघड । निवाड प्रौढ निजबुद्धी ॥ ११ ॥ शिष्ट पाहिजे चपळ चतुर । देऊं जाणें प्रत्युत्तर । राहोनिया धुरेसेमोर । स्वामिकार्यसाधक ॥ १२ ॥

महाराष्ट्रकविशिरोमणि मोरोपंत यांनीं ' कृष्णशिष्टाई ' त शिष्टाचें महत्त्व धर्मराज व श्रीकृष्ण यामध्यें झालेल्या संवादांत ध्वनित केलें आहे. धर्मराज ह्मणतात दुर्योधनासारख्या बलवान् मनुष्याजवळून आपला दाय आपणास मिळण्याची आशा नाहीं. त्यावर

' शौरि ह्मणे राजेंद्रा, यद्यपि बलवान् तथापि शुनकानें ।
हरिचें काय करावें ? परिसा तो हितकथा पिशुनें कानें ॥
जिंकील काय हरा जो जिंकी कुतुकेंचि मन्मथ नरा जा ।
करिल हरिमथन शश, तरि करिल सुयोधनहि मन्मथन राजा ॥
योजीन युक्ति सामीं सांदीपनिच्या तुझ्या बहु नव्या ही ।
प्राणापरिस बहु मज जेविं तुह्मीं तेविं तो बहु न व्याही ॥ '

असें जरी आहे, तरी ज्या कायदेपंडितास न्यायासन मंडित करण्याची संधि असेल, त्यानें कायद्याचा अभ्यास करूं नये असें बिलकुल ह्मणतां येत नाहीं. किंवा ज्यास ' बैठा वकील ' (चेंबर बॅरिस्टर, सॉलिसिटर, अटर्नी) व्हावयाचें असेल, त्यानें खुशाल ' वकिली ' पतकरावी. पण आपल्याकडे वकिलाची गर्दी फार झालेली आहे, तेव्हां तशीच लायकी किंवा लग्गा असल्याशिवाय त्यांत शिरणें ठीक नाहीं.

(इ) शिपाइगिरी. जवान मर्दास हा पेषा तात्काळ मनांत भरण्यासारखा आहे. यास तयारी बेताबाताचीच लागते. यांत अभ्यासानें हाडाचीं काडें व रक्ताचें पाणी करावें लागत नाहीं. उलट, शरीरसंपत्ति व्यायामानें जितकी संपादतां येईल, तितकी यांत हवी असते.

---

१ चतुर. २ अग्रभागीं. ३ दुष्ट दुर्योधन

पण या धंद्यांतदेखील स्वाऱ्या, छापे, धामधुमी असतात तेव्हांच मौज असते. नुसत्या कवाइती करीत बराकींत काळ काढण्यांत कांहीं हंशील नाहीं. शिवाय शिपाईगड्यास गृहसुख मिळणार, तें अगदीं जुजबीच होय. पण इतकेंहि करून जो

क्षात्रो धर्म इवाश्रित:

असा असेल, त्यास या धंद्यासारखा थोर धंदा दुसरा कोणताच नाहीं. कारण याच धंद्यामुळें अशक्तांचें सशक्तापासून रक्षण करतां येतें. व ‘क्षत्रिय’ शब्दाची व्युत्पत्तिहि अशी आहे

क्षतात्किल त्रायत इत्युदग्र:
क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढ: । रघु० स० २.

याशिवाय इतर क्षत्रियकर्मेंहि आहेत. तीं संगतवार मनुस्मृतींत अशीं दिलीं आहेत: —

प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ।
विषयेष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासत: ॥
—अ० १, श्लो० ८९.

प्रजेचें रक्षण करणें, दान करणें, यज्ञ करणें, अध्ययन करणें, गीत, नृत्य, स्त्रीसंभोग, इत्यादि विषयांचे ठायीं आसक्ति नसणें हीं कर्मे क्षत्रियासाठीं स्थापिलेलीं आहेत.

ब्राह्मणांचें वेदाध्ययन जसें नष्टप्राय होत आहे, तशी क्षत्रियांची तरवार गंजत आहे. तेव्हां हिंदी राष्ट्रीय सभेच्या मागण्यांपैकीं ही एक मुख्य मागणी सरकारानें रयतेस शेतीरक्षणार्थ (पण आत्मरक्षणार्थ नव्हे) शस्त्रांची जी बहुतेक बंदी केली आहे, ती दूर केली असतां, रयत स्वयंसेवक (वॉलंटीअर) तरी बनून प्रसंगविशेषीं देशहितार्थ लढण्यास व स्वत:च्या जीवजीविताचें रक्षण करण्यास तयार राहील. या बाजवी मागणींतील आशय लक्ष्यांत आणून, सध्याचे राजकारणपटु व्हाइसराय लॉर्डकर्झन यांनीं बादशहाकडून ‘हिंदी क्षात्रमंडळ’ (इंडिअन् कॅडेट कोर)

तयार करविण्याची योजना केलेली आहे. पण एवढ्यानें राजपुत्रांची सोय होणार आहे. साधारण सुशिक्षितांस शिपाईगिरी करण्याचा मार्ग अद्यापि खुला झालेला नाहीं. सध्यां पोलिस—कमिशन चालू आहे. त्यापुढें कित्येक लोकाग्रणींनीं अशिक्षित लोक पोलिसखात्यांतील हुद्याचे जागीं नेमिल्यास लोकरक्षणाऐवजीं लोकछल कसा होतो, वेळ मारून नेण्याकरतां चोर सुटून संन्यासी कसा सुळीं जातो इत्यादि तक्रारी आणल्या आहेत. व अलीकडे भरलेल्या वरिष्ठ कायदेकौन्सिलांत श्रीक्षेत्र अयोध्यावासी नामदार बाबू श्रीराम एम्. ए. एल्एल्. बी. यानीं लॉर्डकर्झन साहेबांजवळ हेंच मागणें मागितलें आहे कीं, त्यांनीं आपली कारकीर्द चिरस्मरणीय करण्याकरतां पोलिस खात्यांतील मुख्य मुख्य जागांवर सुशिक्षित पदवीधरांची योजना करून लोकांचे नेहमींचे हाल चुकवावेत. तेव्हां लष्कर व पोलिस हीं खातीं शिकलेल्या लोकांस मानमान्यता मिळवून देतां येण्यासारखीं ज्या एतद्देशीय संस्थानांत आहेत, तेथें तर रेशिमवाले, जिनसीवाले, आपटे, आंग्रे, सुरवे, आवड, गरूड, गायकवाड, शिंदे, होळकर इत्यादि मंडळी शिपाईगिरी करीत आहेत; व इंग्रजी राज्यांत तसा सुदिन आल्यास, हिंमतबहादर नंगी समशेर लटकविल्याशिवाय राहणार नाहींत हें सांगण्याची गरज नाहीं.

(ई) नौकानयन. हा धंदा याहूनहि खडतर आहे. समुद्राची खारी हवा न जुमानण्याची धमक ज्याचे अंगीं असेल, त्यानें हा धंदा खुशाल पतकरावा. प्राचीनकालीं बंगाली लोक (वंग) हे ‘ नौसाधनोद्यत ’ असत असें कालिदासानें लिहिलेले रघुवंशाचे वाचकास अवगत आहेच.* ‘ बंगाली ’ पत्रकार याचीच आठवण आपल्या देशबंधूना देऊन, साहसी बनविण्याकरितां उपदेश करीत आहेत. मराठे पंजाबी पुरभय्ये यांनीं तलवार गाजवून नांवलौकिक मिळविला आहे. तेव्हां या विजयवर्णनाचे स्मरणानें त्यांच्यांत वीरश्रीचा संचार होण्याचा जसा संभव आहे, तसा

* ‘ बंगाली लोकांचा भविष्यकाळ (The future of the Bengalee) हा लेख वाचनीय आहे. १५ मे १९०३ चा ‘ बंगाली ’ चा अंक पहा ’

बंगाली लोकांस आपल्या नौकानयनपटु पूर्वजांची कीर्ति आठवून साहस-धर्म संपादतां येणार आहे. कारण प्रसिद्ध इतिहासकार मेकॉले यांनीं जें एक प्रमुख इतिहास–तत्त्व प्रतिपादन केलें आहे, तें हें कीं, ज्या राष्ट्रास इतिहास आहे, तेंच उर्जितदशेस येण्याम पात्र आहे. असो. हें विषयांतर करण्याचा मतलब इतकाच कीं, नौकानयन हा अपरिचित व्यवसाय नव्हे. ज्याचा कल तिकडे असेल, त्यानें तो करावा.

(उ) वैद्यकी किंवा डॉक्टरी. वकीलीचे खालोखाल चालणारा हा धंदा आहे. पण निकृष्ट वकिलास जितकी प्राप्ति असते, तीहूनहि तितक्याच दर्जाच्या डॉक्टरास किंवा वैद्यास नसते. ' आर्तः पुत्रवत् पाल्यः ' हा भिषग्वर्गास उपदेश प्राचीनकालापासून दिलेला आहे. तोहि यथातथ्य आहे. कारण या धंद्याविषयीं अशी लोकसमजूत आहे कीं, औषधाचा गुण आल्यास रोगी बरा होतो, व वैद्यास दिलेल्या दक्षिणेचें चीज होतें; नाहींतर, रोग्याचा जीव व पैसा बरोबरच जातो. यावरून, वैद्यांचा असा विनोद संस्कृतांत केलेला आढळतो––

वैद्यराज, नमस्तुभ्यं यमराजसहोदर ।
यमस्तु हरति प्राणान् वैद्यः प्राणान् धनानि च ॥

प्राच्यपाश्चात्त्य वैद्यकांची तुलना करण्याचें हें स्थल नाहीं व तसें सामर्थ्यहि या लेखकाचे अंगीं नाहीं. तरी कालमानाकडे लक्ष देऊन दोहोंत जें ग्राह्य असेल, तें प्रत्येक महत्त्वाकांक्षी डॉक्टरानें किंवा वैद्यानें शिकलें पाहिजे; असें नामदार घोले, भिषग्विलासकर्ते डॉक्टर रानडे, डॉ. सखाराम अर्जुन, डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे; डॉ. अण्णासाहेब देशमूख, नामदार सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर इ. यांच्या परिपाठावरून कळून येतें. व याच परिपाठानुसार मुंबईत आयुर्वेदिक पाठशाळा निघाली आहे व लोकप्रियहि होत आहे. आर्यवैद्यकांतील नाडीपरीक्षा, रोगनिदान, औषधोपचार हे वरील डॉक्टरांस मान्य आहेत. व पाश्चात्त्य वैद्यकांतील शारीर, इंद्रियविज्ञानशास्त्र व शस्त्रशास्त्र हीं बापूसाहेब मेहंदळे यासारख्या भिषग्वर्यांस मान्य आहेत.

(ऊ) शिक्षकाचा धंदा किंवा मास्तरकी. 'गुरुः साक्षात् परब्रह्म' अशी उदात्त कल्पना 'गुरु' या शब्दावरून होत असे. प्राकृत जनांत, 'तात्या पंतोजी' ह्मणजे गोल्डस्मिथ कवीनें वर्णन केलेला गांवठी मास्तर मानला जात असे. त्यांच्या चतुरस्र विद्वत्तेबद्दल गांवकऱ्यांत पूज्यबुद्धि वसत असे. पण अलीकडील तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या गांवठी मास्तराची स्थिति फार कष्टद आहे. ह्मणून सरकारांनीं त्यास पोस्ट ऑफिसचें हलकें सलकें काम देऊन ती सुधारण्याचा यत्न केला आहे. सरकारी शाळांचा प्रसार गांवोंगांव झाल्यामुळें, खासगी देशी भाषेच्या शाळा बहुतेक नाहींशा झाल्या आहेत. असल्याच तर त्या पुणें मुंबई-सारख्या शहरांतून दृष्टीस पडतात. या शाळांसच जोडून इंग्रजी भाषा शिकविण्याच्या शाखा कोठें कोठें काढलेल्या आढळतात, व कांहीं कांहीं तर इंग्रजी शिक्षणार्थ आहेत. या सर्वांस सरकारचा आश्रय आहे. अशा शाळांत प्रमुख ह्मणजे फर्गसन कॉलेज पुणें, न्यूइंग्लिशस्कूल पुणें, नेटिव्ह इन्स्टिटयूशन पुणें, नूतन मराठी विद्यालय, मुंबई फोर्ट हायस्कूल, शेट गोकुळदास तेजपाल हायस्कूल, मुंबई मराठा हायस्कूल, मुंबई आर्यन एज्युकेशन सोसायटीज हायस्कूल, युनियन हायस्कूल, अंजुमान हायस्कूल, बेनी-इस्त्रायल हायस्कूल इ. याशिवाय ख्रिस्तीधर्मीयांनीं चालविलेल्या शाळा व पाठशाळा आहेत. एतद्देशीय खासगी शाळांस व पाठशाळांस या मिशनच्या संस्थांप्रमाणें जंगी निधि (फंड) हातांशीं नसल्यामुळें, होईल त्या उत्पन्नांतून शिक्षकांचें वेतन द्यावें लागतें. व तें अत्यंत कमी असतें. यामुळें या शाळांच्या मुख्य शिक्षकांस वारंवार असें ह्मणण्याचा प्रसंग येतो कीं, आमची शाळा ह्मणजे एक भिकारीलोकांची शाळा होय असा प्रकार सरकारी संस्थानिक व मिशन संस्थांत नाहीं हें उघड आहे. तेव्हां आईबापांना आपल्या होतकरू मुलांस या शिक्षकाचे धंद्यांत शिरण्यास सांगतांना सहज जिवावर येतें. पण मुलांचे शिक्षणार्थ पाण्यासारखा खर्च केलेला—बहुशः कर्जबाजारी

होऊनहि खर्च केलेला पैसा आतां मुळींच उभा राहत नाहीं असें पाहून मोठ्या खेदानें त्यांस त्याला रुकार द्यावा लागतो. व

'आलिया भोगासि असावें सादर!'

हें तत्त्व मनांत वागवून, आईबापांस आपल्या होतकरू मुलाचे पाठीवरून हात फिरवून असें सांगावें लागतें कीं, तुझा धंदा सर्वश्रेष्ठ आहे. तुझ्या हातून किती तरी कोंवळ्या मनांचा विकास होऊन त्यांस जगाचा मार्ग दाखवावयाचा आहे याचा तूं विचार कर. तूं आपलें बुद्धिकौशल्य यांत खर्च करून त्यांचे धन्यवाद मिळव. तूं आपली विद्या त्यांस देऊन, ती दुप्पट वाढव. शिक्षणशास्त्र ज्या शार्मण्य देशांत निर्माण झालेलें आहे, तेथील हर्बार्ट, पेस्टलोझि, फ्रोबेल, जॉर्ज कोंब या शिक्षकवर्यांप्रमाणें कष्ट सोसून आपलें शास्त्र सुलभ कर. वर्डस्वर्थ, छत्रे, रानडे, भांडारकर, कुंटे, शास्त्रीबोवा, टिळक, काथवटे, जिनशीवाले, मोडक, आपटे, आगरकर, आगाशे, परांजपे, महाजनि, राजवाडे, भानु, सरदेसाई, भावे, ओक, जोशी या येथील शिक्षकमूर्ति मनांत वागवून, त्यांच्यासारखा लौकिक वाणी, लेखणी व करणी यांचे जोरावर संपादन कर. ह्मणजे तूं आपलें कर्तव्य केलेंस असें आह्मी येथें व स्वर्गांत समजून आनंद मानूं!

(ऋ) लेखनव्यवसाय. याला जरी धंदा असें क्वचित्‌च ह्मणतां येईल. तरी तो एक धंदा आहे. पूर्वी हा यूरोपखंडांत धर्मोपदेशकांचा असे; तसा आशियाखंडांत मुल्ला व ब्राह्मण यांचा असे. पण आतां जो उठेल, तो लेखक व ग्रंथकार बनूं शकतो. तरीच लेखनव्यवसायास धंदा असें क्वचित्‌च ह्मणतां येईल असें जें वर ह्मटलें आहे, त्याचा अर्थ उघड आहे. या धंद्याची मिळकत इतकी तुटपुंजी असते कीं त्यावर त्या धंदेवाल्याचें पोट चालणें मुष्किल आहे ही स्थिति शंभर वर्षांमागें युरोपांत $

$ "There can be nothing more just than the old observation, that *authors*, like running horses, *should be fed but* not fattened, if we would continue them in our service, we should reward them with a little money and a great deal of

होती. पण इकडे पहिल्यापासून ती आहे तशीच आहे. व आमचे ऋषी व साधुसंत हे तर विद्या न विकण्याचा हिय्या करीत असत; व केवळ भिक्षुवृत्तीनें रहात असत. पण सध्यांच्या बड्या भौतिकशास्त्रापुढें व कर्दनकाळ जीवनकलहामागें आपल्या संसारी ग्रंथकारांची मोठी दैना उडालेली आहे. 'केसरी' त्यांस लोकाश्रय व राजाश्रय हा भ्रम समजून निरपेक्ष बुद्धीनें 'लोखंडाचे चणे' चावावयास सांगतो. 'निबंधमाला' त्यांस 'जॉन्सन' कडे पहाण्यास सांगते. 'मालिका' त्यांस 'स्कॉट' कडे पहाण्यास सांगते. 'ग्रंथमाला' त्यांस 'कार्लाइल' कडे पहाण्यास सांगते. सारांश, 'पदरचें मोडून, शेटची चाकरी करावी' किंबहुना आंत-

---

[मागील पृष्ठावरून]

praise; still keeping their avarice subservient to their ambition. Not that I think a writer incapable of filling employment with dignity; I would only insinuate that when made a bishop or statesman, he would continue to please us as a writer no longer; as to resume a former allusion, running horse when fattened, will still be fit for very useful purposes, though unqualified for a courser."—Goldsmith Enquiries into the present state of Polite Learning.

When the link between patronage was entire, then all who deserved fame, were in a capacity of attaining it. When the great Somer was at the helm, patronage was fashionable among our nobility. The middle rank of mankind who generally immitate the great, then followed their example applauded from feeling...Wit, when neglected by the great, is generally despised by the vulgar...He is called an author and all know that an author is a thing only to be laughed at. At his approach, the most fat unthinking face brightens into malicious meaning. Even aldermen laugh and revenge on him the redicule which was lavished on their forefathers."

—*Ibid*—

बऱ्याच्या व्यवहाराचा मासला पहावा असा तूर्त हा धंदा आहे. सुमारें सहा वर्षांपूर्वी या लेखकाचे पूज्य पितृव्यांनीं व त्यांचे परमस्नेह्यांनीं त्यास विचारलें कीं, तूं कोणता धंदा करणार? त्यावर त्यानें झटक्यासारखें अंतःकरणांतुन जळफळत निघणारें उत्तर दिलें कीं 'मी लेखनव्यवसाय पत्करणार!'. तेव्हां त्या दोघां ज्ञानवृद्ध अनुभवी गृहस्थांनीं एकच गोष्ट सांगितली कीं, त्या धंद्यांवर विलायतेसारख्या गुणज्ञ व उदार देशांत लेखकांस पोट भरतां येईल, पण आपल्या कंगाल देशांत त्या धंद्यांत कांहीं राम नाहीं. कारण आपल्याकडे त्याविषयीं सर्वत्र अज्ञान व औदासिन्य दिसत आहे. ही स्थिति एका संस्कृत कवीनें अगदीं हुबेहूब वर्णिली आहे. तो ह्मणतो——

> सन्तःक्वापि न सन्ति सन्ति यदि वा दुःखेन जीवन्ति ते!
> विद्वांसोपि न सन्ति सन्ति यदि वा मात्सर्ययुक्ताश्च ते!
> राजानोपि न सन्ति सन्ति यदि वा तृष्णाधनग्राहिणा!
> दातारोपि न सन्ति सन्ति यदि वा सेवानुकूलाः कलौ!

कलियुगांत सज्जन कोठेंहि नाहींत, असलेच तर ते कष्टानें रहात आहेत; विद्वान् कोठेंहि नाहींत, असलेच तर ते मत्सरी आहेत; राजे कोठेंहि नाहींत, असलेच तर ते लोभी आहेत; दाते कोठेंहि नाहींत, असलेच तर ते लांगूलचालकांस वश आहेत. नांव घेण्यास व बोट दाखविण्यास दक्षिणाप्राइझ कमिटी, ग्रंथसंपादक मंडळी, दाभोळकर प्रकाशक, निर्णयसागरचे शेट 'ग्रंथमाला' कार इत्यादि सद्गृहस्थांचा उद्देश लेखनव्यवसायास उर्जित दशेस आणण्याचा आहे. श्रीछत्रपति करवीर सरकार व श्रीमंत सयाजीराव महाराजांसारखे विक्रमभोज तुरळक प्रकाशत आहेत. तरीदेखील हरिदासाचे मूळपदाप्रमाणें या लेखकांचा असाच अनुभव आहे कीं, ग्रंथकारांस लेखनव्यवसायानें चरितार्थ चालवितां येईल असें समजणें हा निव्वळ भ्रम आहे. सर वाल्टर स्कॉट ह्मणत असे त्याप्रमाणें इतर व्यवसायास हा व्यवसाय ह्मणजे कुबडी होय, एक टेंकू होय इतकेंच. व या लेखकानें आज पांचसहा वर्षांत जे अल्पस्वल्प लेखनसाहस केलेलें आहे, त्यांत त्यास असाच अनुभव आला आहे.

(ऋ) वाणिज्य. सध्यां परतंत्रतेचा प्रभाव आपणावर इतका पूर्ण गाजत आहे कीं, सेवाधर्म व वरील अनुत्पादक धंदे यांचा बडेजाव आपणांत फार आहे, पण आजकाल तागडीचें निशाण सर्व जगभर फडकत आहे. तिकडे आपण दुर्लक्ष केल्यास आपला अधःपात होण्यास दिरंगाई लागणार नाहीं. सबब आईबापांनीं असा आणीबाणीचा प्रसंग लक्ष्यांत आणून, अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, जपान हीं राष्ट्रें आपली उन्नति ज्या व्यापाराचे जोरावर करूं पाहत आहेत, त्याचें शिक्षण आपले मुलांस देण्याची प्रत्येकानें होईल तितकी खटपट करावी.* आतां मद्रासेंत व्यापारीशिक्षणाची सोय झाली आहे. मुंबईत मि० आयर यांची व्यापारीशिक्षणशाला चालू आहे. बंगाल व पंजाब या प्रांतींहि हळहळू तशी सोय होत आहे. पारशी, गुर्जर, मारवाडी, लिंगाईत हे वैश्यवृत्ति तर खरे. पण यांनीं देखील पाश्चात्त्य व्यापारी शिक्षण

---

* गेल्या वर्षीं उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करीत असतांना, या लेखकास रा. दत्तात्रय चिंतामणी काळे या नांवाचे दत्तभक्त तरुण कवि भेटले होते. आगगाडींत आजकालच्या स्थितीविषयीं बोलतां बोलतां असें कळलें कीं, सदरहू गृहस्थांच्या वडिलांनीं रेल्वे कंपनींत चाकरी जन्मभर करून कंटाळा आल्यावर ती सोडिली; व हल्लीं ते वर्ध्यास कापडाचें दुकान चालवीत आहेत. आज आठ वर्षें उत्तम चाललें आहे. त्यांतच, त्यांनीं इंग्रजी सहाव्या सातवे इयत्तेपर्यंत शिकलेल्या सदरहू सत्पुत्रास अनुभवसिद्ध व्यापारीशिक्षण देऊन तरबेज केलें आहे. व त्यास त्यांत प्राप्ति बरी होत असल्यामुळें, चाकरीकडे ढुंकून पहावेंसें वाटत नाहीं. व्यापारानिमित्त ठिकठिकाणीं प्रवास करावयास सांपडतो; त्यामुळें अंगीं धैर्य, व्यवहारज्ञान, प्रसंगावधान व तरतरी येते ती वेगळीच. इंदुरास असेच एक तरुण गृहस्थ कॉलेजच्या अभ्यासास कंटाळून व्यापारांत शिरलेले आहेत. त्यांचा अनुभव सदरहू काळे यांच्याप्रमाणेंच आहे. मुंबईस तारमास्तरांच्या संपांतले एक गृहस्थ व्यापारांत शिरून आपला चरितार्थ निर्विघ्नपणें चालवीत आहेत. व निर्विघ्नकर्त्या गणेशाचे नांवानें आपली ' गणेश मंडळी ' सुरळित, दुमदार रीतीनें नांवारूपास आणीत आहेत. रा. मावळणकर बी. ए. यांची तर दुकानदारींत ठाकठिक व बरकत पत्रकर्त्यांचे तोंडून चांगली चांगली ह्मणून निघत आहे. पुण्यास स्वदेशी कोआपरेटिव्ह कंपनीचें दुकान चांगलें चालेल अशाबद्दल केसरीकारास उमेद आहे.

मिळविल्यास त्यांस सध्यां होत आहे त्याहून अधिक फायदा होण्यासारखा आहे असा सर दिनशा माणिकजी पेटिट, शेट कर्सनदास मूळजी, मिस्टर भारभाई यांसारख्या थोर थोर गृहस्थांचा अभिप्राय आहे. पण महाराष्ट्रीयांस हा पेषा अगदीं नवखा आहे. तरी मार्गे आलेल्या तुटक गृहस्थांचे उद्योग व पूना मर्कंटाइल बँक, बॉंबे बँकिंग कॉर्पोरेशन, कोल्हापूर आणि सदर्न मराठा बँक, स्वदेशी--कोआपरेटिव्ह शॉप कंपनी, या व्यापारी संस्था निरपेक्षबुद्धि चालकांनीं सध्यांप्रमाणेंच उमेदीनें चालू ठेवल्यास नवीन पिढीस व्यापारी शिक्षणाचें सार्थक करून घेण्यास त्या उत्तम मार्गदर्शिका होतील, नव्हे, रास्कोनें जसें लिव्हरपुलासारखें उद्योगधंद्याचे गडबडीचे शहरांत विद्या व व्यापार यांचें अजब जूग जुळवून आणिलें आहे. जसें व्यापारी अमदाबादेनें ' व्हर्न्याक्युलर ट्रँस्लेशन सोसायटी ' द्वारें लेखनव्यवसायास हातभार दिलेला आहे, तसा विद्याव्यासंगी एककल्ली महाराष्ट्रांत लेखनवाणिज्य यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होईल. सोलापूर येथील व्यापारी शाळेचे मुख्य शिक्षक रा० रा० त्र्यंबक भास्कर खरे यांच्या उपदेशासारखे कळकळीचे उपदेश मधून मधून आपणा महाराष्ट्रीयांचे कानावर येत राहिल्यास, आपले हातून इष्ट कार्य होण्यास विलंब लागणार नाहीं.

असो. व्यापारी शिक्षणांत कोणत्या विषयांचा समावेश होतो हें सुजाण आईबापांस कळावें ह्मणून संक्षिप्त यादी येथें दिली आहे—(१) अक्षर–मोडी, इंग्रजी अक्षरावांचून सर्व व्यर्थ आहे. मोडी तर आपली लघुलेखनपद्धतिच होय.

(२) जमाखर्च

(३) तोंडचे हिशेब

(४) व्यापारी पत्रव्यवहार यांत स्टांप, रजिस्ट्रेशन, प्रॉमिसरी नोटी, हुंड्या, करार गहाण, इत्यादि कायद्यांचेंहि अंग हवें. तसेंच बारनिशी यांचा समावेश होतो.

(५) व्यापारी भूगोल. खरेदी करावयाचा माल कोठें होतो, तेथून तो आणण्याचीं साधनें, प्रमुख स्थलांच्या नकाशासंबंधीं माहिती.

(६) सराफी. याविषयीं एका पटाइत सावकारमित्राचा अनुभव असा आहे. तो ह्मणतो कीं, आपल्या लोकांस जुनी सावकारी जशी अंगीं खिळून गेल्यामुळें पटते; तशी नवी कडक इंग्रजी सावकारी पटत नाहीं. उदाहरणार्थ कोणी उसनी दिलेली रक्कम मुदती-अगोदर आणून दिली तरी ती जुने सावकार घेतात, तसे नवे घेत नाहींत. त्यामुळें लोकांस त्या कायदेबाजांचा कडकपणा सहन न होऊन ते जुन्या रहमदिल सावकाराकडे धांव घेत असतात.

(७) अर्थशास्त्र. यासंबंधीं एक हितोपदेश असा थोडक्यांत आहे.

यः काकिनीमप्यपथप्रपन्नां । समुद्धरेन्निष्कसहस्रतुल्याम् ॥

(८) तारवाचा विमा–नोर–इ० चें ज्ञान.

(९) व्यापारी इतिहास.

कालेषु कोटिष्वपि मुक्तहस्तं । तं राजसिंहं न जहाति लक्ष्मीः ॥

" जो हजारनिष्कसमान काळजीनें एक कवडीहि वायफळ जाऊं देत नाहीं, व प्रसंगविशेषीं जो सढळ हातानें कोट्यवधि खर्च करतो, त्या राजश्रेष्ठास लक्ष्मी सोडीत नाहीं. "

हा विषय जरी मोठा आहे, तरी आईबापांस हिंदुस्थानच्या व्यापारीय इतिहासाची महती अवगत असली पाहिजे. ह्मणजे व्यापारी शिक्षणाची आवश्यकता कशी आहे, हें त्यांस आपले होतकरू मुलांचे मनावर चांगलें ठसवितां येईल.

+ भरतखंड हें तिन्ही बाजूंनीं समुद्रवलयांकित असल्यामुळें, दर्यांत प्रवास करून व्यापारवृद्धि करण्याचें साहस त्यांस कालांतरानें पुष्कळच आलें. मलबारचा साग, सह्याद्रीचें लोखंड, गुजराथचा कापूस, बंगाल-कडील गोणपाट व तांदूळ, कलिकतचें चीट, हा माल आपल्या भरत-खंडांतील गलबतांस लागेल तितका पुरातन काळापासून आहे व विशेष

+ ' भारतीय साम्राज्य, ' पु० ६, भा० ३७--३८ पहा.

खटपट न पडतां होतो. तसेंच विराटराजाचा सासरा ' गाई दानव ' यानें 'मच्छयंत्र' नामक होक्याची युक्ति प्रथम हिंदुस्थानांत काढल्याचें काश्यप-संहितेंत सांगितलें आहे. या यंत्रांत माशाच्या आकाराचा एक लोहचुंबकाचा कांटा पाण्यानें किंवा तेलानें भरलेल्या भांड्यांत तरता ठेविलेला असे; व त्याच्या अंगच्या चुंबकशक्तीनें त्याचें टोक सदोदित उत्तरादिशेकडे असे. याचा उपयोग घराचा पाया, यज्ञांतील वेदिका, कुंड व समुद्रावरील गलबत यांच्या दिशा ठरविण्याकडे असे. हें काम जोशी करीत. असो. आर्य लोकांनीं आशिया, युरोप आणि आफ्रिका अशीं तीन खंडेंच आपल्या व्यापारी दळणवळणानें पालथीं घातलीं असें नाहीं, तर त्यांनीं अगदीं पश्चिमेकडील जें पाताल किंवा अमेरिका तेथेंहि शिरकाव केल्याचें व्युत्पत्तिशास्त्रावरून हळूहळू कळून येत आहे. तिकडील भाषांत संस्कृत शब्द पुष्कळ आढळतात. रेड इंडियनलोकांच्या संस्था आपल्या ग्रामसंस्थेशीं अगदीं जुळतात. यावरून अमेरिकेचा प्रथम शोधक कोलंबस नसून आर्य लोकच आहेत असें आतां ठरूं पाहत आहे.

पण ' अत्यारूढिर्भवति महतामप्यपभ्रंशनिष्ठा ' या न्यायानें तार्तरींतील मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊन जिकडे तिकडे सवाई सोटेशाई माजून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिनासा झाला, व पूर्वींची परीट-घडी जी एकदा मोडली ती मोडली! आतां ती नीट चापून चोपून बसविण्याचा प्रयत्न $ शेट कर्झनदास मूळजी, सर जमशेटजी जीजीभाई, मिस्टर टाटा, इत्यादि थोर मंडळी करीत आहे, तेव्हां तो अगदीं फुकट जाणार नाहीं.

(१०) स्वभाषेशिवाय हिंदी व युरोपांतील २ भाषांचें ज्ञान

(११) स्वसंरक्षणापुरती शस्त्रास्त्रविद्या.

(१२) व्यापारी नीति

या नीतीचें चमत्कारिक आद्य तत्त्व * असें आहे कीं, ज्या कृत्यास

$ ' विलायतेंतील प्रवास ' आ० २ री, प्रस्तावना पहा.

* ' पत नोंदणारा' (Recorder of Credit) याचा अलीकडला ताजा अंक पहा.

हिंदी दंडनीतीप्रमाणें शिक्षा नाहीं, त्याम तें अनीतिकारक ह्मणत नाहीं. वचनभंग किंवा विक्री, जामिनकी, हमी, ठेव, मुनीमगिरी किंवा पाती-दारी ह्यांपैकीं कोणताहि करारापमाणें तो पुरा न करणें ही अनीति नव्हे. कारण, यास दंडनीतीप्रमाणें शिक्षा नाहीं. बुडविण्याचे हेतूनें पैसे उसने काढणें ही अनीति नाहीं; कारण बुडव्या इसमाकरता नादारी कोर्ट आहेच. आपल्या मालांतील दोष आपल्या तोंडून न सांगतां आपले हातचें गिऱ्हाइक जाऊं न देणें ही अनीति नाहीं; कारण, जनरूढि अशी आहे कीं,

आपने छाडको कोइ खट्टा नहिं कहता.

आपल्या ताकाला कोणी आंबट ह्मणत नाहीं. असे असे प्रकार व्यापारी नीतींत येतात. तरी, होतकरू मुलांच्या आईबापांनीं लक्ष्यांत ठेवण्या-सारखी गोष्ट हीच कीं व्यापार हा कायतो एकच असा धंदा आहे कीं ज्यांत चेंचाचेंची झाली, तरी दुकानदारास फाके मारीत बसण्याची पाळी येत नाहीं. इतर धंद्याप्रमाणें याचें तेज चढाओढीनें वाढत जात नाहीं असें नाहीं. तें खरोखरच दुणावतें.

(ए) कारागिरी. हिंदुस्थानचा तरणोपाय जसे विद्यावृद्धि व व्यापार वृद्धि हे होत, तसा कारागिरीचा उत्कर्ष हाहि होय; हें सुजाण आईबापांस येथें नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. अंधपरंपरेप्रमाणें किंवा मेषवृत्ति-प्रमाणें सर्वांनीं एकमार्गी बनून एकाच धंद्यांत गर्दी न करतां, उच्च शिक्षण जितकें संपादन करतां येईल तितकें करून आपापला वडिलो-पार्जित धंदा चालविण्याची तजवीज प्रत्येकानें करावी, ह्मणजे जुनी चतुर्वर्णव्यवस्था चालू ठेवावी. न्हाव्यास जरी शिक्षण मिळालें, तरी त्यानें कारकून बनून कारकुनींत दाटी माजवूं नये. तर त्यानें आपले कसबांत त्या शिक्षणानें टापटीप आणून, त्यावर आपला चरितार्थ उत्तम प्रकारें चालवून, तें बुडवूं देऊं नये. ह्मणजे नवीन लोकांनीं आधींच दाटी झालेल्या धंद्यांत शिरूं नये हें एक झालें. दुसरें असें कीं, ज्यांच्या धंद्यांत अशी दाटी झालेली आहे, त्यांनीं दुसरे झेंपतील, ते

धंदे करण्यास अनमान करूं नये. देशाची औद्योगिक उन्नति होण्यास, त्याचें दुष्काळापासून रक्षण होण्यास, त्याच्या अंगीं दुसऱ्या देशाशीं कलाकौशल्यांत टक्कर देण्याची ताकद येण्यास, व सांप्रतचें दारिद्र्य व औदासिन्य दूर करण्यास, व त्यास कार्यक्षम, साहसी, व संपत्तिमान् बनण्यास अशी कांहीं तरी योजना केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ‘ विपत्तौ न च मर्यादा ’ हें तत्त्व आईबापांनीं मनांत वागवून चातुर्वर्ण्यव्यवस्थेचें एवढ्यानें तूर्त यत्किंचित् उल्लंघन झाल्यास तिकडे कानाडोळा करणें हें त्यांस उचित आहे. ‘ यत्किंचित् ’ असें ह्मणण्याचा मतलब उच्च उद्योग– भिक्षुकी, वकिली, वैद्यकी, शिपाइगिरी करण्याचा ज्या मुलांच्या अंगीं तसाच निखालस जोम असेल, त्यांस करूं द्यावी. कारण ते धंदे रसातळास नेऊन चालावयाचे नाहींत. त्यांची आपणांस पदोपदीं गरज लागावयाची ती लागणारच. ही विचारसरणी आपल्या लोकमान्य विद्वज्जनांस मान्य आहे. कै० रा० रा० महादेव मोरेश्वर कुंटे, बी. ए. माजी हेडमास्तर, पुणें हायस्कूल यांचें ह्मणणें ह्मणूनच असें असे कीं, पुणें शहरांत गिरण्यांच्या चिमण्या जिकडे तिकडे दिसूं लागल्याशिवाय नुसत्या बुद्धिविषयक चळवळींनीं त्याचें डोकें वर निघणार नाहीं. या मतानुसार, हे बृहस्पतितुल्य गुरु आपल्या कमाईतून फुरसतीच्या वेळीं एक पेन्सिलींचा कारखाना चालवीत होते हें बहुश्रुत वाचकांस अवगत आहे. त्यांचे कनिष्ठ बंधु कै० डॉ० अण्णा मोरेश्वर कुंटे, बी. ए. एम्. डी. या भिषग्वर्यांचेंहि मत तसेंच होतें व त्यांनींहि मुंबईत आगपेट्यांची गिरणी काढिलेली पुष्कळांस माहीत आहेच. हे बंधुद्वय नुसतें बोलके नव्हते. तर ‘ क्रिया केवलमुत्तरम् ’ असा त्यांचा उत्तमोत्तम कित्ता होता. व त्यांस विद्या, द्रव्य, व वजन यांची अनुकूलता असून, त्यांचा उपयोग इष्ट हेतू सफल करण्याकडे त्यांनीं केला ह्मणून ते लोकादरास पात्र आहेत. अमदाबाद हायस्कूलचे हेडमास्तर मिस्तर इ. डी. तलाठी हे पारशी गृहस्थ या दृष्टीनेंच वंदनीय व अनुकरणीय आहेत. यांचा मुलगा प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाला, तेव्हां त्यांनीं त्यास देशकालस्थिति पाहून नवीन धंद्यांत घातलें.

मिस्तर तलाठी हे कराची येथें हायस्कूलचे हेडमास्तर असतां, यांच्या लक्ष्यांत असें आलें कीं कराची बंदरांतून आगबोटीच्या आगबोटी भरून कातडीं देशांतरास जातात; व तेथून रंगवून व कमावून इकडे परत येतात; तेव्हां तीं येथल्या येथें रंगवून कमावल्यास देशी कारागिरास उत्तेजन मिळून, देशांतला पैसा देशांत राहील. सबब त्यांनीं आपल्या मुलास हाच धंदा पत्करण्यास सांगितलें. प्रथम त्यांनीं त्याजकडून ' विशिष्ट रसायनशास्त्राचें अध्ययन घरींच करविलें. नंतर त्यांनीं त्यास मुंबईस कातडीं रंगवणाऱ्या मंचरजी शापुजी कंपनींत उमेदवार ठेविलें. असें सोपपत्तिक अनुभवजन्य ज्ञान त्यास प्राप्त झाल्यावर, मि० तलाठीनीं त्यांस ' सिटि अँड गिल्डस ऑफ् लंडन इस्टिट्यूट ' च्या परीक्षेस बसविलें. त्यांत त्यांस यश आलें. पुढें ९ वर्षें प्रयोग करून त्यांनीं त्यास कातडीं कमावण्याची अमोल व अज्ञात कला शिकविली. हीं कमावलेलीं कातडीं मिस्तर डोसाभाई मुलन यांच्या स्वदेशी गिरणींत, मिस्तर बेजंजी दादाभाई मेहता यांच्या नागपूर गिरणींत, व मुंबईंतील फ्रीयर रोडवरील सुप्रसिद्ध कोच-बिल्डर मिस्तर पेस्तंजी प्रेस यांच्या कारखान्यांत खपूं लागल्यामुळें, तरुण तलाठी यांचा धंदा उत्तरोत्तर उत्कर्ष पावत आहे.

कुंटेद्वयांचे धंदे बसले व तलाठीपुत्राचा धंदा सरसावला याचा राहून राहून विस्मय वाटण्यासारखा आहे. तिघांची उत्पत्ति बहुतेक सारख्याच स्थितींत झालेली असून पहिल्या दोन गृहस्थांचे धंदे नामशेष झाले व तिसरा तगला. असें कां याचा विचार खरोखर करण्यासारखा आहे. गुजराथप्रमाणें महाराष्ट्र व्यापार उदीम करण्यास तयार झालेला नाहीं. जो व्यापार उदीम गुजराथी लोकांचें बाळकडूच आहे, तें महाराष्ट्रीयांस तूर्त एळ्याबोळ आहे. पण त्यांचा जंतविकार दूर करण्यास तेंच उत्तम आहे, तेंच रामबाण आहे, मग तें ओकून पडलें तरी हरकत नाहीं! कुंट्यांसारख्या भिषग्वर्यांनीं त्या औषधाची योजना केलेली आहे. तेव्हां त्याचा गुण आल्याशिवाय रहाणार नाहीं!

मिस्टर टाटा यांच्या विश्वविद्यालयाचे कल्पनेंत लाखों रुपयांचा चूर युरोपियन शिक्षकांचे पगारापायीं उडण्याचा रंग आहे. तसा दंभ न माजवितां ह्मैसूरसरकार, श्रीमंत महाराज सयाजीराव गाइकवाड व श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरजकर हे विद्वान् संस्थानिक शास्त्रीयज्ञानप्रसारार्थ व देशी उद्योगधंद्याचे उत्तेजनार्थ खटपट करीत आहेत. एकाच्या उद्योग-शाळा- दुसऱ्याचें कलाभुवन व गिरण्या, व तिसऱ्याची रसायन शाळा या प्रसिद्ध आहेत. त्यांना पण हिंदुस्थानचा हा तरणोपाय दिसत आहे. आतां त्यांस यावें तसें यश येण्यास कालावधि लागणार; पण त्यांस यश येणार हें खास. कारण सुवर्णभूमींत लोह उत्पन्न झालें ह्मणून मिस्टर टाटा यांस धन्यता वाटली याचें विशेष कौतुक नाहीं! सुवर्णभूमींत आधुनिक विक्रमभोजबुक्कराजांसारखीं नृपरत्नें अद्यापि निघतात हेंच विशेष आश्चर्य-कारक आहे!

असो. वर आलेल्या मिस्टर तलाठी या गृहस्थानें जी देशसेवा केली आहे ती ताजी साधारण व्यक्तिकर्तव्याची सीमा असल्यामुळें, तिचा पुनरुल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. त्यानें आपला वस्तुदर्शन-पाठ देशबंधूस दाखविण्याचा प्रयत्न सतत चालू ठेविला आहे. त्यांनीं गुजराथेंत व्याख्यानें दिलीं आहेत तशीं इतरत्रहि देण्याचा क्रम सुरू ठेवला आहे. त्यानें 'जाम-इ-जमशेद' या वजनदार मुंबईच्या दैनिक पत्रांतूनही पत्ररूपानें एतद्विषयक चर्चा चालविली आहे. त्यामुळें आईबापांस 'आपल्या मुलाचें काय करावें ही विवंचना दूर करण्याचा मार्ग दिसत आहे. नव्हे, त्या गृहस्थानें पुण्यास तोच विषय व्याख्यानास घेऊन आईबापांस आपल्या कर्तव्यास जागून कसें वागावें ह्मणजे इष्ट हेतु कसा पार पाडावा हें दाखविलें आहे. तेव्हां तें व्याख्यान व गुप्तेकृत 'हिंदुस्थानची कारागिरी' हीं पुस्तकें मार्गदर्शक व वाचनीय होत. त्या व्याख्यानानें आईबापांनीं मुलांस कोणते धंदे शिकवावेत हें कळतें कारण त्याचे शेवटीं व्याख्यात्यानें त्यांचीं एक यादी जोडिली आहे. ती अशी आहे—

वर्ग १ ला – भांडवल व पूर्ण शास्त्रीय ज्ञान लागणारे धंदे.

(१) आल्कली क्षार तयार करणें.
(२) औषधें तयार करणें.
(३) साबू—
(४) साखर—
(५) तेलें, व्हार्निशें—
(६) मेणबत्त्या—
(७) कागद—
(८) मडकीं, बरण्या—
(९) कांचकाम—
(१०) कातडीं रंगवणें.
(११) —कमावणें.
(१२) घड्याळें तयार करणें.
(१३) खनिज पदार्थ वर काढून तयार करणें.
(१४) संगमरवरी दगड व ग्रनाइट खाणींतून काढणें.
(१५) कापड रेशीम, व लोंकर रंगविणें.
(१६) कापूस व ताग यांचा रंग उडवतेनें पांढरा करणें.
(१७) कलिको–छापाचीं कापडें करणें.
(१८) कोळशाचे रंग तयार करणें.
(१९) सिमिंट तयार करणें.
(२०) चाकू, सुऱ्या, कात्र्या तयार करणें.
(२१) गुरेंढोरें यांची उत्तम वीण—

वर्ग २ रा – भांडवल व हस्तकौशल्य लागणारे धंदे.

(१) धातुपटावरील काम.
(२) चौकटीवर विणणें व मोजे, गंजीफ्राक तयार करणें.
(३) सतरंज्या विणणें.
(४) छत्र्या तयार करणें.
(५) दूधदुभतें करणें.

वर्ग ३ रा – पूर्ण शास्त्रीय ज्ञान व थोडेसें भांडवल लागणारे धंदे.

(१) विद्युत्प्रकाश तयार करणें.
(२) विजेनें धातुकाम करणें.
(३) धातूस मुलामा देणें.
(४) दूध सांकळविणें.
(५) बिस्कुटाचे डबे करणें.
(६) फुलांचीं तेलें, अर्गजा, अत्तरें काढणें.

व अननसाच्या पाल्यांचें कापड विणण्याची युक्ति एका मद्रासी स्कूल ऑफ् आर्टमधील गृहस्थानें काढिली आहे; उंसाच्या पाचोळ्याचे कागद काढण्याची खटपट उत्तर हिंदुस्थानांत

(७) झाडापासून उत्पन्नाचे पदार्थ काढणें–इंदूर संस्थानांत शिंदीपासून साखर काढण्याचा कारखाना एका बाबूनें चालविला आहे; मद्रासेकडे केळीच्या सोपांचें चालू आहे.

(८) उभ्या टोप्याकरितां लोकरीचे विनविणीचे खोके करणें.

(९) हिंदी तेलें शुद्ध करणें.

(१०) मिश्र धातू तयार करणें.

वर्ग ४ था– भांडवल व शास्त्रीय ज्ञान हीं दोन्हीं न लागणारे धंदे.

(१) शिलाई.

(२) चर्मकर्तृत्व.

(३) सोनारकी.

(४) चामड्याच्या पेट्या, पिशव्या तयार करणें.

(५) चाकूच्या मुठी, बटनें, हाडापासून व शिंगापासून तयार करणें.

(६) गाड्या मढविणें.

हीं कामें यथाशक्ति उचलणें ह्मणजे पूर्वींच्या आपल्या चौसष्ट कलांचा जीर्णोद्धार करण्यासारखेंच आहे.

आईबापांस आपल्या मुलांस या नवीन तऱ्हेनें शिक्षण देण्याची दिशा समजावी ह्मणून येथवर हा विषय वाढविला आहे. इंग्रज सरकारहि यास आडवें येत नाहीं. उलट त्यानें रयतेस तसें शिक्षण देण्याकरतां राजधानीचे शहरांतून शिल्पशाळा काढल्या आहेत. व हिंदी राष्ट्रीय सभेचें नवीन अंग होऊं पहाणारें जें औद्योगिक प्रदर्शन त्यास त्याची मदत व उत्तेजनहि आहे. हें सर्व योग्य आहे. पण हा निबंध वाचकांस होतां होईल तितका सुलभ मार्गदर्शक होण्याकरतां डॉक्टर स्माइल्स साहेबांनीं जशी सचित्र व सोदाहरण विवेचनपद्धति आपल्या 'आत्मोत्कर्षा' सारख्या जगन्मान्य ग्रंथांतून योजिलेली आहे, तशी विवेचनपद्धति थोडी बहुत वापरल्याशिवाय येथें इष्टकार्य सिद्धीस जाणार नाहीं. नुसते कुंटेद्वयांचे दीर्घोद्योग, तलाठीसुताचा अमोघ यत्न, ह्मैसूर, बडोदें, मिरज येथील सुशिक्षित संस्थानिक व सार्वभौम इंग्रज

सरकार यांचें श्रमसातत्य व प्रोत्साहन, यांनीं साधारण कर्तृत्वाचा मनुष्य आश्चर्यचकित होऊन तोंडांत बोट घालील! पण त्यापासून हवा तसा परिणाम होणार नाहीं. साधारण व्यक्तींनींच आपली शिक्षणाची दिशा कारागिरीकडे वळविल्याचें किती लवकर केवढा फायदा होत आहे, हें जर होतकरू आईबापांच्या मनावर उत्तम प्रकारें उठेल, तरच तसें सहज घडून येईल. पण अशीं उपयुक्त उदाहरणें देण्यास या लेखकाचें कोंवळें वय व कोता अनुभव असमर्थ आहेत. हें काम खरें ह्मटलें तर वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध पूज्य व्यक्तींचेंच आहे. तें आपण करूं पहाणें ह्मणजे लहान तोंडीं मोठा घांस घेणें होय. तरी निबंधकाराचें कर्तव्य ह्मणून तसला जनापवाद सहन करून जें अल्प उपयुक्त उदाहरण त्यास आढळलें आहे, तें येथें दिलें पाहिजे. १८९९ सालीं पुण्याचे गाडीनें जात असतां, त्यास गाडींत एक होतकरू समवयस्क गृहस्थ भेटले. होते प्रवासांतील खुल्या हवेनें व भरभर पालटत जाणाऱ्या मनोरम सृष्टिशोभेनें दिल खुष होऊन एकमेकांची विचारपूस करतां करतां, असें कळलें कीं ते इंग्रजी सहावी इयत्ता शिकून घरच्या गरिबीस्तव 'रत्नागिरी' स 'पाषाण समुच्चय' च मानून मुंबईस तडक निघून आले. तेथें अज्ञातवासांत रहाण्याचा निश्चय करून, मानापानाचें डोक्यावरील ओझें झुगारून देऊन ते चक्क गिरणींतील मजूर बनले. तेथें आपल्या कामांत दक्षता व फावलेल्या वेळांत अवांतर कामाची चौकशी राखून, आपल्या वरिष्ठांच्या मर्जीस उतरले; व दोन अडीच वर्षांच्या थोड्या अवधींत चढत चढत दरमहा **चाळीस** रुपये पगार—पदवीधरांनाहि एवढा पगार मिळतां मिळतां किती दाताच्या कण्या कराव्या लागतात—मिळविणारे सूतकाताचे चालक ह्मणून दोन तीन गिरण्यांत झाले आहेत. त्यांनीं या लेखकांस आपल्या शिफारसपत्राचें पुडकेंहि प्रेमभावानें दाखविलें होतें +

\+ विस्तारभयास्तव त्यांतून एकच येथें आपल्या रोजनिशींतून उतरून देतों; ह्मणजे प्रियवाचकांस ही कथा केवळ कल्पित कादंबरी भासणार नाहीं; तें येणेंप्रमाणें:--

(ऐ) कृषिकर्म किंवा शेतकी:-- आतां आपण धंद्यांची मजल मारतां मारतां ' ऐ ' पर्यंत येऊन ठेपलों. व हा धंदा खरोखरच मागील सर्व धंद्यांची ' आई ' आहे. आपली जुनी ह्मण अशी आहे:—

' उत्तम शेती, मध्यम व्यापार,
कनिष्ठ नोकरी, नाहींतर भीक !

सध्यां विद्या अर्थकरी किती झाली आहे, जीवनार्थकलह किती मौजेचा होत चालला आहे, चाकऱ्यानोकऱ्याची चंगळ उडून जिकडेतिकडे किती मंगळ होत आहे, घरींदारीं लक्ष्मीचा अखंड वास होत असल्यामुळें सर्वत्रांच्या अंतरात्म्यास आनंदीआनंद होत आहे हें पाहून होतकरू मुलांच्या आईबापांनीं चैनीखातर त्यास ' हलधर ' बनवावें व त्यांचा ' मोर्चा शेतीकडे वळवावा ' असा काळ आला आहे. कै० रा० लक्ष्मण परशुराम परांजपे वसईकर या सद्गृहस्थांनीं ही सूचना ऐन वेळेवर केलेली आहे. ती आईबापांस पसंत पडणारी आहे. कारण ती सूचना करणारा गृहस्थ शेतींत पडलेला होता व त्यास शेतीचें मर्म समजलेलें होतें. तेव्हां त्यांचे शेतीविषयावरील मतास निष्णाताच्या मताइतकी किंमत आहे. ते ह्मणतात कीं, ' कांहीं झालें तरी सर्व साधनांचे अगोदर पोटाची तरतूद पाहिजे. ह्मणजे अन्न पाहिजे व तें

[मागील पृष्ठावरून]

The Bharatkhand Cotton mill,
Ahmedabad.

This is to certify that Mr. Balkrishna Vishnu Vatve has worked under me to entire satisfaction. He is a young man ever striving to obey the orders of his Superiors.

(Sd.) ROBERT BRUCE,
Agent.

गिरणींतील कटकट ऐकून कान किटविणाऱ्यांची ही पूर्वपीठिका आज जेवढी मजेदार वाटत आहे, तेवढी ते गिरणीचे ' यंत्रचालक ' (Engineer) या पदास चढल्यावर वाटणार नाहीं; ती शिळी वाटेल. दुसरें असें कीं, समाजांतील साधारण-लोकांची धांव सरज्याचे कुंपण-झिपऱ्या उडीपर्यंत असते. तेव्हां असें ताजें मासलेवाईक उदाहरण त्यांच्या पथ्यावर पडेल असें वाटतें.

तर शेती देतें. शेतकी सर्व कलांची माता आहे, व्यापाराचा आधार आहे, व एकंदर समाजाचा पोशिंदा आहे. शेतकरी हा सर्व समाजरूपी चक्राचा आंख आहे. रावापासून रंकापर्यंत सर्वांच्या मजा त्याच्या जिवावर आहेत. परंतु आम्ही त्यास तुच्छ मानून त्यांकडे कानाडोळा करीत आहों, ह्मणून तर आमच्या शेतकीची इतकी निकृष्ट दशा आहे. ह्मणून तरुण मंडळी यांत शिरल्यास त्यास फायद्यापरी फायदा होऊन आपल्या देशांतील मुख्य धंद्यांत पुष्कळ सुधारणाहि करतां येऊन, त्यांस देशाला उर्जितदशा आणण्याचें श्रेय मिळणार आहे.' * हा बोलका उपदेशक नव्हे ह्मणून वर आलेंच आहे. या सद्गृहस्थानें आपल्या बोलाप्रमाणें कृति करून दाखविलेली आहे. १९०१ सालीं दुष्काळ पडला होता. तेव्हां या गृहस्थानें एका चार माणसांच्या शेतकरी-कुटुंबास कायावाचामनेंकरून हात देऊन त्या भयंकर काळाचे व एकोत्र्याचीं बोटें मोडणाऱ्या सावकाराचे तडाक्यांतून सोडवून हंगामी भाजीपाल्याचें हलकेंसलकें पीक करण्याची बुद्धि सुचवून व त्यांचा जमखर्च आपल्या हातीं घेऊन खरा 'शेजारधर्म' काय आहे हें आपल्या देशबंधूंस दाखविलें.

'धनुर्धारी' या प्रसिद्ध लेखकानें स्थापिलेलें 'कृषिकर्ममंडळ' पाहूनहि आईबापांस आपल्या होतकरू मुलास शेतकरी बनवून, शेतकरीवर्गाचा पोच व कर्जबाजारीपणा दूर करतां येईल. त्यांस सुशिक्षित, कनवाळू वाली मिळाले ह्मणजे त्यांचे हाल दूर होतील. त्यांस शेतकीसंबंधीं शास्त्रीय ज्ञानाचा ठेवाहि मिळून, त्यांच्या अनुभवजन्य ज्ञानांत मोठीच भर पडून, त्यांचा उदय होण्यास वेळ लागणार नाहीं.

परांजपे व धनुर्धारी या कर्तृत्वाचे पुरुषांकडे पाहून या लेखकांसहि त्यांच्यासारखी स्फूर्ति हळूहळू होत आहे. याचा एक स्नेही चाकरी संभाळून शेतींत शिरलेला पाहून त्यांस परम कौतुक वाटत आहे. याचा परिणाम नुसता लेखणी कुरकुरवण्यापलीकडेहि होत आहे. त्यास शेतकरी

* ग्रंथमाला १९०१-०२ पहा.

स्नेहीसोबत्यांस अडीअडचणीला अल्पस्वल्प मदत करावीशी वाटत आहे. ' आपल्यावरून जग ओळखावें ' हें जर खरें असेल, तर या लेखकासारखी किंबहुना या लेखकाहून अधिक स्फूर्ति इतरास असेल! व कृषिकर्मांचा उदयकाळ समीप आला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

(ओ) ललितकला पोटपाण्याची तजवीज लावणारा एखादा धंदा केल्यावर मनुष्याचें लक्ष साहजिक मनोरंजनाकडे लागतें. या सर्वसाधारण तत्वानुसार ललितकलांचा उगम आहे. काव्य, नाटक, चित्र, शिल्प या जनमनोरंजनाचे व्यवसाय आहेत ते आपल्या देशांत बाल्यावस्थेंत आहेत. त्यांस पहिल्या कलेंत प्राप्तीचे नांवानें जवळ जवळ पूज्य ह्मणण्याचा प्रसंग आलेला आहे. हें ' काव्यरत्नावली ' सारख्या मासिकावरून व्यक्त होतें कारण ' काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ' असा प्रकार अद्यापि झालेला नाहीं. पण नाटक, चित्र व शिल्प या कलांस लोकाश्रय आहे. किर्लोसकर, रविवर्मा, ह्मात्रे अशी मंडळी ह्मणूनच आपापला धंदा करून चरितार्थ चालवीत आहेत. पण मोगरे, लोंढे, लेंभे, कुंटे, मिरासुरे, ओक, केशवसुत, चंद्रशेखर, माधवानुज इत्यादि कविवर्यांचा चरितार्थ कोणत्या धंद्यावर चालवावा लागतो? त्यांच्या वीणानादावर त्यांस आपला चरितार्थ चालवितां येतो काय? त्यांच्या काव्यावर त्यास वर्षासनें अक्षरी लक्ष मिळत आहेत काय? त्यांच्या ग्रंथावर लोकांच्या उड्या पडत आहे काय? त्यांस राजाश्रय किंवा लोकाश्रय आहे काय? राजांकडून किंवा सभेकडून एकादें तुटपुंजें बक्षीस मिळालें ह्मणजे त्यांचें भागतें काय? नाटक, चित्र, शिल्प याहून चिरस्थायी जें काव्य, त्याची अनास्था हितकर आहे काय? पण असे शेकडों प्रश्न करून ललितकलाश्रेष्ठ × काव्याची तरफदारी करण्यांत काय मतलब? कांहीं नाहीं. मग आईबापांना आपला मुलगा ' कवि ' झाल्याचा संतोष वाटत नाहीं तें उगीच नाहीं. त्यांच्या मनावर लोकस्थिति पूर्णपणें बिंबलेली असते. त्यांना ठाऊक असतें कीं—

× ' काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षये । सद्यः परनिर्वृतये कांतासंमिततयोपदेशयुजे ॥
—मम्मटः

येथें समस्त बहिरे बसतात लोक!
कां भाषणें मधुर तूं करिसी अनेक?
हे मूर्ख! यांसि किमपीहि नसे विवेक!
रंगावरुनि तुजला गणितील काक?

काव्य ऐकण्यास आपले लोक बहिरे झाले आहेत काय? संस्थानिकांच्या पदरीं आरबी घोडे, शिकारी कुत्रे, मोठमोठे हत्ती, वाघ, सिंह, अद्यापि आहेत! ते काय त्यांना दूध देत आहेत? ते केवळ पूर्वीचा मानमरातब राखण्याकरितां आहेत ना? मग नुसत्या मानमरातबापेक्षां पूर्वीची विद्या तरतरीत व तजेलीदार दाखवणारे व समाजास कर्तव्यजागृत करणारे कविवर किती संस्थानिकानीं मानमान्यतेनें राखिले आहेत बरें? आपले सुशिक्षित संस्थानिक देशी भाषांचा पुढाकार घेण्याचे विचारांत आहेत. तेव्हां कवितेचे अध्यापक, राजकवि, कविश्रेष्ठ या जागा करण्याची त्यांस विस्मृति पडेल काय? कालिदास व भवभूति, वामनपंडित व मोरोपंत यांस आश्रयावांचून नांवलौकिक मिळवितां आला नाहीं हेंही त्यांस माहित आहे, प्राचीन काळीं प्रतिपादन केलेला सर्वमान्य सिद्धांत--

विनाश्रया न शोभन्ते पंडिता वनिता लताः।

हा अद्यापि त्यांस मान्य आहे. पण सांप्रतच्या कविवरांनीं मात्र आपली मान मुरगळून मेंदूस शिणवून वाटेल तो जोडे फाडण्याचा धंदा करून

[मागील पृष्ठावरून]

‘ काव्यापासून यश, संपत्ति, व्यवहारज्ञान, पापक्षालन, तात्काळ मोठा संतोष, स्त्रीसुख, व उपदेश यांची प्राप्ति होते. ’

“ He (the poet) not only preceded dut formed the orator, philosopher and historian'.—Goldsmith's inquiry Into the present State of Polite Learning (p. 88 the works of Oliver Goldsmith). The supreme value of Poetry is to educate us to height beyond or which it nearly reaches—the subdying of of mankind to order and virtue.” Works of Ralf Waldo Emerton.

आपली तुंबडी भरावी व राहिला साहिला वेळ सृष्टिसंगांत व कल्पना विनोदांत घालवून वायुभक्षण करीत राहते ह्मणजे कवितादेवी सुप्रसन्न होते व ती त्यास नवीन उमेद देते असें त्यास वाटतें! पण प्रिन्सिपाल आपट्यांसारखे महाकोशकारही हा भ्रम आहे असें ह्मणतात. त्यांचें मत असें आहे कीं —

क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ।

असो. काव्यकलेची हालहवाल अशी आहे. नवीन वक्तृत्वोत्तेजक सभा बऱ्याच ठिकाणीं निघाल्या आहेत. पण पुरातन श्रेष्ठतम काव्यकलेच्या उत्तेजनार्थ कोठें कोणीहि मोठासा यत्न केल्याचें दृष्टीस पडत नाहीं. वक्तृत्वास किंमत आहे. पण त्यास कवित्वाची कां सर येणार आहे? तक्रास नवनीताइतका का मान मिळणार आहे? पण काय असेल तें असो, सध्याची नीति इळा मोडून खिळा करणारी अशी दिसते. मग या लेखकाची बुद्धि बावचळली असली तर निराळी गोष्ट आहे.

पण खेदाची गोष्ट ही कीं या नीतीचा प्रत्यक्ष अनुभव या लेखकासही थोडासा आलेला आहे. त्यास अनेक प्रसंगीं तशी खोट आलेली आहे. त्यापैकीं एक दोन ठळक प्रसंगाचें दिग्दर्शन येथें केल्यास तें गैर होणार नाहीं. त्यामुळें ज्या आईबापास कविपुत्राचें सुख नीट समजलें नसेल, त्यांस तें नीट समजेल. सुमारें नऊ वर्षांपूर्वीं उत्तर हिंदुस्थानांतील एका बड्या संस्थानिकाच्या राज्याधिरोहणानिमित्त मोठा उत्सव झाला होता. त्या प्रसंगीं या लेखकानें संस्कृत, मराठी, व इंग्रजी या तीन भाषांत समयोचित प्रजाधर्मानुसार चार कविता रचून सरकारास दरबारांत अर्पण केल्या होत्या. त्या कामीं काव्यश्रम व द्रव्यव्यय व्हावयाचा तसा झालेला होता. पण कवीस त्याबद्दल पारितोषक नवीन सुधारलेल्या पद्धतीप्रमाणें कोरडे थ्यांक्स मिळावयाचे तेही मिळाले नाहींत. आतां कोणी असें विचारतील कीं तुह्मांस असली नसती उठाठेव करावयास कोणी सांगितली होती? 'अव्यापारेषुव्यापारः' केल्याबद्दल तुह्माला कांहीं मिळालें नाहीं तें ठीक नाहीं कां? यावर उत्तर इतकेंच

कीं, आपल्या जुन्या भावड्या चालीप्रमाणें प्रजेनें राजाचें अभय चिंतन करावें व राजानें तिला मानाचें पान गोड असें द्यावें. असाच प्रकार गेल्या वर्षी दक्षिण हिंदुस्थानांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानभर गाजत असणाऱ्या नमुनेदार बड्या संस्थानिकाचे राज्याधिरोहणसमयीं घडला. यावेळीं गतानुभवावरून या लेखकानें विशेष द्रव्य खर्च न करतां, सुंदर मोहोरेदार कागदावर इंग्रजी व संस्कृत अशी अल्पकाव्यरचना केली होती. तींतील इंग्रजी कवितेचें प्रकाशन तत्रस्थ एका साप्ताहिक इंग्रजी पत्रानें व मद्रासच्या दैनिक 'हिंदु' या लोकप्रिय वजनदार इंग्रजी पत्रानें करून आपल्या दूरस्थ देशबंधूचा गौरव केला होता. पण ज्यांस तें मानपत्र अर्पण केलें होतें, त्यांनीं त्याबद्दल मौन मात्र धारण केलें. विक्रम, भोज, मांधाता, इत्यादि आपले राजे; आल्फ्रेड, अलेक्झँडर, एलिझाबेथ, पीटर धी ग्रेट, व्हिक्टोरिया, सातवे एडवर्ड इत्यादि पाश्चात्य महाराजे व महाराण्या विद्वानांच्या पुरस्कर्त्या होत्या हें तर सर्वमान्य आहे. पण अगदीं परवापर्यंत राजेलोकांची गुणग्राहकता नष्ट झालेली नव्हती. एक कविमित्र कै. श्री. महाराज तुकोजीराव होळकर, इंदूरसंस्थानाधिपति यांची गोष्ट सांगत असे कीं, एकदा ते महाराष्ट्रांत आले असतां त्यांच्याकडे एक विद्यार्थी आश्रय मागण्याकरतां आला. तेव्हां महाराज त्याचें मन पाहण्याकरतां त्यास ह्मणाले, "आह्मी तर बोवा धनगर, आह्माला त्या तुमच्या विद्येंत काय समजतें?" त्यावर त्या विद्यार्थ्यानें धूर्तपणानें उत्तर दिलें कीं, "महाराज, आपण धनाचें घर आहां! मग आपणास काय कमी आहे?" हें ऐकून, त्या उदार नृपवरास परम संतोष झाला, व त्यानें त्यास दरमहा दहा रुपये शिष्यवृत्ति देण्याचा हुकूम दिला. आतां या दंतकथेंत तथ्यांश कितीहि अल्प असला, तरी तपासून घेण्याची गोष्ट कायती एवढीच कीं राजलक्षण जें सागरासारखें औदार्य तें त्या नृपसिंहांत खास वसत होतें. ह्मणूनच अद्यापि त्याचें स्मरण होऊन त्यांची प्रजा मोठ्या खेदानें असें ह्मणत असते

(हिंदी)

गुणग्राहक, प्रजापालक, क्षमा, सत्संग,
दया, प्रियभाषणता, गयी तुकोजीसंग!

अशी काव्यकलेची तरफदारी करण्यांत या भोळ्या लेखणींतून वावगे शब्द निघण्याचा संभव आहे. तेवढ्याबद्दल विचारी वाचक या लेखकास क्षमा करतील अशी आशा आहे.

काव्यकलेच्या खालची नाट्यकला लोकाश्रयावर चालत आहे; व तींत विद्वान् लोक मेहनत करूं लागल्यास, ती लोकादरास अधिकाधिक पात्र होणारी आहे यांत काडीमात्र संशय नाहीं. उत्तम कला संपादन होऊन, त्यांत स्वार्थ व परमार्थ साधण्यासारखा आहे. योगिजनासहि अगम्य अतएव परमगहन असा जो सेवाधर्म त्यापेक्षां हा धंदा फार सुबक व फायदेशीर आहे. ह्मणून नाट्यकलेच्या जीर्णोद्धाराचें श्रेय विद्वान् झालेल्या मुलांस घेऊं देण्यास आईबापांनीं तिलप्रायहि किंतु मनांत आणूं नये.

शिल्पकला ही आपल्याकडे नवीन नाहीं. सोनागीर, बुद्धगया, मथुरा, मदुरा, रामेश्वर, वेरुळ, कार्लीं, घारपुरी, आग्रा, दिल्ली, विजापूर इत्यादि ठिकाणचीं कारागिरीचीं कामें या कलेची साक्ष देत आहेत. पुण्यास 'खुन्या मुरलीधर' ह्मणून एक सुंदर देवालय आहे. त्याच्या वृत्तांतावरून आपल्या देशांत अलीकडे या कलेचा किती बडेजाव होता, हें इतिहास-वाचकांस अवगत आहेच. ज्या मूर्तिकारानें ती मुरलीधराची अप्रतिम मूर्ति बनविली, त्याचे मस्तकीं छग्याचा मार बसून,

आति सर्वत्र वर्जयेत्

या चाणक्यवचनाची प्रतीति त्यास तत्काळ आली. पण हें ऐकून रा० ह्मात्रे यांचें धाबें दणाणत असेल! पण त्यांसहि जवळ जवळ असाच अनुभव दिल्लीदरबार व पॅरिस प्रदर्शन यासमयीं आलेला आहे. संतोषाची गोष्ट इतकीच कीं, मुंबईसारख्या सर्व धंदेवाल्यांचें मायपोट होऊं पाहणाऱ्या शहरांत त्यांची डाळ शिजत आहे! एकूण आईबाप मुलांस शिल्पकला घेण्यास सांगतील तर तीं मूर्खच ठरतील!

अश्वविद्या ही पूर्वीं महाभारतकालीं पुण्यश्लोक नलराजास उत्तम अवगत होती. तशी अगदीं अलीकडे मराठेशाहींत ती उत्तम अवगत होती. व त्यांस 'सवाई शिलेदार' असे परस्थ ह्मणत. अजूनहि संस्थानांतून सर-

दार बाबासाहेब आपटे यांसारखे घोडेसवार नांवाजले जात आहेत. त्यांची शागीर्दी पत्करून प्रोफेसर विल्सनशीं सामना करणारे प्रोफेसर विष्णुपंत छत्रे व त्यांची यशःपताका पाताळलोकींहि मिरविणारे बंधुवर्य प्रोफेसर काशीनाथपंत छत्रे, त्यांच्याच तोडीचे अलीकडले युरोपांत कीर्ति संपादन करणारे प्रोफेसर देवळ व त्यांचे बंधुवर्य हीं नांवें ऐकून आजचे दिवसहि भागुबाईसारखे घरांत बसून माशा मारण्याचे नाहींत, सिंह व्याघ्र यांसारख्या क्रूर प्राण्यांस आपणांस प्रबल इच्छाशक्ति दाखवून जिंकतां येतें, व आपल्या अलौकिक कर्तबगारीनें सुधारलेल्या जगाशीं या कलेंत टक्कर देतां यऊन चार पैसेहि गांठीं बांधतां येतात व मोठा नांवलौकिक मिळवितां येतो. असे विचार देशाभिमानी शूर मातापितरांच्या मनांत येऊन, या धंद्यांत आपल्या होतकरु तरुण छाव्यास घालण्यास खरोखर हिंमत येणार आहे. त्यास या धंद्याविषयीं पूर्ण खात्री आहे कीं सत्वस्थ, कुशल, उद्योगी, बलवान् पुरुष हे सिंहासारखे हिंमतबहाद्दर खरेच; व हिंमतबहाद्दरांस काय कमी असणार! कारण ह्मणतात कीं

हिंमत मर्दा मदत दे खुदा !

येथपर्यंत शिक्षण या सदराखालीं जे जे बुद्धिविषयक व शारीरिक (कर्तबगारीचे) व्यवसाय आहेत, त्यांचा यथामति विचार झाला. आई-बापांनीं मुलांस नुसतें बुद्धिविषयक व शारीरिक शिक्षण देऊन चालत नाहीं. लोकव्यवहार नीट कळण्यासाठीं त्यांनीं त्यांस नीतिशिक्षणहि दिलें पाहिजे. तर आतां आपण नैतिक शिक्षणाकडे वळूं. आपले आर्यपूर्वजांची बुद्धिमत्ता जशी प्रखर होती, तशी त्यांची नीतिमत्ता दिव्य होती, हें सर्वश्रुत आहेच. ऋग्वेदांतलि शेवटल्या दोन ऋचांत त्यांचें नीतिसार सांठविलेलें आहे. त्या येणेंप्रमाणें

सं गच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम् ।
देवा भागं यथापूर्वे संजानाना उपासते ।
समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥

अ० ८ अ० ८ व० ४९

" तुह्मी मित्रभाव जोडून रहा. परस्परांतील विरोध टाकून देऊन एकमतानें भाषण करीत चला. तुमच्या मनाचा रोख एकाच दिशेला असूं द्या. अनादि देवता एकमतानें राहून आपआपल्या हविर्भागाचा जसा स्वीकार करतात, तसा तुह्मीही मतांतरांतील वैमनस्याचा त्याग करून इष्टफलाचा अंगीकार करा. "

" तुमचा निश्चय एक असूं द्या. तुमचीं अंतःकरणें एकरूप असूं द्यात. आणि ज्यायोगानें तुमचा उत्तम एकोपा राहील अशा प्रकारें तुमचीं मनें समसमान असूं द्या. "

हें वेदकालीन ऋषींचें नीतिसार, रामायण, महाभारत, भागवत या मान्य महाकाव्यांतून, अठरा पुराणांतून, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदासादि अलीकडील कवींच्या ग्रंथांतून, व न्यायमूर्ति रानडे यांच्या सामाजिक परिषदेंतील भाषणांतून प्रकट होत आहे. तेव्हां हें प्रमुख नीतितत्त्व आईबापांनीं स्वताच्या आचरणानें मुलांस दाखविल्यास, त्यांच्या मनांत तें उतरण्यास विलंब लागणार नाहीं. वेदासारख्या अत्यंत प्राचीन ग्रंथांतून अशीं नीतितत्त्वरत्नें चमकत राहून प्राच्यपाश्चात्यज्ञानपंडितांसहि तीं दिपवून टाकतात हें मोठें भूषण आहे.

सर विलियम जोन्स यांस जसें शाकुंतलानें, मोनियर, विल्सन यांस आर्यकाव्यग्रंथानें, शोपेन्हार व मोक्षमुल्लर यांस वेदांततत्त्वज्ञानानें वेडावून सोडिलें होतें, तसें * सर एड्विन् ऑर्नोल्ड एम्. ए. के. सी. आय्. ई. सी. एस्. आय्. यांस हिंदुस्थित्यादर्श रामायण व महाभारत या महाकाव्यांनीं वेड लाविलेलें आहे. भरतखंडांतील ईलियड व ऑडेसे या विषयांवर व्याख्यान देतांना, या विद्वान् इंग्रजी कविवर्यानें त्या महाकाव्याची खरी किंमत ओळखली आहे. महाभारताविषयीं तर त्याचें असें मत आहे कीं, तें एवढें अवाढव्य आहे कीं, तें एकटें ईलियड व ऑडेसे हीं दोन्हीं एकत्र केलीं, तरी त्याहून सातपटीनें मोठें आहे. एवढेंच नव्हे तर त्यांत प्राचीन हिंदूंच्या राहणीचें जितकें सविस्तर चित्र

* ' हिंदी लघु काव्यें ' (Indian Idylls) आवृत्ति २ री पहा.

आहे तितकें जुन्या करारांत ज्यू लोकांचें नाहीं. नव्या करारांत सुधारलेल्या ख्रिस्ती लोकांचें नाहीं, कुराणांत तलवारबहाद्दर मुसलमान लोकांचें नाहीं. आणि याच कारणास्तव आपण त्यांस 'पांचवा वेद' ह्मणतों. व त्यावर आपली इतकी श्रद्धा आहे कीं, त्याच्या पठणश्रवणानें दरिद्री मनुष्यास द्रव्यलाभ होतो; दुखणाइतास आराम वाटतो; अज्ञान्यास ज्ञान प्राप्त होतें. त्या दोन महाकाव्याचे पाठ चातुर्मास्यांत देवालयांतून व श्रीमंतांचे घरीं अद्यापि चालू असतात. त्यांच्याच श्रवणानें शिवाजी बाजीरावासारखे कर्तेपुरुष अलीकडेहि निपजले. व त्यांच्याच अभ्यासक्रमांत प्रवेश झाल्यास राष्ट्रांत कर्तव्यजागृति सहज होईल. 'शालोपयोगी नीतिग्रंथ या परदेशीय भाषांतररूप ग्रंथापेक्षां, रा. ब. चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल्एल्. बी. यांचें 'संक्षिप्त रामायण' व 'संक्षिप्त महाभारत'; रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांचें 'बाल रामायण व बाल भारत'; मेहरबान नेसफील्ड साहेबांची 'प्राच्य वाचनमाला' व प्रोफेसर गोळे यांच्या 'काव्य वाचनमाला' इत्यादि ग्रंथांची उपयुक्तता सध्यां फार आहे. कारण अशा योजनेनें सध्यांच्या शिक्षणांतील एकदेशीयपणा नष्ट होतो व वाचकाचें कोमल मन दुहेरी वळणानें उदार होतें. कलकत्त्यांतील सुप्रसिद्ध † 'अमृतबझार पत्रिका' कारहि असेंच ह्मणतात कीं 'धार्मिकांचें क्षेत्र' या गोष्टीसारख्या गोष्टींपासून आपल्या होतकरू मुलांस आश्चर्यकारक, मनोवेधक व बोधपर असें कांहीं वाटणार नाहीं. या 'शालोपयोगी ग्रंथांतील गोष्टींत असें ह्मटलें आहे कीं, व्हिसूव्हियस या ज्वालामुखी पर्वताचे स्फोटांत अनेपियस व ॲंफिनोमस या धार्मिक पुत्रांनीं आपल्या वृद्ध मातापितरांसच वांचविलें, त्यांनीं आपल्या धनदौलतीकडे मुळींच पाहिलें नाहीं. पाश्चात्त्य कथा उपयुक्त आहे यांत संशय नाहीं. पण याहून शतपटीनें उपयुक्त अशा कथा हिंदुस्थानांत घडलेल्या आहेत. श्रियाळ राजाचा पुत्र चिलया, हरिश्चंद्राचा पुत्र रोहिदास, व्याघ्रपादाचा पुत्र उपमन्यु, उत्तानपादाचा पुत्र ध्रुव इत्यादींचा दृढनिश्चय व अचलभक्ति जोंपर्यंत आपल्या पुत्रपौत्रांत थोडीबहुत वास

† "What the Hindus were"—17th August 1903.

करीत आहे, तोंपर्यंत त्यांस परस्थांकडे पाहण्याची गरज नाहीं. या गुणांसच चेतना देण्याचें आईबापांचें उत्तम नैतिक कर्तव्य आहे; तशा-नेंच त्यांस उन्नतीप्रत नेतां येईल; तशानेंच त्यास दिलेल्या शिक्षणाचें, खर्चिलेल्या पैशाचें व सोसलेल्या हालअपेष्टांचें चीज होईल हें लक्षांत आणून, त्या नैतिक कर्तव्याचें दिग्दर्शन येथें करण्याचा विचार आहे.

आद्यकवि वाल्मीकि यांच्या ' रामायणाचा नायक पुरुषसिंह श्रीराम ' हा होय. त्याचें शौर्य, धैर्य, इंद्रियनिग्रह, प्रजावात्सल्य, पितृभक्ति, इत्यादि गुण सर्वप्रसिद्ध आहेत. पण त्यांतहि अत्युत्तम असा त्याचा गुण ह्मटला ह्मणजे सत्य, एकवचनी, करारी, बाणेदार स्वभाव हा होय. जाबाल नांवाचा ब्राह्मण पितृवचनानुसार वनवासास गेलेल्या रामाकडे येऊन ह्मणतो ' तुझा पिता आतां मरण पावला आहे. त्याच्यामागें तूंच राज्य करावेंस. अयोध्यावासी जनांची अशीच इच्छा आहे. ज्याकडे तें राज्य गेलें आहे तो तुझा अत्यंत प्रिय कनिष्ठबंधु भरत याची पण तशीच इच्छा आहे. तर मृत मनुष्याच्या वचनाला तूं इतकें महत्त्व कां देतोस?

रामचंद्रानें हें त्या ब्राह्मणाचें भाषण शांतपणानें ऐकून घेतलें, व त्यांस असा रोकडा जबाब दिला कीं तो त्याच्यासारखा करारी मनुष्यास कधींहि दिलखूष वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. त्यानें उत्तर दिलें कीं

नास्तिक्यं त्वं प्रभाषसे।
सत्यं खलु सदा धर्मः सत्यं धर्मः सनातनः।
सत्यमेव नमस्येत सत्यं हि परमा गतिः॥

आतां राम हा एवढा सत्यनिष्ठ कसा निघाला? कारण त्यास गृहशिक्षण ज्या पित्याचे हातून मिळालें होतें, तो दशरथ राजा तसाच सत्यनिष्ठ होता. राणी कैकयीनें पूर्वीं समरांगणावर मोडलेल्या रथास सावरून धरून दशरथास जय मिळवून दिला होता. त्यावेळीं प्रसन्न होऊन त्यानें तूं मागशील तेव्हां तुला दोन वर देईन असें तिला ह्मटलें होतें; व तसें त्यानें रामास बेवारस ठरवून त्यास १४ वर्षें वनवासास घालवून व भरतास राज्यपद देऊन खरें करून दाखविलें. हा सत्यनि-

ष्ठपणा एवढा भयंकर होता कीं यानें दशरथाचा घात झाला. तरी धन्य त्याची कीं त्यानें आपलें ब्रीद, तेवढेंहि न जुमानून जाऊं दिलें नाहीं.

अशा दशरथाचे पुत्र, राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न हेहि तसेच सत्यनिष्ठ निघाले यांत नवल नाहीं. वसिष्ठासारखे सत्वस्थ गुरु पण ते त्याचा गुण विकसित करण्यास झटत असत; व ह्मणूनच त्यांस 'नास्ति बंधुसमं बलम्' हें तत्त्व त्यांस आपल्या वर्तनांत दाखवितां आलें. *

रघुवंशाचा सत्यनिष्ठपणा असा सर्वश्रुत आहे. तसाच विदेहाधिपति जो जनक त्याचा सत्यनिष्ठपणा सर्वांस विदित आहे. त्याची या गुणाविषयीं अशी ख्याति होती ह्मणून दशरथ त्याचा व्याही असूनहि त्याची सेवा करीत असे. हें जनदृष्टीनें विपरीत तर खरेंच. कारण कन्येचा पितृपक्ष जामाताचे इष्ट जनांचा मान राखतो अशी रूढि आहे.

अशा राजर्षि जनकाची कन्या सीता हें एक सत्यनिष्ठ अप्रतिम स्त्रीरत्न होतें. सर्व प्राचीन गुरूंत श्रेष्ठ तपोनिधि वसिष्ठ हा ज्या अरुंधतीच्या सहवासामुळें स्वतः पावन झालों असें ह्मणत असे; व जिला जनकासारखे सर्व पूज्य राजे प्रातः संध्यादेवीप्रमाणें वंदन करीत असत, तीदेखील सीतेविषयीं काय ह्मणते तें पहाः--जनक रागानें ह्मणतो कीं, 'कोण आला आहे तो अग्नि आमच्या सीतेस शुद्ध करण्यास? अशानें लोक आमच्या डागावर डाग मात्र देत आहेत! त्यावर अरुंधती सुस्कारा टाकून त्याचें असें समाधान करतेः--

(" + एवमेतत्। अग्निरिति वत्सां प्रति परिलघून्यक्षराणि सीतेत्येव पर्याप्तम्। "　　　उत्तररामचरितम्। अं. ४)

रामासारख्या सत्यप्रतिज्ञ महापुरुषांस तसेच बाणेदार आईबाप, भाऊबंद सुग्रीवबिभीषणासारखे स्नेही, हनुमंतासारखे दास मिळून रावणा-

---

* अझून आपल्या बायकामुलींची ही ओंवी आवडती आहे—

राम चाले वाटे। लक्ष्मण झाडी काटे
ऐसे बंधु नाहीं कोठें। सृष्टीमध्यें!

+ असेंच तें, अग्नि हा तिच्यापुढें अगदीं कसपटासारखा आहे."

सारख्या प्रचंड राक्षसाधिपतीवर कसें वर्चस्व स्थापितां आलें हें ज्यानें मननपूर्वक वाचलें असेल, त्यांस त्यानंतर घडलेला ग्रीस रोमसारख्या पराक्रमी राष्ट्रांचा अभ्युदय व अवनति कशानें झाली, युरोप, अमेरिका व जपान कोणत्या तत्त्वावर सध्यां सरशी पावत आहेत, अगदीं अलीकडे महाराष्ट्रानें कोणत्या गुरुकिल्लीनें आपलें डोकें वर काढलें होतें, त्या आईबापांना हें आपल्या होतकरू मुलांस थोडक्यांत समजवून देणें झाल्यास, त्यांनीं त्याचे मनांत हें उत्कृष्ट नीतिसार ठसवावें कीं

सत्यमेव जयते।

रामायणांतील सत्यनिष्ठपणाचाच उपदेश महाभारतांतहि केलेला आहे. रामायणांतील रामरावणांचें युद्ध जसें ' धर्मयुद्ध ' आहे, तसें महाभारतांतील कौरवपांडवांचें युद्धहि ' धर्मयुद्धच ' आहे. एकांत पळवून नेलेली बायको हस्तगत करण्याचा उद्देश आहे, तसा दुसऱ्यांत बळकावलेला दाय (वडिलोपार्जित धनाचा भाग) सोडविण्याचा उद्देश आहे. या दोहोंपैकीं कोणतेंहि केवळ अन्यायार्थ केलेलें नाहीं; तर अन्याय करणारास शासन करण्याकरतां सरळ स्वभावानें केलेलें आहे. लंकेवरील स्वारी अंगदशिष्टाईनंतर झालेली आहे व कुरुक्षेत्रप्रसंगहि कृष्णशिष्टाईसारख्या सामाच्या प्रकारानंतर झालेला आहे.

यावरून आपली पूर्वींची शांतिप्रियता. वीरभूषणभूत क्षमा व सत्यनिष्ठा व्यक्त होते. या तीन गुणांत मागें लिहिल्याप्रमाणें सत्यनिष्ठा हाच गुण सर्वोत्कृष्ट आहे, व तोच कुंतीचा ज्येष्ठ पुत्र जो धर्म, त्याचे ठायीं मूर्तिमंत होता. श्रीसमर्थ व न्यायमूर्ति रानडे यांना जी कसोटी पसंत होती, ती हीच कीं, मनुष्याची किंमत त्याचें आयुष्य सरलें कीं ठरते— आपलें कर्तव्यकर्म करतां करतां मरावें, तरच नरजन्मास यावें. ही समजूत भारतकाळांतहि आहे अशीच होती. धर्मराज याच समजुतीस धरून अखेरपर्यंत वागले असें व्यासमुनि ह्मणतात. वनपर्व, महाप्रस्थानिकपर्व, व स्वर्गारोहणपर्व यांत इंद्रानें त्यास देवत्व व स्वर्गवास मिळू देण्यापूर्वी त्याची तीनदां परीक्षा पाहिलेली आहे, व त्याच्या

गुणांचा असा गौरव केला आहे—हे धर्मराजा, तूं सत्पात्र, ज्ञानी, व दृढनिश्चयी आहेस. तुझा विश्वास, तुझा सद्गुण, तुझी क्षमा, तुझी सत्यनिष्ठा व तुझा मनोनिग्रह पूर्ण आहे. मी तुझी प्रचीति तीनदां पाहिली आहे. 'द्वैत' वनांत, सुंदर सरोवराचें थंड व गोड पाणी आणण्यास पाठविलेले नकुल, सहदेव, अर्जुन, व भीम हे तेथील यक्षाची परवानगी न घेतां आपली तहान भागवितांच निश्चेष्ट पडले. तूं मात्र त्या यक्षाचे सवालास योग्य जबाब देऊन, त्याचें समाधान केलेंस. त्या यक्षानें वर मागण्यास सांगितलें असतां, तूं आपल्या सख्या भावास (भीमार्जुनास) उठविण्याची विनंति न करतां, नकुलास उठविण्याकरतां विनविलेंस. याचें कारण विचारतां, तूं सयुक्तिक उत्तर दिलेंस, तूं ह्मणालास कीं मला कुंती व माद्री या दोन्ही आया सारख्या आहेत. मी जगल्यामुळें कुंती पुत्रवती आहे तसा नकुल जगल्यामुळें माद्री पुत्रवती व्हावी! या तुझ्या सत्योक्तीनें खुष होऊन त्या यक्षानें तुझे चारही भाऊ सजीव केले, तो वेषधारी यक्ष मीच!

नंतर हिमवानपर्वताच्या मध्यभागीं ज्या मेरुपर्वतश्रेष्ठाचे शिखरावर स्वर्ग आहे व ज्याचे पायथ्याशीं मृत्युवत् भयाण वाळवंट आहे, त्यांतून जात असतां, द्रौपदी, नकुल, सहदेव, अर्जुन, भीम हे एकएक आपापल्या कर्मानुसार गळत गळत अखेर तूं व तुझा कुत्रा हेच कायते मेरुशिखरावर न डगमगतां, मागें न पाहतां, टिकलांत! तेव्हां मी तुझ्या कुत्र्यास स्वर्गांत घेण्यास हरकत केली. मी ह्मटलें कुत्र्यासारख्या अपवित्र प्राण्यानें स्वर्गस्थ जन भ्रष्ट होतील. शिवाय स्वर्गप्रवेश करणारानें शुद्ध असें यावें. ह्मणून त्या कुत्र्याला मागें राहूं दे. नाहीं तरी तूं आपली बायको व भाऊ यांना वाटेंत सोडून दिलेंसच. मग कुत्र्याचीच तुला एवढी तरफदारी कशाला हवी? त्यावर तूं मोठ्या मार्मिकपणानें उत्तर दिलेंस कीं मृतास कोण उठवूं शकेल? मी जरी मागें वळून त्यांकडे पाहिलें असतें तरी कर्मानुसार गत झालेल्यास माझा कांहीं उपयोग झाला नसता. ह्मणून मी त्यांच्याकडे वळून पाहिलें नाहीं. आतां

शरणागतास मारणें, स्तनपान करणाऱ्या पत्नीवर हत्यार उपसणें, ब्राह्मणाचें धन बळकावणें, व जुन्या मित्रास दुखवणें हीं चार महापातकें आहेत. पण आपत्तींतून उच्च पदास चढल्यावर एकाद्या अत्यंत गरीब सेवकास अंतर देणें हें पातक त्या चारहि महापातकांहून अधिक घोर आहे? हें तुझें भाषण ऐकून मला संतोष झाला. व लगेंच त्या कुत्र्याचें रूपांतर होऊन तो दिव्य यमधर्म झाला! तेव्हां तूं मानमान्यतेनें स्वर्गारोहण केलेंस!

अखेर दुर्योधनासारखा रणांगणीं पतन पावलेला व स्वर्गांत शुद्ध झालेला राजा पाहून तुला त्याच्या पूर्ववर्तनाची आठवण झाली व तुला असें वाटूं लागलें कीं, याच्यासारखे मूळचे दुष्ट पुरुष जर स्वर्गांत येऊन राहतात तर आपली सद्गुणी द्रौपदी, नकुल, सहदेव, अर्जुन, व भीम येथें कां राहूं नयेत? त्यांच्याशिवाय तुला तें स्वर्गसुख विषवत् वाटूं लागलें व तूं लगेंच त्यांच्या शोधार्थ नरकाप्रत पावलास. तेथील भयानक किळसवाणी स्थिति पाहून व आपल्या इष्ट जनांचा करुणाविलापरव ऐकून आपल्या सहवासानें त्यांच्या त्या हीनदीन स्थितींत त्यांस यत्किंचित् सुख वाटतें असें पाहून तूं त्यांच्या बऱ्याकरितां आपलें स्वर्गीय सुख विसरून तेथेंच राहण्याचा निर्धार केलास! ही तुझी सत्यनिष्ठा पाहून मी सर्व देवांसह तेथें येऊन तुला ह्मणालों कीं, राजांना नरक पहावा लागतो. प्रत्येक मनुष्याचे चरित्रांत पापपुण्य असतें. पापाबद्दल नरकवास व पुण्याबद्दल स्वर्गवास प्राप्त होतो. व आह्मीं तुला गंगेचें स्नान घालून दिव्य देह दिला व येथें तुझ्या मूळ इच्छेप्रमाणें तुझे प्रिय बंधु व पत्नी यांचा चिरलाभ तुला होत आहे!

धर्म हा यावरून सत्यनिष्ठपणाचा पुतळाच होता असें स्पष्ट होतें. तसाच मद्रराजसुता सतिश्रेष्ठ सावित्री हिनें अंतःकरणापासून वरिलेला चाल्वराज्यभ्रष्ट द्युमत्सेन राजाचा मुलगा 'सत्यवान्' हाहि जबरदस्त सत्यनिष्ठ असे. नारदमुनि त्याविषयीं असें ह्मणतात कीं, "तो सत्यनिष्ठ मातापितरांचा सत्यनिष्ठ पुत्र असल्यामुळें, ब्राह्मणांनीं जन्मकाळींच

त्याचें ‘ सत्यवान् ’ असें नांव ठेविलें होतें ! ” विदर्भ देशच्या भीमराजाची सर्वगुणसंपन्न लावण्यवती कन्या दमयन्ती हिनें इंद्र, वरुण, अग्नि व यम यांसारख्या देवाधिदेवांना टाकून ज्यास वरिलें तो वीरसेनसुत निषधदेशपति नलराजाहि तसाच सत्यनिष्ठ अतएव ‘ पुण्यश्लोक ’ होता. अशीं सत्यनिष्ठ राजांचीं उदाहरणें अनेक देतां येण्यासारखीं आहेत. व ‘ यथा राजा, तथा प्रजा ’ या न्यायानें तत्कालीन नीतीचा अंदाज करतां येण्यासारखा आहे. आतां सत्यनिष्ठा ज्या मानानें लोकांत असेल त्या मानानें त्यांत कर्तबगारीहि असते. वर ज्यांचा उल्लेख केलेला आहे, ते तसे पराक्रमीही होऊन गेले आहेत. त्यांस ‘ नरसिंह ’ ह्मणण्यास कोणतीच हरकत नाहीं. त्यांचे अंगीं धैर्य व शौर्य यथास्थित होतें. ते मेलेल्या आईचें दूध पिणारे नव्हते. त्यांचा आयुष्यक्रम ह्मणजे मनगटाचे जोरानें, कपाळाचे घामानें, लकलकणाऱ्या समशेरीनें झळकत होता ! ते कधीं दुसऱ्याचे ओंजळीनें पाणी पिणारे किंवा ताटाखालच्या मांजराप्रमाणें घाल तेवढेंच खाणारे नव्हते. त्यांवर आपत्ति आली तरी त्यांच्या मानीवृत्तींत काडीइतका चलबिचल होत नसे. ते थोर मनाचे होते. ते मानधन होते. आवडत्या विषयाचा लळा मोठा चमत्कारिक आहे. मन नाठाळ गुराप्रमाणें त्याकडे ओढ घेत असे. धर्माचें वर्णन एकदां होऊन गेलें तरी त्याच्याकडे फिरून शोधक बुद्धीनें पहावेंसें वाटतें. धर्म हा, न्याय व कर्तव्यकर्म यांचा पुतळा होता. त्यास ‘ अजातशत्रु ’ ह्मणजे सर्व जगाचा सोयरा ह्मणत एवढा तो उदार होता. शिबिराजाचेंहि औदार्य असेंच अवर्णनीय होतें. कपोतरूपधारी अग्निदेवतेचें श्येनदेही इंद्राचे हातून तितकेंच आपलें मांस काढून देऊन शिबीनें रक्षण केलेलें पुराणांतरीं लिहिलेलें आढळतें. बलीच्या औदार्याची पराकाष्ठाच झाली होती त्यानें आपल्या औदार्यापायीं आपला नाशहि करून घेतला. वामनावतारीं त्याच्या दानातिरेकास प्रतिबंध करण्याकरतां बटुरूपधारी ईश्वरास त्रिपादभूमिदानाच्या मिषानें त्या सत्यसंध, दानशूर महात्म्याला पाताळ दाखवावा लागला. देवांत महादेव जो शंकर तो खरोखरच भोळा शंकर असे. त्यानें प्रत्यक्ष आपली बायको

पार्वती आपला प्रिय भक्त जो रावण, लंकापति त्यास दिली होती; तसेंच भस्मासुरासारख्या केसानें गळा कापणाऱ्या राक्षसास ज्याच्या डोक्यावर 'हात ठेवशील, तें भस्म होईल' असा भोळ्या भावानें वर दिला होता; एवढेंच नव्हे, स्वताच्या जिवाकडे न पाहतां केवळ परहितार्थ त्यानें एकट्यानेंच काय तें हालाहालासारखें भयंकर विष प्राशन केलें होतें व एवढ्या एका गुणावरूनदेखील त्यास 'महादेव' हें नांव यथार्थ लागू आहे. सारांश आपल्या राष्ट्रांत जे नैतिक गुण वास करीत होते, ते कोणते; त्यांचें उद्दीपन कोणत्या ग्रंथपठणानें व आचरणानें होईल; त्यापासून सध्यांची ग्लानि, अविश्वास, कलह, अवनति या व्यसनपरंपरेचा नायनाट होऊन, आपली पूर्वींची वृत्ति कशी जागृत होऊन, आपण उन्नतावस्थेस पोंचूं; या तऱ्हेचें शिक्षण आईबापांना आपल्या मुलांस कसें देतां येईल याचा विचार झाला.

आतां शिक्षणाचा चौथा व अखेरचा भाग ह्मणजे धर्मशिक्षण हा उरला. नुसतें आईबापांनीं मुलाचें शरीर धणधाकट बनविलें, त्यास कालमानाप्रमाणें विद्या दिली, नीतिशुद्ध आचरण कसें असतें तें आपल्या उदाहरणानें त्यास दाखविलें व त्याचें अनुकरण करण्यास लावून तें त्याच्या मनावर पूर्णपणें ठसविलें ह्मणजे झालें असें होत नाहीं. एवढ्यानें फार झालें तर, मुलास ही जीवयात्रा सुखानें करतां येईल. पण त्याचे मनास कांहीं गहन प्रश्न एकसारखे छेडीत असतात. त्यास वाटत असतें कीं, ह्या क्षणभंगुर तनूबरोबर मनाची पण इतिश्री होणार काय? कां हें त्यामागें राहणार? हें मन मन ह्मणजे आहे तरी काय? पृथ्वी, आप्, तेज, अग्नि, वायु, या पंचमहाभूतांचा कोणी कर्ता आहे काय? असेल तर तो कसा आहे? ज्ञेय कीं अज्ञेय? अशी त्याचे मनाची सारखी तळमळ चालू असते. त्याची स्थिति कार्लाइलच्या कल्पित 'ट्यूफल्सड्रॉक्' प्रमाणें

'दोलाचलचित्तवृत्तिः'

अशी होते. मात्र, जसजसा त्याचा व्यासंग, प्रवासजन्य विस्तृत अनुभव व मनाची परिपक्वता हीं वाढत जातात, तसतसा त्याचा नास्तिक-

वाद व संशयवाद लयास जाऊन, तो सेश्वरवादी बनत जातो. ही जी विचारक्रांति, तिलाच धर्मशिक्षण ह्मणतात.

अशा धर्मशिक्षणांत मुलांस आईबापांनीं कोणत्या तऱ्हेची मदत करावयाची तें आतां आपण पाहूं. आईबापांनीं प्रथम मुलांस वर्णाश्रमाची व्यवस्था समजावून सांगावी. त्यांनीं त्यांच्या मनावर गृहस्थाश्रमाची थोरवी ठसवावी. नदीनद जसे सागरास येऊन स्थिर होतात, तसे ब्रह्मचर्य, वानप्रस्थ, व संन्यास यांस गृहस्थाश्रमापासून आश्रय मिळून स्थैर्य प्राप्त होतें. असा श्रेष्ठ आश्रम पाळीत असतां, प्रत्येकानें जो धर्म अट्टाहास करून पाळला पाहिजे, त्याचीं दहा लक्षणें आहेत. तीं येणेंप्रमाणें:—

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः।
धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥

—मनुः ७-९२

पण हीं दहा लक्षणें मागें आलेल्या शारीरिक, बुद्धिविषयक, व नैतिक शिक्षणानें संपादतां येणारीं आहेत, तेव्हां त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण दिसत नाहीं. सांगण्याची गोष्ट एवढीच कीं, धर्मशिक्षण ह्मणजे पर्यायानें आत्मोन्नति व तदंगभूत ईश्वरसाक्षात्कार हा होय.

आतां, आत्मोन्नतीचा राजमार्ग ह्मणून, मुलें वयांत आल्यावर, आई-बापांनीं त्यांस ‘ अंतर्मुख ’ किंवा ‘ अंतर्दृष्टि ’ होण्यास शिकवावें. यास उत्तम साधन ह्मणजे प्रत्येक मुलास आत्मचरित लिहिण्याची संवय लावून देणें हें होय. त्यांत क्षुल्लक गोष्टींची रेलचेल होऊं देतां कामा नये. ताजमहालासारखी अजब इमारत बांधीत असतांना, तिचा चुना कोठें कुटीत होते; तिच्या पराच्यांना किती लांकूड लागलें; किंवा त्या अवधींत यमुनेला कितीदा पूर आला होता; या भाकड कथा ताजमहाल वर्णनांत विषयांतर नाहींत तरी निरस व फुकट आहेत.

मुलांनीं आपल्या गत गोष्टींचें विवेचन करतांना, इतिहासांत शोभ-ण्यासारख्या ठळक ठळक गोष्टी; त्या घडल्या त्यावेळचे आपले मनो-

विकार; तेव्हांचीं आपलीं मतें व संवयी; त्यांत आजपर्यंत कसकसे फेरफार झाले व त्यावरून आपणांस सांप्रतची स्थिति कशी प्राप्त झाली यांचें त्यांनीं यथातथ्य वर्णन केलें पाहिजे. आरंभीं आपलें मन शुद्ध असो कीं अशुद्ध असो; एवढें बरीक खरें कीं, आज जें आपलें मन बनून तयार झालेलें आहे, आज जो आपला स्वभाव दिसत आहे, त्यांत पुष्कळ वर्षांतील पुष्कळ गोष्टींची भर पडलेली आहे, आणि ही भर कसकशी पडत गेली हें पाहिल्यानें, ती किती उपयोगाची आहे, तींत सळमेळ किती आहे, व ती सर्व जशीच्या तशीच टिकण्यासारखी आहे हें मुलांच्या मनावर आईबापांनीं बिंबवून दिलें पाहिजे. मुलांस आपल्या जीवश्चकंठश्च स्नेह्यांचें अथपासून इतिपर्यंत वृत्त जाणण्याची उत्सुकता असते; व त्यावरून त्यांस त्यांची किंमत करतां येते. पण याहूनहि आपली स्वताची किंमत करतां येणें हें मुलांस किती महत्त्वाचें आहे?

पण इकडे पहावें तों आईबापांचा ओढा अगदीं कमी कमी होत आहे. खिशांतील घड्याळाच्या रचनेविषयीं जशीं मुलें अज्ञ असतात, त्यांचें सारें लक्ष घड्याळ्याच्या तबकडीकडे, तीवरील आंकड्याकडे, व लहान मोठ्या कांट्यांकडे असतें; तसें त्याचें लक्ष त्यांच्या मानसिक रचनेकडे नसतें; त्यांस मनांत उसळणाऱ्या जळफळींत विकारज्वालेचा चटकाच काय तो बसतो. मुलें कितीहि मोठमोठाल्या चळवळींत गर्क असलीं किंवा तीं कितीहि शोधकबुद्धीनें इतर कामें करीत असलीं तरी तीच रडकथा. त्यांनीं जन्मभर सर्व हिंदुस्थानदेश फिरून पालथा घातला नव्हे पृथ्वीप्रदक्षिणाहि केली, ठिकठिकाणचें खोदीव काम लक्षपूर्वक पाहिलें, तरी ज्या पद्धतीनें मनावर संस्कार होतात व जिनें तेथून ते नष्ट होतात, त्या पद्धतीचें त्यांस वारेंहि नसतें. त्यानीं पन्नचासारख्या हिऱ्याच्या खाणी खोल जाऊन पाहिल्या तरी त्याहून अधिक मूल्यवान् हिरा ज्यांत दडलेला आहे असें त्याचें खोल मन त्यांनीं पाहिलेलें नसतें. त्यांना बंगाली, हिंदुस्थानी, पंजाबी, सिंधी, गुजराथी, कानडी, तामिळी, तेलगू इत्यादि अवांतर देशीभाषांत बोलतां चालतां आलें, तरी ज्या भाषेमुळें त्यांस अंतर्ज्ञानें

होईल अशी भाषा तर त्यांस येतच नाहीं. राजदरबारांत काय चाललेलें आहे; व्यापारउदीम यांची काय हालहवाल आहे; यांची त्यांस चर्चा करतां येते. पण आपल्या मनाची स्थिति होती कशी, आहे कशी, होणार कशी याविषयीं त्यास वास्तपुस्तहि नसते.

तेव्हां त्यांस जर अंतर्मुख होण्याची संवय आईबापांनीं लावून दिली तर त्यांचा बराच कार्यभाग पार पडणार आहे. शाळांतून हें काम पूर्वीं होत असे. कारण तेव्हां गुरुगृहींच शिष्यांचा वास असे. सध्यां जर पंजाबांतील जीर्णोद्धार केलेल्या गुरुकुलसंस्थेसारख्या संस्था निघतील, तर शाळांतूनहि या दिशेनें शिक्षण मिळण्यास सवड होईल. असो.

मुलांचे जे असंख्य मनः संस्कार लुप्तप्राय होत जाणार, त्यांचें त्यांस चर्वितचर्वण करूं दिल्यानें, वामनपंडितांनीं जशीं आपल्या प्रियगिरेस

बळख तूं तुज टाकुनि मीपणा!

' प्रियसुधा ' पाजिली होती, तशी कांहीं वेगळी खटपट आईबापांसही करावी लागणार नाहीं. तर त्यांना आपण कसे होतों कसे आहों व कसे होणार याचा पडताळा पाहतां येईल. असे अनेक प्रसंग त्यांवर गुदरतात कीं, त्यांत त्यांस आपल्या स्वभावाची चुणूक तेव्हांच लागते. आपले गुणदोष कोणते आहेत हें त्यांस तेव्हांच समजतें, पण खेदाची गोष्ट ही कीं, आईबाप त्यांना त्या प्रसंगांत व त्यामुळें उद्भवणाऱ्या मनोविकारांत इतके चूर राहूं देतात कीं, तीं आपल्या कर्तव्यास पूर्ण मुकतात. असा गाफिलपणा कदाचित् पोरवयास शोभेल. पण पोक्तच्यापुरवत्यांना तो मुळींच शोभणार नाहीं. त्यांनीं स्वतः अंतर्मुख होण्याची संवय न उचलल्यामुळेंच त्यांच्या मुलांना त्याचीं कडू फळें भोगावीं लागतात. आईबापांनीं ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

काय लहानपण येइल पुन्हां?
दरवर्षीं जशीं फुलें पुन्हां!

हें ह्मणणें जितकें सोपें आहे, त्याहून अधिक कठीण तशी करणी करणें आहे. मोठेपणीं बालपणींच्या आठवणी मनांत आणून किती मुलांना आपला काळ सुखानें घालवितां येतो बरें?

ज्या कल्पनांनीं त्यांना बाळपणीं स्वर्गसुख प्राप्त होत असे, त्या अ ता मृतप्राय झालेल्या आहेत असें कितीजणांना वाटत असतें !

' जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे ।
मातृभिः पाल्यमानानां ते हि नो दिवसा गताः ॥ ' *

असें पदोपदीं किती तरी थोड्यांना भासत असतें ! पुष्कळ वर्षांनीं बाहेर गांवाहून आलेल्या प्रवाशानें जसें आपलें पहिलें झोपडें पडलेलें व वेलींनीं वेष्टिलेलें पहावें, तशी पूर्वात्मचरित्र लिहिणाऱ्या मुलांची स्थिति होते !

तरी (१) मन खुषींत असतां, मुलांस जें ठळक गोष्टींचें स्मरण होईल, त्यावरून त्यांस अंतर्मुख होण्यास शिकवितां येईल. (२) ज्या वस्तूशीं व ज्या स्थलांशीं त्यांचा पूर्वपरिचय असेल, त्या त्या त्यांस फिरून जाऊन पाहूं दिल्यानें त्यांची स्मृति जागृत होऊन त्यांस आपला इष्ट हेतु तडीस नेऊं देतां येईल. (३) ज्या जुन्या मित्राबरोबर त्यांची गट्टी असेल त्याशीं त्यांस सुखदुःखाच्या गोष्टी बोलूं दिल्या ह्मणजे त्याशीं त्याचा पूर्वसंबंध कसा होता हें त्यांच्या डोळ्यासमोर येऊन त्या मुलांस आपला कार्यभाग साधतां येईल. (४) ज्या पुस्तकांनीं आपणास चटका लावून दिलेला आहे, त्यासंबंधीं मुलांना लिहूं देणें हाहि एक तसाच उपाय आहे. (५) सृष्टिसौंदर्याचें निरीक्षण करून त्याचा परिणाम त्यांचे मनावर काय होतो हें त्यास नमूद करण्यास सांगणें ह्मणजे त्यांना तिकडचीच वाट दाखविणें आहे. (६) परलोकवासी इष्टजनांनीं आणीबाणीच्या प्रसंगीं किंवा मरणोन्मुख असतांना केलेला उपदेश आपले मनावर कितपत ठसलेला असेल तेवढ्याची त्यांस बारनिशी करून ठेवण्यास लाविलें पाहिजे. (७) ज्या समाजांत लहानाचे मोठे होत आहों, त्याचा लळा व वळण आपणास कसें व कितपत लागत आहे, हेंहि त्यांस नोंदण्यास शिकविलें पाहिजे.

वर लिहिलेल्या सात प्रकारांप्रमाणें या लेखकानें अंतर्मुख होण्याचा यत्न केलेला आहे, तो नुसता ' पुराणांतलीं वांगीं पुराणांत ' असें विधान

---

* ' खरोखर, ते आमचे दिवस गेले !— तेव्हां वडील हयात होते ; आमचें लग्न नुकतेंच झालें होतें ; व आमच्या आया आमचें पालनपोषण करीत होत्या !

करणाऱ्यांपैकीं आहे कीं काय हें कित्येक आईबापांना समजण्याची इच्छा असेल. तर ती तृप्त करण्याचे हेतूनें या लेखकाच्या अंतर्निरीक्षणाचा संक्षिप्त संगतवार वृत्तांत देणें येथें इष्ट आहे. प्रवेशपरीक्षेपर्यंत त्याची मजल येऊन ठेपली, तेव्हां त्याचे प्रियपितृव्यांनीं त्यांस दसरा दिवाळी इत्यादि आनंदाचे दिवशीं मनांत येणाऱ्या तरंगांचें वर्णन निबंधांत करून दाखविण्यास लावावें व हें काम त्याकडून मोठ्या उत्साहानें होत असे. पदवीची परीक्षा झाल्यावर ह्मणजे आणखी ४ वर्षांनीं बटलरचे उपदेशानुसार त्यानें केवळ स्वतःचेच उपयोगाकरतां एक आत्मचरित्र तयार केलें होतें. त्यांनीं त्यांस अजोळीं जाऊं देऊन पूर्वपरिचयांतील वस्तूंशीं व स्थलांशीं जडलेला त्याचा स्नेहसंबंध कायम राखिला होता. त्यांनीं त्यास आपल्या जुन्या दोस्तांशीं भेटूं दिल्यामुळें त्यांची फार दिवसांची मैत्री पूर्ववत् नवीच्यानवी राहिली आहे. शालोपयोगी नीतिग्रंथ पॉल व व्हर्जिनिया, इलिजाबेथ, मिसेस मेरिया एजवर्थकृत नैतिक कथा, शाकुंतलाचा चवथा अंक, चाणक्य नीतिसार इत्यादि बाळपणाच्या पुस्तकांचा असर त्याचे मनावर इतका पक्का झालेला आहे कीं, आपल्या धाकट्या भावास शिकविण्याकरितां, त्यानें तींच पुस्तकें निवडून त्यास शिकविलीं आहेत; व अजूनहि त्यास त्यांचा उपयोग लेखनव्यवसायांत कसा करतां येत आहे हें प्रस्तुत निबंधावरूनहि वाचकांचे लक्षांत येणार आहे. सृष्टिसौंदर्यनिरीक्षणाचा लाभ त्याचे प्रियपितृव्यानें त्यास बरोबर फिरावयास घेऊन गेल्यामुळें व त्यास मित्रमंडळीबरोबर जाऊं दिल्यामुळें होत असे. यास सुमारें एक तप उलटून गेलें आहे तरी, या सृष्टिशिक्षणाचा परिणाम त्याची कल्पनाशक्ति प्रज्वलित करण्यांत व त्याची पैत्रिक काव्यशक्ति जागृत करण्यांत कसा झाला आहे हें त्याच्या त्यावेळच्या ' कमलिनी ' या अप्रसिद्ध छोटे पुस्तकावरून व कवितांवरून व्यक्त होत आहे. ' कमलिनी ' तील कल्पनाकमलांचें त्यास अद्यापिहि राहून राहून आश्चर्य वाटतें कीं, असे नवे नवे विचार त्यावेळच्या अत्यंत कोंवळ्या डोक्यांतून कसे निघाले असावेत. त्यांतील कांहीं वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्याचेंहि व एक दोघांचे उतारे इतर

पत्रांनीं घेऊन त्यांचा गौरवहि केल्याचें आतां आठवतें. 'कवितां' ना प्रथम प्रियपितृव्यांचें अत्यंत कळकळीचें उत्तेजन, नंतर दक्षिणा-प्राईझकमिटीसारख्या विद्वद्रत्नांकडून अल्पपारितोषक मिळालेलें असल्यामुळें व कांहीं ठिकाणच्या शाळाखात्यांतून त्यांस आश्रय मिळाल्यामुळें, त्यांवर त्याचा चरितार्थ चालत नाहीं, किंवा तत्प्रीत्यर्थ केलेल्या श्रमाचा मोबदला मिळत नाहीं किंवा त्याकरतां झालेला खर्च भागत नाहीं, तरी त्यांस आपला फुरसतीचा वेळ स्वर्गसुखांत इंद्राचे नंदनवनांतील मंदारासारख्या कल्पवृक्षछायेखालीं घालविण्यास तें एक उत्तम साधन झालेलें आहे.

भीष्माचार्यांनीं शरपंजरीवर देह असतांना, जसें नातवांस 'अनुशासन' केलेलें आहे, शिवाजी महाराजांनीं मरणोन्मुख असता, जसा संभाजीस उपदेश केलेला आहे, रॉबिन्सन् क्रूसोचे वृद्ध वडिलांनीं, गुडघीनें मृत्युपंथास लागलेले असतांना, जशी त्यास व्यवहारदीक्षा दिलेली आहे, तशी या लेखकाचे प्रियपितृव्यांनीं, मधुमेहानें दिवसेंदिवस शरीर क्षीण होत असतां व उमेद खचत असतां त्यास गृहस्थाश्रमांत पाऊल टाकतेवेळीं स्वतः अजमावलेला असा लाख रुपयांचा जगाचा अनुभव सांगितलेला आहे. तो त्यानें तत्काळ आपले रोजनिशींतच नव्हे तर आपले हृदयमंदिरांत बसवून ठेविला आहे. इतर आणीबाणीच्या प्रसंगीं त्यास हितचिंतक या नात्यानें उपदेश केलेला आहे. या सर्वांचा त्यास वेळोवेळीं फार उपयोग होत असतो. पण प्रथमचा प्रियपितृव्यांचा गुरुमंत्र हा खरोखरच दुर्मिळ असा असल्यामुळें त्याची थोरवी त्यास कांहीं आणीकच वाटते.

आतां ज्या समाजांत हा लेखक लहानाचा थोर झाला असल्यामुळें, त्याचा लळा व वळण यास कसकसें लागत गेलें आहे याचा प्रसंगोपात्त उल्लेख त्यानें आपले रोजनिशींत लिहून ठेवण्याचा सराव सुरू केल्यास आज एक तप उलटून गेलेलें आहे. तेव्हां व्यक्ति व समाज यांतील निकट संबंध त्यास बराच समजल्यासारखा वाटत आहे. व्यक्तिसुधा-

रणा व समाजसुधारणा या गोगलगाईचे गतीनें झाल्या, तरी अखेरीस त्यायोगें इष्ट हेतु तडीस जातो. नव्हे, अशी गजगतीच त्यांच्यासारख्यांस शोभते. त्रिकाळ स्नानसंध्या, प्रातरध्ययन, ब्रह्मचर्य, चहाकाफीपेयाचा निषेध, व्यायाम, साधी राहणी व थोर विचारसरणी या जुन्या पण उपयुक्त संवयींचा उद्धार करतांना या लेखकास कुटुंबांतील माणसांचा, नगरांतील जनांचा व इष्टमित्रांचा बराच उपहास सोसून आपला क्रम तसाच आजपर्यंत यथाशक्ति चालू ठेवावा लागला आहे. या उलट या लेखकावर संसारांतील अनेक जिवावरचे प्रसंग येऊन पडले असतां प्रथम त्याच्या जिव्हाळ्याच्या माणसांनीं व इष्टमित्रांनीं, गणगोतांनीं व एकंदर समाजानें जी सहानुभूति दर्शविली, त्याबद्दल त्यास आपली कृतज्ञताबुद्धि प्रकट करण्याचें मनांत शंभरवेळां येत असतें, तेव्हां पन्नासवेळां तरी तो तसे उद्गार लेखद्वारें काढीत असतो.

असो. याप्रमाणें जय्यत तयारी करवून घेतल्याशिवाय मुलांस धर्मज्ञानासारखा गहनतम विषय आकलन करतां येणार नाहीं. धर्म म्हणजे काय, भक्तीचें फळ काय आहे, परमेश्वरकृपा कशांत आहे हें आतां मुलांचे मनांत ठसवितां येईल. सध्यांच्या यांत्रिकयुगांत जो तो ऐहिक व्यवसायांत चूर असलेला दृष्टीस पडतो.

‘ चक्षुर्वै सत्यम् ’

या न्यायानें त्यास सर्व आपल्या व्यवहार चालावा असें वाटतें. पंचज्ञानेंद्रियें हीं जशीं आपापलीं कर्में सुरळीत करीत आहेत, तशीं अध्यात्मिकज्ञानग्राहक जी मानसिकशक्ति, भक्ति ती सर्वत्र निद्रिस्त दृष्टीस पडते. फास्टर * व कार्लाइल + यांची जशी ही समजूत सुधारलेल्या जगांत झालेली आहे, तशी मराठीशाहींत तुकाराम व रामदास यांची पण झालेली आहे.

---

* “ Fosters Decision of character and other Essays” (शीलनिर्णय व इतर निबंध) पहा.

\+ सार्टर रिसार्टस (Sartor Resorfus) हें पुस्तक पहा.

आतां परमेश्वर अनंतशक्ति असतां त्याचे दर्शनास भक्तिराहित्याचा आडपडदा कां असावा? पण अशा अधार्मिकपणाचा सुळसुळाट इतका झालेला आहे कीं त्याचा नायनाट करण्याकरितां परमेश्वराने दशावतार घेतले व पुढें तसेच तो घेणार आहे. भगवद्गीतेंत भगवंतांनीं असेंच ह्मटलें आहे:-

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥

या परमेश्वराचे प्रचंड वक्तृत्वानें मृत मनुष्यहि खडबडून जागा होईल! त्याचा प्रताप आकाशींच्या विजांचा कडकडाट व लखलखाट, मेघांचा दणदणाट, अंधारमय रात्रींच्या वाऱ्यांचा झणझणाट, यांनीं मनुष्यकीटक केव्हांच भेदरून जाणार! एवढें कल्पनेचें जोराचें उड्डाण नको असल्यास इतकें ह्मटलें कीं पुरें आहे कीं, जर मनुष्य सत्संगतींत राहिला तर तो निवळतो, जर कुसंगतींत राहिला तर तो बिघडतो. तरी सर्वव्यापी परमेश्वर सदा आपले आसपास असतां आपणावर त्याचे संगतीचा परिणाम कां होत नाहीं? श्रुतिस्मृतिपुराणें, रामायण, महाभारत, भागवत वाचून किंवा बद्रिकेदार, काशीविश्वेश्वर किंवा सेतुरामेश्वर यांचें देवदर्शन घेऊन जर मनुष्याचे वृत्तींत पालट होतो, तर परमेश्वराचे प्रत्यक्ष सान्निध्यानें आपल्या वृत्तींत मुळींच पालट कां होऊं नये हें आईबापांस मुलांना समजावून सांगणें जरा जड वाटेल; पण त्याचा त्यास बाऊ वाटायला नको. मनुष्य जर ईश्वराविषयीं बेपर्वा असेल तर त्यावर ईश्वरी कृपा कशी होणार! भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं असाच भाव दर्शविला आहे. ते ह्मणतात:—

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।

श्रीरामकृष्ण परमहंस या वचनांची फोड करतांना असें लिहितात कीं, कांचेवर रसायनाचा लेप लाविल्याशिवाय जसें तेजोलेखनक्रियानुसार चित्र उमटत नाहीं, तसें मानवी अंतःकरणावर भक्तिरसायनाचा लेप लाविल्याशिवाय, त्यावर प्रभूची प्रतिमा उमटत नाहीं. असा थोड-

क्यांत भक्तियोग आहे. आतां, ज्ञानयोग संक्षिप्तपणें असा आहे. कार्यकारणभावाप्रमाणें सृष्टीचा कर्ता परमेश्वर आहे. त्याविषयीं जसा खोल विचार करावयास हवा, तसा कधीं आपण करतों काय? अशा गहन विषयावर चांगला विचार केला असतां, तो वरचेवर मनांत घोळल्याशिवाय रहाणार नाहीं. एखाद्यानें ताजमहाल एकदां पाहिला असला, तरी त्याचें तें अप्रतिम सौंदर्य, त्याचे चबुत्र्याशीं असलेलें तें यमुनेचें चंद्रभागेसारखें वळण, त्याचे आसपासचा तो भव्य बादशाही बाग; याचें स्मरण त्यास वरचेवर झाल्याशिवाय रहाणार नाहीं. वेदकालीन ऋषींस ' द्रष्टे ' व वाल्मीकिव्यास यास ' दिव्य ' पुरुष ह्मणत ते उगीच नाहीं. व्यासाविषयीं तर अद्यापि अशी दंतकथा प्रचलित आहे कीं, त्यास नामस्मरणाचा इतका छंद असे कीं, झोंपेंत देखील त्याचें बरळणें ईश्वराविषयीं असे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव तुकाराम, रामदास इत्यादि साधुसंतांचा असाच व्यवसाय असे. नामदेव व तुकाराम यांस तर ईश्वर' साक्षात्कारहि होत असे असें ते आपल्या अभंगांत ह्मणतात. *

दुसरें असें कीं, आपल्या मनांत हजारों ऐहिक विचारांचें काहूर माजलेलें असतें. यामुळें आपण ' चिद्घनकाय ' असे कधींच बनत नाहीं. आपणास माशा मारीत बसणेंच आवडतें; पण सच्चिदानंदमय तत्वमसि असें बनणें आकडत नाहीं. आपणास द्वैत आवडतें; पण आपणास अद्वैत आवडत नाहीं. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, फलाची अपेक्षा न करतां कर्म करणें व भक्तिमार्ग यांत

\+ " अवघी चित्तवृत्ति एकवटुन जेणें । अवघा धरिला मनें । पांडुरंग ।
अवघें सुख एक तयासि पावलें । अवघें सफळ झालें । जन्म त्याचें! "
--नामदेव

" भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश । निवारूनी!
विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे जन धन । माता पिता!
निर्वाणीं गोविंद अस मागें पुढें । कांहींच सांकडें । पडों नेदी!
तुका ह्मणे सत्य-कर्मा व्हावें साह्य! । असत्यासि भय । नरका जाणें!

भेद मुळींच नाहीं. नुसता ज्ञानमार्ग, नुसता कर्ममार्ग किंवा नुसता भक्तिमार्ग दुर्लभ आहे. पण यांचें प्रमाणशुद्ध मिश्रण सुकर आहे. त्यामुळें 'एकपंथ दो काज' असा प्रकार होऊन प्रपंच व परमार्थ हीं दोन्हीं साधणार आहेत. व हाच मार्ग, हीच भागवती कल्पना, आपणा संसारी जनांस साध्य आहे असें न्यायमूर्ति रानडे, डॉक्टर देशमुख व रा० रा० टिळक यांसारखे महाबुद्धिमान् लोकाग्रणी अद्यापि ह्मणत आहेत.

या उलट स्वामी विवेकानंद* 'आत्म्यास निर्बंध नाहीं' या वेदान्तपर व्याख्यानांत वेदान्त किंवा अद्वैत मत स्वीकारण्याचा उपदेश प्राच्य-पाश्चात्य राष्ट्रांस करीत आहेत. त्यांचें ह्मणणें असें कीं, द्वैतमतानें मनुष्याचे अंगीं नामर्दपणा शिरतो; पण अद्वैतमतानें तो मर्द बनतो व सध्याच्या घनघोर जीवनकलहांत मर्दुमकीची अत्यंत जरूर आहे. तेव्हां अद्वैतच सध्यां ग्राह्य आहे.

सारांश निरिच्छ सत्कर्म करून भक्तिभावानें परमेश्वरसाधर्म्याचें चिंतन करण्याची संवय आईबापांनीं मुलांस संध्यादि प्राथमिक पाठांवरून लावून दिली कीं त्यांचें धर्मसंबंधीं शिक्षण सुरक्षित चाललें असें होईल. तेव्हांच मुलांना आपल्या प्राचीन अमोल धर्मतत्वांची किंमत कळूं लागेल. तेव्हांच त्यांची भावी संसारयात्रा सुखानें होईल. तेव्हांच त्यांच्या मनास सुख-शांति वाटेल. तेव्हांच त्यांस हें समजूं लागेल कीं--

× यं शैवाः समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदान्तिनो
बुद्धा बौद्ध इति प्रमाणपटवः कर्तेति नैय्यायिकाः ।
अर्हन्नित्यथ जैनशासनरताः कर्मेति मीमांसकाः
सोयं नो वितरं ददातु शतशं त्रैलोक्यनाथो हरिः ॥

---

* ग्रंथमाला अंक ११२

× "ज्याची शैव शिव ह्मणून पूजा करितात; ज्यास वेदांती ब्रह्म मानितात; ज्यास बौद्धधर्मी बुद्ध ह्मणून मान देतात, ज्यास प्रमाणशास्त्रांत निष्णात नैय्यायिक कर्ता असें संबोधितात; ज्यास जैनधर्मपंडित अर्हन असें अत्यंत उच्चपद देतात; ज्यास मीमांसक कर्म लेखितात तो त्रैलोक्यनाथ आमचें कल्याण करो!"

(५) मुलांचें आईबापांविषयीं कर्तव्य काय आहे हा पांचवा प्रश्न आहे. ज्या आईबापांनीं मुलांस रजाचे गज केले, त्यांनीं स्वतःच्या पोटास चिमटा घेऊन, त्यांच्या काडीमात्रास धक्का न लागूं देतां सुखांत ठेविलें, त्यांस उत्तम शरीरसंपत्ति दिली, त्यांस विद्यामृत पाजिलें, त्यांच्या या अनंत व अवर्णनीय उपकारांबद्दल मुलांनीं त्यांची सेवा करून कृतज्ञता दर्शविणें हेंच मुलांचें मुख्य व एकुलतें एक कर्तव्य आहे. 'पुत्र' याची व्युत्पत्ति अशासारखीच दिसत आहे—संसारताप हा जर 'पुत्' नरक धरला, तर वृद्धापकाळीं पित्याचा तो ताप चुकविणारा ह्मणजे 'पुत्र' च होय.

† ययातिराजास वृद्धापकाळीं कामवासना उत्पन्न झाली होती. पण ती तृप्त करून घेण्याचें त्याचे अंगीं सामर्थ्य नव्हतें. तव्हां त्यानें आपल्या पांच मुलांस ही गोष्ट कळविली; व त्यांस विचारलें कीं, माझें वार्धक्य घेऊन आपलें तारुण्य मला देण्यास कोणी तयार आहे काय? यास कोणी कबूल होईना. शेवटीं कनिष्ठ पुत्र पुरु यानें तें पत्करिलें व हजार वर्षें त्या अप्रतिम पित्रभक्तानें आपलें तारुण्य आपले वडिलांस देऊन, तो स्वतः वृद्ध राहिला होता. आतां या अदलाबदलेसंबंधीं मंत्रप्रभाव आपल्या पिढीस माहित नसला, तरी वरील गोष्टीवरून पुरूची निस्सीम पितृभक्ति व्यक्त होते, ह्मणूनच कण्वमुनीसारख्या पुण्यपुरुषानें शकुन्तलेस पुरूसारखा पुत्र होण्याविषयीं आशीर्वाद दिला होता व तिचा 'भरत' असाच देशभूषण झाला कीं त्याचेंच नांव आज आपल्या देशास प्राप्त झालें आहे!

पुरूनें ययातिराजास एक हजार वर्षेंपावेतों आपलें तारुण्य उसनें दिलें होतें. पण भीष्माचार्यांनीं आपले वडील शंतनु नृप यांच्या नूतनसंबंधाचे संततीस गादी मिळावी ह्मणून नैष्ठिक ब्रह्मचर्य पत्करिलें होतें व शंतनूनंतर विचित्रवीर्य व त्याचीं मुलें धृतराष्ट्र, पांडु, विदुर यांचा प्रतिपाल यथास्थित केलेला होता.

---

† 'विष्णुपुराण' पहा.

पुरु व भीष्माचार्य यांचे उदाहरणावरून वडिलांचे सुखास्तव मुलांनीं कसा स्वार्थत्याग केला पाहिजे हें चक्क मनांत ठसत आहे. तसेंच आई-बापांनीं अमुक काम कर ह्मटलें कीं तें मुकाट्यानें मुलांनीं केलें पाहिजे; कारण

आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया

हें तत्त्व ज्याचे मनावर उत्कृष्ट रीतीनें ठसलेलें दिसत आहे असा जमदग्नीपुत्र परशुराम हा होय. त्यानें पित्याचे आज्ञेवरून आपली मानसिकपापभ्रष्ट माता रेणुका हिचें शीर उडविण्यास कमी केलें नाहीं. पुढें या त्याच्या आज्ञाधारकपणानें संतुष्ट झालेल्या जमदग्नीकडूनच त्यानें त्याच रेणुकेस उठविलें आहे हें सर्वश्रुतच आहेच! यांत जमदग्नी-सारख्या कडक तपस्व्यासदेखील आपला शब्द पुढें परत घ्यावा लागला आहे, ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. शहाणपण वयावर नसतें; किंवा दाढीवर नसतें. तसें असतें तर रोमन बादशहा सेक्सटसकडे स्पेनच्या दुसऱ्या फिलिपनें राज्याभिषेकोत्सवसमयीं मिश्रूड फुटलेल्या वकीलास न पाठवितां एका दाढीवाल्या बोकडासच पाठविलें होतें. पण ही गोष्ट दूरची झाली. आपल्या मनूनेंदेखील असें चक्क ह्मटलें आहे कीं—

+ न तेन स्थविरो भवति येनास्य पलितं शिरः ।
यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः ॥

पुरु, भीष्म, परशुराम, भरत यांनीं मागें सांगितलेल्या राम, धर्म, इत्यादिकांप्रमाणें आपली पितृनिष्ठा व्यक्त केली आहे. पण यावरून त्यांचें केवळ नैतिक धैर्य व स्वार्थत्याग दिसून येतो. पण भगीरथानें आपले ६०००० पितामह जे सगरपुत्र कपिलमुनींच्या शापानें दग्ध झाले होते, त्यांस पितृयोनींत पावन करून घेण्याकरतां ज्यानें कठोर

+ " ज्यामुळें या (मनुष्या) चे डोक्याचे केंस पिकतात, त्यामुळें तो ज्ञातारा होत नाहीं. जो तरुण मनुष्य विद्याध्ययन करीत असतो, त्याला देव वृद्ध असें समजतात."

तपस्या आरंभून स्वर्गीची गंगा आणिली! त्यांची पितृनिष्ठा कांहीं कमी नव्हती. गांधारीनें गजगौरीव्रत करून कुंतीस हिणवूं पाहिलें. पण जिचे ५ पुत्र १०० कौरवांहून सरस! तिनें पहा काय चमत्कार गांधारीस करून दाखविले ते! तिच्या एकट्या अर्जुनानें इंद्राचा ऐरावत आणून आपल्या मातुःश्रींचें गजगौरीव्रत जसें कोणी पाहिलें नव्हतें तसें दणक्यानें उडवून दिलें, व गांधारीस खासें परत वाण दिलें!

या व अशा अनेक उदाहरणावरून मुलें आईबापांचे शब्द झेलण्यास कसे एका पायावर तयार असत, व त्यांच्या अर्ध्या वचनांत कसें असत हें स्पष्ट होतें. असें जरी आहे, तरी आईबापांनीं कांहीं गैरशिस्त करण्यास सांगितलें, तर मुलांस त्यांची पराकाष्ठेची चीड येऊन, तीं त्यांस मुळींच जुमातीत नसत. कैकयी भरताचें राज्याभिषेकसमयीं अभिनंदन करूं लागली तेव्हां त्याची तळव्याची आग मस्तकास जाऊन, त्यानें तिचा कसा खरपूस समाचार घेतला आहे हें सुज्ञ वाचकांस अवगत आहेच. 'विकारविलसितां' त हॅमलेटनें जसें आपल्या जारिणी मातेस 'वैरिणी' असें यथाशास्त्र ह्मटलें आहे, तसेंच भरतानेंहि आपल्या पित्याचा पर्यायानें वध करणाऱ्या या कैकेयीस चक्क 'वैरिणी' ह्मटलें व तिला अगदीं खजील करून, रामाच्या पादुकाकरवीं कसें राज्य चालविलें हें विश्रुत आहे.

कयाधुपुत्र प्रल्हाद यास हिरण्यकश्यपुसारख्या असुरपित्यानें नामस्मरण करण्यास प्रतिबंध केला, त्यास हरतऱ्हेची 'समज' देऊन पाहिली. पण त्या पुत्ररत्नानें, कांहीं केल्या बापाचा शब्द मानिला नाहीं. त्यास जें कर्तव्य ह्मणून वाटत होतें, तें तो बेलाशक, जिवाची परवा न करतां करी, हें पाहूनच नृसिंहानें त्याची बाजू राखिली!

आईबाप गैर काम करण्यास सांगतील, तर तें मुलांनीं करूं नये. ह्यांत आईबापांची अवज्ञा होत नाहीं. तसेंच आईबापांनीं मूल निपजण्यापूर्वीं त्यांची कांहीं हयगय केली असेल, तरी तीं मुलांचे तोंडून दोषास पात्र होतात. अरुणानें आपली माता विनता हिला सापत्न-

मातुः श्री कद्रू हिची तूं दासी होशील असा शाप दिल्याचें पुष्कळांस माहीत आहेच. याचें कारण विनतेनें ज्या अंड्यांतून अरुण जन्मला होता, त्याचे दिवस पुरे होण्या पूर्वींच तें फोडिलें होतें. या आईच्या हयगयीमुळें बिचाऱ्या अरुणाचें जन्माचें नुकसान झालें होतें. त्यांच्या मांड्याच मेज्या होत्या. पण त्या शापानें विनता खिन्न होऊन त्याची प्रार्थना करूं लागली. तेव्हां त्यानें तिला उःशाप दिला कीं, माझा भाऊ गरूड जेव्हां स्वर्गीचें अमृत आणून तुला देईल, तेव्हां तूं त्या कद्रूच्या दास्यत्वांतून मुक्त होशील!

या फार प्राचीन काळच्या गोष्टी राहूं दिल्या, तरी अगदीं अलीकडील इतिहासांत अशीं उदाहरणें सांपडणार आहेत. पण स्थलसंकोचास्तव हें एकच बस्स. पुण्याचे जहागिरदार शहाजी राजे यांनीं पुण्यप्रतापी शिवछत्रपति महाराजांस लहानपणीं पुष्कळ सांगून पाहिलें कीं. मोंगलावर उठून हातची अर्धी भाकर घालविणें हें निव्वळ वेडेपण आहे. पण त्या सिंहाचे छाव्यास हें बोलणें कोठून रुचणार? ज्यास दादोजी कोंडदेव व रामदास, यांनीं पुराण कीर्तन श्रवणद्वारें महाराष्ट्रधर्म उत्तम पढविला होता, तो केवळ उठाठेवीचा असा तसा नव्हता. त्याचें बीज महाराजांच्या मनांत उत्तम रुजलें होतें. व त्यास ‘ गनीमी काव्या ’ नें मोंगलासारख्या अवाढव्य सत्तेस तोंड देतां येऊन मराठी राज्याची प्राणप्रतिष्ठा करतां आली. यांत शिवरायांनीं पित्राज्ञाभंग केला होता काय? असेल; पण त्याची मोठीशी किंमत नाहीं. कारण तसें करणें हें त्यांच्यासारख्या पुरुषांस कालमानाकडे दृष्टि दिली असतां शोभतें. त्यांचा असा स्वभावच आहे. भारवि या प्रसिद्ध संस्कृत कवीनें म्हटलें आहे

* किमपेक्ष्य फलं पयोधरान् । ध्वनतः प्रार्थयते मृगाधिपः
प्रकृतिः खलु सा महीयसः । सहते नान्यसमुन्नतिं यया ॥

* “ कोणत्या फळाची इच्छा धरून सिंह गर्जना करणाऱ्या मेघांची प्रार्थना करीत असतो! मोठ्यांचा स्वभावच हा आहे कीं, त्यांस दुसऱ्या प्रतिस्पर्ध्याची उन्नति सहन होत नाहीं. ”

(६) सहावा प्रश्न हा आहे कीं, प्राचीन काळापासून आईबापांची थोरवी केवढी होती. प्रस्तुत निबंधाच्या शिरोभागीं श्रुतिस्मृतिपुराणां-तील अवतरण म्हणून दिलेल्या शास्त्राधारावरून आपण आईबापांना कसें श्रेष्ठ मानीत आलों आहोंत याची चांगली कल्पना होते. वेदांत तरी त्यांस देवाप्रमाणें मान दिलेला आहे. मनुस्मृतींत तर त्यांची उच्चतम पदवी कळण्याकरितां असें कोष्टकच बसविलेलें आहे:—

१० उपाध्याय = १ आचार्य
१०० आचार्य = १ पिता
१००० पिते = १ माता.

(अ० २ श्लो० १४५)

मनूनें आणखी एका ठिकाणीं असें म्हटलें आहे:—

आचार्यो ब्रह्मणो मूर्तिः पिता मूर्तिः प्रजापतेः ।
माता पृथिव्या मूर्तिस्तु भ्राता स्वो मूर्तिरात्मनः ॥

आचार्य ही परमात्म्याची मूर्ति (शरीर) आहे; पिता ही ब्रह्मदेवाची मूर्ति आहे; माता ही पृथ्वीची—; सख्खा भाऊ ही आत्म्याची मूर्ति आहे.

(नि० सा० प्रत)-अ० २ श्लो० २२९.

महाभारतांत, माता पृथ्वीहून मोठी, पिता आकाशाहून उच्च लेखण्याचा उल्लेख मागें आहे. असे उन्नत विचार फार प्राचीन काळापासून इंग्रजी विद्येचा प्रसार होण्यापूर्वीं आपले राष्ट्रांत वास करीत असत. त्याचा परिणाम पण तसाच उत्तम घडत असे. ज्याचे त्याचे तोंडून पूर्वींच्या शिस्तीची वाखाणणी अद्यापि ऐकूं येत असते. पूर्वीं घरांत वडील माणसांचा एवढा बोज असे, एवढा वचक असे याचें कारण त्यावेळच्या मातापित्यांची ज्ञानसंपन्नता हेंच होय. कारण ज्ञानावांचून कुटुंबावर अशी छाप बसवितां येणें अशक्य आहे. समुद्रांत खडक कोठें असतात, कोठें पाणी उथळ असतें, वारा कोणत्या दिशेचा अनुकूळ असतो, शीड केव्हां उघडावें केव्हां मिटून ठेवावें, दमण केव्हां घ्यावें, घोंस केव्हां घ्यावें सुकाणूं कसें संभाळावें; इत्यादि गोष्टी नाविकास अवगत असाव्या

लागतात. प्रजेस विद्यादान करण्यापासून काय फायदा आहे; तिचे हक्क राखण्याकरतां न्यायमनसुबा कसा राखला पाहिजे; परचक्रापासून तिचें रक्षण करण्याकरतां लष्कर, आरमार यांची शिस्त कशी राखिली पाहिजे; परस्थ शत्रुमित्र यांचीं नातीं ओळखून तद्वत् त्यांशीं वर्तन ठेवण्याकरतां देशकालवर्तमानाकडे लक्ष्य कसें असावें लागतें ह्मणजे इतिहास व राजनीति यांचा अनुभव कसा घेतला पाहिजे; हें राजकारणी पुरुषास उत्तम माहीत असावें लागतें. तद्वत् भावी प्रजेकरितां आपलें आचरण प्रथमपासून नीतिशुद्ध कसें हवें; मुलें झाल्यावर त्यांना आपला कित्ता गिरविण्यास हंसत खेळत कसें शिकवावें; त्यांस विद्यादान सुलभ कसें करून द्यावें; त्यांनीं आपल्या अधिकाराप्रमाणें घरींदारीं जुटीनें वागून आपला चरितार्थ कसा चालवावा व इहपरलोकीं धन्यता कशी संपादन करावी हें ज्ञान आईबापास पूर्वीं होतें एवढेंच नाहीं तर मनूनें गृहव्यवस्था उत्तम राखणाऱ्या मातापितरांनीं होमहवन न केलें, दानधर्म न केला तरी हरकत नाहीं असें ह्मटलें आहे. त्याचें वचन असें आहे:—

शक्तः परजने दाता स्वजने दुःखजीविति ।
मध्वापातो विषास्वादः स धर्मप्रतिरूपकः ॥

—स्मृतिः अ० ११ श्लो० ९.

“ जो अवश्य पोष्यवर्गाचें पालनपोषणादि करीत नाहीं; आणि कीर्ति मिळविण्याकरतां इतरांना माल दान करतो व स्वतःच्या पोष्यवर्गास दुःखांत ठेवतो, तो अधर्मी होय. त्यास जरी कीर्ति प्रथम मिळाली तरी नंतर तो नरकाप्रत जातो ” (भावार्थ)

यावरून, मातापित्यासारख्या कुटुंबकर्त्यांची योग्यता केवढी असे हें उघड आहे. ग्रीस व रोम हीं युरोपांतील आद्य राष्ट्रें होत. तिकडेहि मातापित्यांचा असाच गौरव करीत असत सेनेका हा रामन तत्ववेत्ता योग्यता त्यांची तर राज्यकर्त्यांहूनहि अधिक मानीत असे. तो ह्मणे “ राष्ट्रावर सत्ता चालविण्यापेक्षां कुटुंबावर सत्ता चालणें अत्यंत दुर्घट आहे. ” सारांश, प्राच्यपाश्चात्त्यराष्ट्रांत कुटुंबकर्त्यांचा बोज कसा असे हें या अल्पविवेचनावरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

दुसरी गोष्ट अशी कीं आईबाप घरांत प्रेमानेंहि वागत असत याविषयीं मागें चाणक्याची साक्ष दिलेली आहे. त्यांचें सद्गुणाचें अनुकरण मुलें सहज करतात. मग आईबापांनीं आपल्या मागें त्यांस धनदौलत, नांवलौकिक, जमीनजुमला ठेवला नसला, व तसें आपल्या संततीस गर्भश्रीमंत करणें प्रत्येकास बनतहि नाहीं. तरी तीं जर त्यांचें कुलशीलास शोभणारीं निघालीं, व दशरथामागें रामानें जसा आपल्या तसाच सौजन्यानें प्रजेस त्याचा विसर पाडिला, तसा तीं आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस, इष्टमित्रास, गणगोतांस आपल्या बालबोध वळणानें त्याचा विसर पाडणारीं निघालीं ह्मणजे आईबापांनीं जिंकलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण सत्पात्र मातापितरांची सत्पात्र संतति हें अत्युत्तम स्मारक होय. अशी संतति त्यांच्या वडिलोपार्जित धनाचा योग्य उपभोग घेते. तीं स्वर्गस्थ झाल्यावर ती चैनचान उडवीत नाहीं, ख्याली खुशालींत दिवस घालवीत नाहीं. आईबापांनीं कष्ट करून मिळविलेली इज्जत, इभ्रत, दानत, दौलत यांवर ती नांगराचा फाळ फिरवीत नाहीं. अशा रीतीनें वर्तन ठेवून, ती आपल्या मातापितरांची उतराई होऊं पाहतात; व लोकमान्यतेस पावतात. आईबापांचा शोक धरून मुलांस तीं फिरून भेटणारीं नसतात. पण मुलांनीं त्यांचा शुद्ध कित्ता उचलेला पाहूनच, त्यांच्या इष्टमित्रांना खुद्द त्यांचें दर्शनच झाल्यासारखें होतें!

पण असा जुन्यानव्या पिढ्यांचा मिलाफ होण्यास विचारशक्तीचा प्रभाव मनुष्यावर उपजत बुद्धीपेक्षां अधिक असला पाहिजे. संसाराचा अंगावर भार पडण्यापूर्वीं आपण आईबापांची किती पायमल्ली करीत असूं हें कळत नाहीं. संसार अंगावर पडल्यावर आईबापांइतकें आपलें कौतुक करणारें जगांत एक चिटपांखरूंहि नाहीं असें आपणास वाटतें. संसार अंगावर पडल्याखेरीज आपले डोळे उघडत नाहींत आपणास आईबापांच्या छत्राची किंमत कळत नाहीं. ज्ञात्याऱ्या माणसांचा विचार आपल्या तारुण्यांतील अल्लड व धांवऱ्या कल्पनाशक्तीस रुचत नाहीं.

म्हणून वर निर्दिष्ट केलेला उत्तम योग घडून आणण्यास प्रथम मुलांनीं पोट मोठें केलें पाहिजे. म्हणजे आतां आपण आपल्या सातव्या प्रश्नावर येऊन ठेपलों.

(७) सातवा प्रश्न हा आहे कीं, आतां हें आईबापांचें बंधन कसें शिथिल होत आहे? हा प्रश्न अगदीं सोपा आहे. पूर्वी आईबाप गृहस्थाश्रमांतहि ब्रह्मचर्यव्रत किती कडक पाळीत, त्यामुळें त्यांचा वज्रदेह, त्यांचें खंबीर धैर्य, त्यांचा कट्टा निश्चय, त्यांची अपरंपार सत्यनिष्ठा त्यांच्या संततींत उतरत असे; त्यांची पुण्याई त्यांस व त्यांचे नवीन पिढीला लाभत असे; त्यांचें मातृपितृबंधन जेवढें दृढ होतें, तेवढा त्यांस, त्यांचे वंशजांस, त्यांचे समाजास, त्यांचे देशास हितकर असे. त्यामुळें घरींदारीं जूट असे. बरा विचार सांगणारा व ऐकणारा हे दुर्लभ नसत. अशी राष्ट्रांत एकी असल्यामुळें त्यास परचक्राची धास्ती नसे. शत्रूची तेथें डाळ शिजत नसे. तो काळ गेला. आतां त्याचा मागमूस जात चालला आहे. कलीचा पगडा घरोघरीं दृष्टीस पडत आहे. हरतऱ्हेचीं व्यसनें आपणास ग्रासीत आहेत. पूर्वीची शिस्त नाहींशी होत आहे. हें दाखविण्याकरतां आपले विद्वान् समाजाग्रणी हर प्रयत्न करीत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. ग्रीक लोकांत आपल्या मुलाबाळांस मद्यप्राशनासारख्या दुष्ट चाली न लागाव्यात म्हणून असें करीत कीं, गुलामांस खूप दारू पाजीत; व त्या सटवाईचा त्यांच्यावर कसा घोर परिणाम होई तें आपल्या होतकरूं प्रजेस प्रयोगसिद्ध असें करून दाखवीत त्यामुळें ती कधीं तिकडे प्रवृत्त होत नसे. असा कांहीं वस्तुदर्शनपर प्रघात उचलल्यानें आपल्या होतकरु जनांचें कल्याण होणार आहे. तर आपण त्या दिशेनें येथें खटपट करून पाहूं.

या लेखकाच्या अल्पानुभवांत जीं कांहीं चमत्कारिक उदाहरणें आहेत तीं येथें नमुद करण्यासारखीं आहेत. एक जुन्या चालीच्या भिक्षुक वृत्तीनें रहाणाऱ्या गृहस्थाचें आहे. या गृहस्थाचें प्रथम कुटुंब निवर्तल्यावर आपणास मुलेंबाळें होऊन आपला संसार झाला असें समजून

उमजूनहि त्यानें कामशांत्यर्थ द्वितीयसंबंध न करतां एक वेश्या ठेविली हर! हर! ज्यांचें चरणतीर्थ सर्वांनीं घ्यावयाचें, त्यांनीं नीति सोडिली! त्याचा घोर परिणाम त्यांचे कुटुंबावरच पहा कसा झाला तो! आपले वडील बाहेरख्याली आहेत तेव्हां आपण तरी बाहेरख्याली कां होऊं नये असें मुलांस वाटणें साहजिकच आहे. वळणाचें पाणी वळणालाच जातें. खाण तशी माती निघते. याप्रमाणें त्या गृहस्थाचे पुत्रद्वयांचा प्रकार झाला. धाकटा तर त्या व्यसनहोमांत जळून खाक झाला. मोठ्याच्या शरीराची हानि जन्माची झालेली आहे; पण बापामागें संसाराचा बोजा त्याचे अंगावर पडल्यामुळें, त्याचे डोळे लवकरच उघडले. नाहीं तर त्यासहि अल्पमृत्यूची मिठी बसावयास वेळ नव्हता!

अगदीं अशीच दुसऱ्या एका मान्य भिक्षुक गृहस्थाची कथा आहे. पण आश्चर्य हें कीं ती त्याची त्यास उमजत नव्हती; किंवा उमजत असल्यास स्वतःची अब्रूरक्षणार्थ ते सत्यापलाप करीत. ते ह्मणत असत कीं "आह्मी भिक्षुकी करावयास लोकांच्या घरीं जातों, तेव्हां चोरी, चहाडी व शिंदळकी या तीन गोष्टी करावयाच्या नाहींत असा आमचा आपला नेम आहे. अहो, मुलगा वाईट चालीचा! त्याला आह्मी काय करणार? आईबाप जन्म देणार, पण कर्म तर ज्याचं त्याचंच ना? एकाच पोटांतून सहा तऱ्हेचे सहा मुलगे निपजतात. कोणी भांग्या, कोणी गांज्या, कोणी कसा; त्याला आह्मी काय करणार? अकलेच्या नांवानें त्यांचें आंवळ्याएवढें पूज्य! तें बरोबर आहे. अक्कल नाहीं, त्याची घरोघर नक्कल! एकदा त्याची तासडपट्टी काढली पाहिजे!"

तिसरी गोष्ट एका नामांकित वयोवृद्ध पुणेकर वैद्यांची आहे. यांनीं तर बायकोमुळें असून विश्वयोषितासंगांत स्वतंत्र राहून कालक्रमणा चालविली होती.

चौथी गोष्ट एका मथुरानिवासी वृद्ध वकीलाची आहे. त्यानें मथुरेसारख्या क्षेत्रांत हरिहरि करीत बसण्याचे मिषानें एक वंगस्त्रीसुखांत कालाचे दिवस घालविण्याचा जणूं काय संकल्पच केला होता!

पांचवी गोष्ट या लेखकाचे प्रिय पितृव्य घरांतील व्यसनशील तरुण आचारी पाणक्यास मोठ्या हृदयद्रावक रीतीनें सांगत असत. ते वेंगुर्ल्यास मुनसफ होते, तेव्हां त्यांच्या पाहण्यांत एक तरुण हुषार वकील येत असे. पण मद्यप्राशन व विश्वयोषिता यांचा छंद त्यांस जबरदस्त लागून, तो क्षयी होऊन अखेर अल्पकाळांत आपल्या कुटुंबास सोडून चालता झाला!

सहावी गोष्ट टिन्कौरी पॉल या तरुण बंगाली जमीनदाराची+विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेली आहे. या अठरा एकोणवीस वर्षांच्या मुलास एका वेश्येचा खून केल्याच्या शाबीतीवरून कलकत्त्यास फांशी दिलें. हा मुलगा चांगल्या संभावित कुळांतला होता; व बराच शिकलेलाहि होता. तरी

* अपथे पदमर्पयन्ति हि
श्रुतिमन्तोपि रजोनिमीलिताः ।

या कालिदासोक्तीप्रमाणें त्याची स्थिति झाली. त्याचें कुटुंब नुकतेंच प्रसूत झालें होतें. फांशीच्या आदल्या दिवशीं त्यानें आपल्या एका मित्रास पत्र लिहिलें, तें छापून प्रसिद्ध झालें आहे. मरणोन्मुख मनुष्याची साक्ष सरकारदरबारांत अगदीं दर्शनीं खरी मानितात; कारण त्या साक्षीमध्यें मनुष्याच्या स्वहिताचा ओढा कांहीं एक नसतो. ह्मणून तें पत्र विश्वसनीय व उपदेशपर आहे. त्याचें तात्पर्य असें कीं "प्रियमित्रा, काय करूं? मी कुमार्गाकडे वागल्यामुळें मला आज ही अत्यंत दीनावस्था प्राप्त झाली आहे. आतां हें जग सोडून जातांना, माझी परमेश्वरापाशीं एवढींच प्रार्थना आहे कीं, देवा, पुन्हा अशा अनीतीच्या मार्गानें जाण्याची कोणाला बुद्धि देऊं नको. आतां मी सांगतो तें नेहमीं लक्ष्यांत ठेवा. सद्वर्तन हें अमोलिक धन आहे. तें संभाळा.

\+ वर्ष १७-अंक ७ पहा.

* "वेदाध्ययन केलेले देखील रजोगुणानें धुंद झालेले असतां, खरोखर वाईट मार्गाला लागतात."

त्याला विसरूं नका. आणखी तुला एक विनंति करावयाची आहे कीं तूं सर्व लोकांच्या हितार्थ वाचनगृह स्थापण्याच्या विचारांत आहेस. पण तो नाद सोडून दे. तूं एवढें कर कीं, नीतीची वृद्धि व्हावी व अनीतीचा ऱ्हास व्हावा; या उद्देशानें एक चांगली मंडळी स्थापित कर. तिच्या चिटणीसीचें कामावर कोणा चांगल्या सुशिक्षितास नेम आणि तिचें काम चालूंदे. ह्मणजे तिजपासून जनास पुष्कळ लाभ होतील. माझी शिक्षा कमी होण्याकरतां ज्या सद्गृहस्थांनीं सरकारास अर्ज करून पुष्कळ परिश्रम केले, त्यांस माझे फार फार नमस्कार सांग; आणि ह्या वर सांगितलेल्या कामांत त्यांचे साह्य माग. जावत्कालपर्यंत मद्यपान आणि व्यभिचार हीं या पृथ्वीवर आहेत, तावत्कालपर्यंत जनांत अकाल-मृत्यु नाहींसा व्हावयाचा नाहीं. ह्मणून माझी अशी प्रार्थना आहे कीं, हीं व्यसनें अगदीं नाहींतशीं व्हावींत. लोभ असूं दे हे विनंति" टिन्कौरी पॉलचे अंतकाळचे शब्द तर अत्यंत हृदयद्रावक आहेत. अगदीं फांसावर चढल्यानंतर, तो खालील मंडळीकडे अत्यंत दुःखित मुद्रेनें पाहून ह्मणाला "मित्रहो, मद्यपान व परद्वार यांचा हा परिणाम आहे. असो. माझ्या आईबापांस ह्मणावें, मी तुमचा पुत्र नव्हतों—कारण

+ प्रीणाति यः सुचरितैः पितरं स पुत्रः।

मी तर त्यांचा शत्रु होतों!

सातवी गोष्ट 'मधली स्थिति' या लोकप्रिय कादंबरींतली आहे. विनायकरावासारखे होतकरु तरुण जहागिरदार गोविंदरावासारख्या 'बगाड्या वकिलांचे' नादीं लागून मद्यप्राशन व परद्वार यांचे पायीं आपल्या सोन्यासारखे आईस व बायकोस कसें छळतात व आपल्या हातांनीं आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊन जनांत आपलें हंसूं करूं घेऊन अखेर कसे शुद्धीवर येतात; हें 'आजकालच्या गोष्टी'तल्या प्रमुख तत्त्वांपैकीं एक आहे सुज्ञ वाचकांस

+ "जो सदाचरणानें आपल्या बापास संतुष्ट करतो, तोच पुत्र."

सांगणें नलगे. या विषयांवर जुन्या नव्या मतवाद्यांचें ऐकमत्य आहे. तेव्हां मातृपितृबंधनासारखें पवित्र बंधन सध्यां कसें शिथिल होत आहे हें उघड आहे.

(८) आठवा व अखेरचा प्रश्न हा आहे कीं हें बंधन पूर्ववत् दृढ करण्यास काय केलें पाहिजे. सांप्रतची ही शिथिलता दूर करण्याकरतां × चिनई घोर शिक्षा ठोठावण्याचें किंवा इराणी जारकर्माचा आरोप ठेवण्याचें प्रयोजन नाहीं. कारण घे-सुरी-घाल-उरीं पद्धतीनें जरी तात्काळ इष्ट परिणाम दिसून आलाच तरी तो चिरस्थायी होत नाहीं.

आपणास आपलें पूर्वीचें पवित्रशील प्राप्त झालें पाहिजे; ह्मणजे मातृ-पितृसंबंध पूर्ववत् दृढ होईल. इंग्रजी भाषेंत शील यास समानार्थ शब्द 'कॅरेक्टर' व जपानी भाषेंत, 'बुशिडो' हा आहे. व जसें

'शीलं परं भूषणम्'

असें आपण मानीत होतों, तसें इंग्रज, जपान व इतर सर्व सुधारलेलीं राष्ट्रें मानीत आहेत. ह्मणजे त्यांच्या उन्नतीचें हेंच कारण आहे असें ते पर्यायानें ध्वनित करीत आहेत. तेव्हां त्याची मीमांसा संक्षेपतः येथें करूं.

शील * घरीं प्रथम संपादन करतां येतें. मूल जेव्हां जन्मास येतें, तेव्हां तें शारीरिक, मानसिक, व नैतिक वृद्धीकरतां सर्वस्वी आपल्या

× ली कॉट या धर्मोपदेशकाच्या चीन देशाची सांप्रतची स्थिति (भा० २) या ग्रंथांत पितृवध करणाऱ्या पुत्राचें, त्याच्या कुटुंबाचें, त्याच्या गांवाचें समुन्मूलन करून तेथें मीठ पेरण्याची चाल असल्याचें लिहिलें. २ हिरोडोटस या सुप्रसिद्ध इतिहासकारानें आपल्या ग्रंथाच्या पहिल्या अध्यायांत इराणदेशाच्या चालीरीतीचें व धर्माचें वर्णन देतांना असें ह्मटलें आहे कीं, इराणी लोकांचे मतें पितृवध अशक्य आहे; तसा प्रकार घडल्यास त्यावरून ते असें अनुमान करीत असत कीं, तो गुन्हेगार अनौरस किंवा जारिणीसुत असला पाहिजे.

यावरून चिनी व इराणी लोकांची उद्धटपणाविषयीं किती यथार्थ कल्पना होती हें समजतें.

* आपल्या आर्य पूर्वजांचा असाच अभिप्राय असे. पूर्वी शाळा ह्मणजे शहरांतील गोंगाटापासून दूर अंतरावर नदीकाठीं सुंदर ठिकाणीं असणारा आश्रमवास होय.

मातापितरांवर अवलंबून असतें. सरतेशेवटीं त्यांचेच विचार तें उचलतें; इतकेंच नव्हे, तर योग्य वळण मिळेल तर तें आज्ञाधारक, संयमी, दयाळु, धर्मशील, व सुखी होतें. तें निश्चयी, करारी, बाणेदार निघतें; पण तें बरेंवाईट निघणें हें सर्वस्वी आईबापांच्या वर्तनावर अवलंबून असतें.

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

त्यावेळीं गुरुगृहीं राहून पवित्र आचरण शिकावें; पण जन्मापासून उपनयनापर्यंत आईबापांनीं तेवढा पतकर घ्यावा अशी रीत असे. याविषयीं मागें आलेंच आहे. ग्रीक लोकांत अशाच वहिवाट असे. साक्रेटिसासारखा नीतिशास्त्रवेत्ता ह्मणे कीं, माझी आई सुइणीचा धंदा करीत असे व माझा बाप मूर्तिकाराचा धंदा करीत असे. सुईणीला गर्भमोचन करावें लागतें व मूर्तिकारांस दगडांतून मूर्ति बनवावी लागते. तसें मज सारख्या शिक्षकास लोकांचें मन अज्ञानतिमिरांतून बाहेर काढून सुसंस्कृत करावें लागतें ह्मणजे पर्यायानें तो असें कबूल करतो कीं आपला धंदा आपल्या आईबापासूनच शिकलों. असें जरी आहे, तरी ग्रीसमध्यें सार्वजनिक शाळांचें स्तोम फार. पण रोमन लोकांची पद्धति हीच. मुलांस आईबापांनींच शिकविलें पाहिजे; व प्लटार्कनें मार्कस केटो याचें चरित्रांत असें लिहिलें आहे कीं सदरहू केटोस आपल्या मुलांस शिक्षण देण्याकरतां पगारी नामांकित शिक्षक चिलो हा असतां तो आपल्या मुलास दुसऱ्या कोणाचे हातीं देत नसे. ‘ शिक्षणसंबंधीं कांहीं विचार ’ या मान्य ग्रथांत जॉन लॉक या इंग्रजी तत्त्ववेत्यानें ह्मटलें आहे कीं, जर मी आपल्या मुलास घरीं शिकविलें, तर तो अधिक सद्‌गुणी निघेल. पण तो अधिक व्यवहारशून्य राहील. यांत त्यानें असें दर्शविलें आहे कीं, ज्ञानापेक्षां सद्‌गुण किंवा शील संपादन करणें अधिक दुष्कर आहे, तेव्हां शाळेंतील शिक्षणापेक्षां गृहशिक्षण बरें. कॉबटचें मत असेंच असल्याचें मागें आलें आहे. असें जरी गृहशिक्षणाचें माहात्म्य आहे, तरी शाळेच्या शिक्षणापासून कांहीं लाभ नाहीं असें नाहीं. शाळेंत बनलेली लहानथोरांची मैत्री आमरण कायम राहते, व्यवहार नीट समजतो. श्री० महाराज तुकोजीराव होळकर यांनीं हेंच धोरण लक्ष्यांत ठेवून आपल्या पुत्रद्वयांस सार्वजनिक शाळेंत घातलें होतें. त्यांस राजकुमार कॉलेजांत एकलकोंड बनविण्याकरतां ठेविलें नव्हतें. आपण तर त्यास ‘ गुरुबंधू ’ च ह्मणतों. याचें बंधुत्वाचें एक विलक्षण उदाहरण असें आहेः— एकदा ‘ वेस्टमिनिस्टर स्कूल ’ मध्यें एका विद्यार्थ्यानें एक पडदा फाडला होता. तो भिडस्त स्वभावाचा असल्यामुळें गांगरून गेला. तेव्हां त्याच्या धीर दोस्तानें अपराध आपण केल्याचें कबूल करून आपल्या मित्राच्या वाट्याची शिक्षा स्वतः भोगिली! पुढें शिक्षणक्रम आटोपल्यावर पहिला न्यायखात्यांत शिरला व दुसरा लष्करी खात्यांत शिरला. पहिल्या चार्लसच्या कारकीर्दींत अंतःकलह माजून राजपक्ष

बालपणापासून सत्कर्मीं निश्चय करण्याची संवय असणें ह्मणजे ' शील ' होय. सत्कर्मीं ज्याचा लय लागलेला आहे, तो जगाच्या स्तुतिनिंदेची पर्वा करीत नाहीं; त्याची मनोदेवता सुप्रसन्न असली कीं त्यास सर्व मिळालेसें वाटतें. त्यास आपली चंद्रमौलि पर्णकुटिका लक्ष्मीविलासतुल्य वाटते.

सत्कर्मीं अशी इच्छाशक्ति लाविलेली नसल्यास ती दीर्घोद्योगरूपानें प्रकट होत असते. पण ती सत्कर्मीं लाविल्याखेरीज तीपासून इष्टफळ प्राप्त होणार नाहीं. उलट कदाचित् तीमुळें नुकसानहि होण्याचा संभव आहे. अडमुठे राजे तिच्या जोरावर राक्षस बनतात. रावण मूळचा तपोधन ब्राह्मण होता; पण या बहकलेल्या इच्छाशक्तीमुळेंच उलट्या काळजाचा राक्षसराजा झाला. व कयाधुसारखा सुपुत्रवान् राक्षसाधिपति तिच्यामुळेंच नृसिंहनखपंजरीं पडला!

पण ज्याची इच्छाशक्ति सत्कर्मीं वाहिलेली असते, तो इतरांचीं मनें आपल्या उत्तम उदाहरणानें सजीव करतो; त्यास सन्मार्ग दाखवितो; त्यास आपले इष्टहेतु तडीस नेण्यांत, गुरुत्वाकर्षण तत्त्वावर आपल्या केंद्राकडे आकर्षण करतो; तो अन्यायाचें निरसन व न्यायाचें समर्थन करण्यास त्यांस शिकवितो. अशी कामगिरी बजावणारीं माणसें आपणास सध्यां हवीं आहेत. अशीं माणसें क्रियावान् असतात. त्यांच्या दीर्घोद्योगानें भीरुजनांस धीर येतो व आळशास फटकारा बसतो. इसापनीतींतील ससा व कांसव यांच्या शर्यतींत आरंभापासून सतत हळुहळु चालणाऱ्या वेंगरूळ कांसवानें सुंदर पण सुस्त, चपळ

(मागील पृष्ठावरून)

हरला; तेव्हां प्रजापक्षानें तिकडील लढवय्यांस गिरफ्तदार करून हवालतींत ठेविलें. व क्रमाक्रमानें न्यायासनासमोर त्यांस आणिलें. ज्या न्यायाधीशास त्या कैद्यांस न्याय द्यावयाचा होता, तो कर्मधर्मसंयोगानें त्याच न्यायखात्यांत जुनापुराणा झालेला पूर्वीचा भिडस्त विद्यार्थी होता. त्यानें आपला बालपणचा उदार मित्र अटकेंत असतांच ओळखिला; व जास्ती कमी न बोलतांच, लंदनास तात्काळ जाऊन व प्रजापालक ऑलिव्हर क्रॉमवेल यांजवळ त्याच्याकरतां आपलें होतें नव्हतें तेवढें वजन खर्च करून, त्यानें त्या कचाटींतून त्याचा जीव वांचविला!

पण गर्विष्ठ अशा सशास हटविलेलें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सबब इच्छाशक्ति जेणेंकरून पूर्णदशेस येऊन पोंहचेल, असे उपाय तारुण्यांतच योजिले पाहिजेत. नुसत्या बुद्धिविषयक शिक्षणानें हें काम रेंटत नाहीं- नामदेव, तुकाराम, रामदास, शिवाजी ही कांहीं जाडी विद्वान् मंडळी नव्हती. पण त्यांची इच्छाशक्ति मात्र प्रचंड वाढलेली होती. यांतील भक्तमंडळीस देव जिवाहून प्यारा असे; व राजकीय मंडळीस देश जिवाहून प्यारा असे. अलीकडे उदार इंग्रजी शिक्षणामुळें राजा राममोहनराय, बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी, सर टी माधवराव, आर रघुनाथ पंडित, अजुध्यानाथ, स्वामी विवेकानंद, न्या० तेलंग, रा० सा० मंडलिक, ना० मेथा, ना० बद्रुद्दिन तय्यबजी, रा० कुंटे, न्या० रानडे, डॉ० भांडारकर, उमाशंकर याज्ञिक, ना० सर भालचंद्र, प्रो० जिनसीवाले, इत्यादि योग्य दिशेनें चळवळ करणारीं माणसें आपणांमध्यें निपजत आहेत व राजकुलांत श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड, श्रीमंत चमाराजेंद्र उदियार इत्यादि कर्तेपुरुष झळकत आहेत. यांचा कित्ता कांहीं अगदींच फुकट जाणार नाहीं. तेव्हां राष्ट्रीयबंधन दृढ करणारें 'शील' च प्रथम मातृपितृबंधन निःसंशय दृढ करील; हें ध्यानांत आणून आईबापांनीं आपल्या होतकरु मुलांचें कोवळें मन या दिशेनें सुसंस्कृत करण्याचा यत्न सतत चालू ठेवणें हें त्यांचें आद्य कर्तव्य आहे. या लेखकाचे प्रिय पितृव्यांनीं त्यास जें थोडेंबहुत शिक्षण दिलेलें आहे, त्याचें सार, त्यांच्या तोंडच्या दोन शब्दांत आहे, ते नेहमीं यास असा उपदेश करीत कीं

× यः क्रियावान् स पंडितः

येथवर प्रस्तुत विषयाचें विवेचन यथामति झालें. विवाह व प्रजोत्पादन यांचा व्यक्तीशीं व समाजाशीं कसा निकटसंबंध आहे, आईबाप व मुलें यांचे परस्परधर्म किती नाजूक आहेत, आईबापांनीं मुलांचें शरीर सुदृढ

× " जो कर्तबगारी दाखवितो तो पंडित होय

राखण्याविषयीं काय केलें पाहिजे; त्यांस सुशिक्षण देण्याकरतां कोणत्या दिशेनें यत्न केला पाहिजे; मुलांनीं आईबापांस आपली योग्य कृतज्ञता कशी दाखविली पाहिजे; प्राचीन काळापासून आईबापांची थोरवी पृथ्वीवर कशी गाजत आहे; आतां हें मातृपितृबंधन कसें शिथिल पडत आहे; व तें दृढ करण्यास मुलांनीं शील संपादन करणें कसें अवश्य आहे; याचा आपण विचार केला. प्रत्येक पर्वतांत माणिक सांपडत नाहीं; प्रत्येक गजमस्तकीं मौक्तिक आढळत नाहीं; प्रत्येक वनांत चंदनवृक्ष गवसत नाहीं; तसें प्रत्येक ठिकाणीं साधुपुरुष दृष्टीस पडत नाहीं. आणि विशेषतः राजकुलांत तर तो मिळणें अत्यंत दुर्लभ आहे. पण असे पुरुष ज्याअर्थीं या आर्यवर्तांत अद्यापि निर्माण होत आहेत, ज्याअर्थीं त्यांचे मनांत प्रस्तुत विषयासारखे अत्यंत उपयुक्त, सर्वव्यापि, सर्वानुकूल विषय रात्रंदिवस घोळत आहेत, त्याअर्थीं आपण त्यांच्या मनीषा पूर्ण करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' ही उक्ति आपण जर मानीत आलों आहों, तर प्राच्यपाश्चात्यज्ञानांजनानें आपण आपली तिकडे डोळेझांक खास करणार नाहीं; अशी प्रत्येकास त्याची मनोदेवता सांगितल्याशिवाय राहणार नाहीं. एखादा उंच डोंगर चढतांना, प्रथम फार कष्ट पडतील; आपल्या मांड्या भरून येतील; आपल्या अंगास घामाच्या धारा सुटतील; आपणास ठिकठिकाणीं ठेंचा लागतील; आपण वेळेनुसार मधून मधून धडपडूं; आपल्या नाकीं नव येतील; असे सर्व संस्कार व्हावयाचे ते होतील; पण आपण नेट धरून, कंबर बसून धडपडेन, पण शिखरावर जाऊन बसेन असा कट्टा निश्चय असला कीं अखेर पहा काय मजा होते. शिखरावरील दाट अमराईत बसून, खालील चारी बाजूंचा विस्तीर्ण देखावा पाहून, आपल्या जिवास पूर्ण समाधान होतें, आपल्या मनास नवीन उमेद येते, व आपणास झालेल्या श्रमाचें चीज होतें! क्षितिजांतून दूरचें तारूं हळू हळू अफाट रुपेरी दर्यांत डोकावत आहे; समुद्रकांठचें दाट नारळीबन सकाळच्या वाऱ्याचे झुळकीनें डुलत आहे; भातशेतांत खपणारा शेतकरी मधूनमधून गाण्याच्या लकेरी मारीत आहे;

कोकिळा त्यास साथ करीत आहे व कविराज पर्वतमस्तकीं कल्पनारंगांत दंग झाला आहे असा चमत्कारिक अनुभव कधीं कधीं आपणास घेण्यास सांपडतो. पण याहून अधिक चमत्कारिक विद्यानंद आहे, तो ज्यास लाभत असेल, त्यास मनुष्याची उत्पत्ति, त्याची सुधारणा, त्याची उन्नति कोणत्या तत्त्वावर होते; तीं तत्त्वें अवनत दशेस येऊन पोंचलेल्या देशास कशीं लागू करावीं; तीं लागू करतां आलीं ह्मणजे कित्येक शतकांनीं तरी तीं कशीं फलद्रूप होतील; यांचा आज अंदाज बांधतां येईल, त्यांसच मातृपितृसंबंधासारख्या अवाढव्य विषयाचें माहात्म्य समजेल; त्याचेच मनांत त्याची फलश्रुति उतरेल; त्यासच 'उधळलेल्या समाजरूपी तटूस' धरण्याची ही सामोपचाराची युक्ति पसंत पडेल. असो; या 'विचारभ्रमणा' ची इतिश्री आतां केली पाहिजे. कारण निबंधकाराचें कर्तव्य आतां बहुतेक आटोपलेलें आहे. त्याचा उरलेला भाग काय तो एवढाच कीं, ज्या सच्चिदानंद प्रभूचे कृपेनें हें अल्पलेखनकार्य येथपर्यंत निर्विघ्नपणें पार पडलें, त्याचें अनेकवार नामस्मरण करून आज या एकाच विषयावर रात्रीं तर रात्रीं, दिवसा तर दिवसा उदरनिर्वाहाचा धंदा संभाळून, कुटुंबकृत्य उरकून, आहार निद्रादि निसर्गनिर्दिष्ट कर्तव्यें सुरळीत ठेवून, जी जी चिपडी सांपडली तींत ही सारखी न दमतां चालणारी लेखणी खालीं ठेवतांना भारविमहाकवीप्रमाणें एवढेंच ह्मणतों कीं, 'अतः प्रकर्षाय विधिर्विधेयः'

प्रकर्षतन्त्रा हि रणे जयश्रीः ॥
